❖ संस्थापक : कै. वसंत काणे ❖ नोंदणी क्रमांक : १६६३/१९५७ ❖ पुणे आवृत्ती **शनिवार, दि. १४ नोव्हेंबर २०२६** ❖ पाने : ८ ❖ अंक : ३१७ ❖ Gmail : news.sandhya@gmail.com ❖ किंमत : ७ रूपये

www.dainikesandhya.com Epaper - www.sandhyaepaper.com www.youtube.com/@sandhyalivenews

७० वर्ष निर्भीड पत्रकारीतेची

दैनिक **संध्या** निःपक्ष समीक्षणाचे....निर्भीड दैनिक



सापळ्यात अडकू नका : राज ठाकरे



■ मुंबई (दै. संध्या)

महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे अध्यक्ष राज ठाकरे यांनी भारतीय जनता पक्षावर घणाघाती टीका केली आहे. आगामी उत्तर प्रदेश निवडणुकांच्या स्वार्थासाठी भाजप छठ पूजेच्या माध्यमातून महाराष्ट्रात जाणीवपूर्वक संघर्ष निर्माण करण्याचा प्रयत्न करत असल्याचा गंभीर आरोप राज ठाकरे यांनी केला आहे. तसेच, 'भाजपला कामे दाखवून निवडणुका जिंकता येत नाहीत, त्यामुळे दोन गटांत संघर्ष घडवून त्यांच्या सांडलेल्या रक्तावर ते निवडणुका जिंकतात,' असा स्फोटक दावाही राज ठाकरे यांनी आपल्या सोशल मीडिया पोस्टद्वारे केला आहे. राज ठाकरे यांनी म्हटले आहे की, भाजप आणि त्यांनी पोसलेला विषारी सोशल मीडिया सध्या मुंबई आणि महाराष्ट्रात छठ पूजेचा मुद्दा वापरून संघर्ष कसा निर्माण होईल, यासाठी आटोकाट प्रयत्न करत आहे. रेल्वे स्थानकांवर भोजपुरी गाणी वाजवून पाहिली, जी मनसेने बंद पाडली. पण तरीही भाजपला अपेक्षित असलेला संघर्ष उभा राहत नाहीये, याची त्यांना खंत आहे. हा सगळा आटापिटा आगामी उत्तर प्रदेश निवडणुकांसाठी सुरू आहे. भाजपच्या 'थिंक टँक'ची बौद्धिक क्षमता कमकुवत झाल्याचा टोलाही त्यांनी लगावला.

राज ठाकरे म्हणाले, भाजपने देशाची आणि महाराष्ट्राची वाट लावली आहे. केंद्रीय आदेशाने महाराष्ट्राला एकाच उद्योगपतीला आणि त्याच्या चिल्ल्यापिल्ल्यांना विकून फक्त चहुबाजूंनी ओरबाडण्याचे काम सध्या सुरू आहे. आपले महाराज आणि मावळे जिथे नांदले, तो सह्याद्रीही यांनी पोखरायला सुरुवात केली आहे. जंगले आणि जमिनी त्या उद्योगपतीला दिल्या जात आहेत."

राज ठाकरे म्हणाले, पूजेच्या नावाखाली सांस्कृतिक उन्माद कोणी घातलाच, तर'शांत आहोत म्हणजे कमजोर नाही', हे महाराष्ट्र ओरबाडणाऱ्यांनी आणि राज्याचे सांस्कृतिक वैभव बिघडवणाऱ्यांनी कायम लक्षात ठेवावे. उत्तर भारतीय आणि गुजराती समाजानेही समजून घ्यावे की, भाजप फक्त स्वतःचा स्वार्थ साधण्यासाठी तुम्हाला आमच्या विरोधात उभे करत आहे. जर त्यांच्यात सामील होऊन तुम्ही आमच्या अंगावर येणार असाल, तर विसरू नका की हा महाराष्ट्र आहे आणि इथे मरहट्टे राहतात!" भारतीय जनता पक्ष आणि त्यांनी पोसलेला विषारी सोशल मीडिया हा सध्या मुंबई, महाराष्ट्र येथे छठ पूजा हा मुद्दा वापरून कसा संघर्ष निर्माण करता येईल यासाठी आटोकाट प्रयत्न करतोय. त्यासाठी सोशल मीडियावर या पूजेच्या, त्यातून सुरु असलेल्या सांस्कृतिक आक्रमणांच्या रिल्स सोशल मीडियावर टाकत आहेत. हे पुरेसं नाही म्हणून मुंबईतील काही रेल्वे स्थानकांवर भोजपुरी गाणी वाजवून पाहिली, जी महाराष्ट्र नवनिर्माण सेनेने बंद पाडली तो भाग वेगळा. पण या सगळ्यातून अजून भारतीय जनता पक्षाला जो संघर्ष अपेक्षित आहे तो उभा राहत नाहीये ही त्यांना खंत आहे. आणि हा सगळा आटापिटा सुरु आहे आगामी उत्तर प्रदेश निवडणुकांसाठी.

मराठी माणसाला 'गनिमी काव्या'ची आठवण

मराठी माणसाला सतर्कतेचा इशारा देताना राज ठाकरे म्हणाले, "माझी मराठी माणसांना विनंती आहे की, त्यांनी आखलेल्या युद्धभूमीवर आपल्याला लढायची गरज नाही. भाजपच्या स्वार्थासाठी त्यांच्या सापळ्यात आपण अडकायचे नाही. आपण शिवरायांचा गनिमी कावा लक्षात ठेवला पाहिजे. गनिमी काव्याने कोणाला कधी आणि कसे उत्तर द्यायचे, हे आपण ठरवू. योग्य वेळी आपण आपला राग बाहेर काढला पाहिजे."

एकट्याने जाऊन-येऊन विलीनीकरण होणार नाही : छगन भुजबळ

■ मुंबई/नाशिक (दै. संध्या)

सध्या राज्यात दोन्ही राष्ट्रवादी काँग्रेस (शरद पवार गट आणि अजित पवार गट) एकत्र येणार असल्याच्या चर्चांना उधाण आले आहे. या राजकीय विलीनीकरणाच्या चर्चेवर आता राज्याचे कॅबिनेट मंत्री आणि अजित पवार गटाचे ज्येष्ठ नेते छगन भुजबळ यांनी अत्यंत सूचक आणि भावनिक प्रतिक्रिया दिली आहे. "माझ्या आयुष्यात मला दोनच नेते आणि मार्गदर्शक लाभले, एक बाळासाहेब ठाकरे आणि दुसरे शरद पवार. त्यामुळे दोन्ही शिवसेना किंवा दोन्ही राष्ट्रवादी एकत्र आल्यास जुन्या लोकांना आनंदच होईल," असे विधान करत भुजबळांनी राजकीय वर्तुळात नवी गुगली टाकली आहे. भुजबळ म्हणाले, सध्या विलीनीकरणाचा खेळ सुरू आहे. पण जर व्हायचेच असेल, तर दोन्ही बाजूंनी खेळले पाहिजे. क्रिकेटच्या मॅचसारखे सर्वांनी एकत्र येऊन गळ्यात हात घालून एकत्रितपणे निर्णय घेतला पाहिजे. तुटत-तुटत कोणी असे काही करावे असे मला वाटत नाही." त्यांनी पुढे स्पष्ट केले की, कोण कोणाला भेटायला जातेय हे केवळ टीव्हीवरूनच समजत असून, पक्षांतर्गत अद्याप याबाबत कोणतीही अधिकृत चर्चा झालेली नाही. दोन्ही गट एकत्र येण्याबाबत भुजबळांनी एक अत्यंत महत्त्वाचा सवाल उपस्थित केला. "मी जेव्हा विचार करतो की हे कसे काय जमणार आहे? सगळे NDA मध्ये येणार आहेत काय? नक्की काय आहे, याचा अजून शोध लागलेला नाही," असे भुजबळ म्हणाले.



सुनेत्रा पवार यांनी म्हटल्याप्रमाणे योग्य वेळी योग्य तो निर्णय होईल, अशी आशाही त्यांनी व्यक्त केली. शरद पवारांच्या भेटीबाबत बोलताना भुजबळ भावूक झाले. ते म्हणाले, "पवार साहेबांना भेटायला मी पण हॉस्पिटलमध्ये गेलो होतो. त्यांच्या तब्येतीची विचारपूस करण्यासाठी जाणे यात काहीही चूक नाही. माझ्या आयुष्यात माझे दोनच नेते आणि मार्गदर्शक आहेत. एक बाळासाहेब ठाकरे, जे आज दुर्दैवाने हयात नाहीत, आणि दुसरे शरद पवार साहेब. पवार साहेबांचा आणि माझा पक्ष वेगळा असला तरी आमचे संबंध चांगले आहेत. राजकारणात कितीही मोठा दुश्मन असला तरी साहेब प्रत्येकाशी प्रेमाने बोलतात, हा गुण आम्ही त्यांच्याकडूनच शिकलो आहोत." विलीनीकरणाबाबत स्वतःची भूमिका मांडताना भुजबळांनी थेट इतिहासाचा दाखला दिला.

थोडक्यात...



जयंतीनिमित्त विधान भवनात अभिवादन

मुंबई : दैनिक संध्या

महाराष्ट्राचे माजी मुख्यमंत्री व सहकार महर्षी तसेच राजस्थानचे माजी राज्यपाल स्व. वसंतदादा पाटील यांच्या जयंतीनिमित्त 13 नोव्हेंबर, 2026 रोजी विधान भवन परिसरातील त्यांच्या पुतळ्यास महाराष्ट्र विधानपरिषदेचे उपसभापती सचिन अहिर यांनी पुष्पहार व गुलाबपुष्प अर्पण करून अभिवादन केले. याप्रसंगी महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयाचे सचिव (1) जितेंद्र भोळे, सचिव (3) डॉ.विलास आठवले, सचिव (4) शिवदर्शन साठ्ये, उपसचिव विजय कोमटवार, अवर सचिव (समिती) प्रकाश थिटे, संचालक, वि.स.पागे, संसदीय प्रशिक्षण केंद्र आणि जनसंपर्क अधिकारी निलेश मदाने यांच्यासह इतर अधिकारी व कर्मचाऱ्यांनीही स्व. वसंतदादा पाटील यांच्या पुतळ्यास पुष्पहार व गुलाबपुष्प अर्पण करून अभिवादन केले.

शेतकऱ्याच्या बैलगाडीला भरधाव कारची धडक

नांदुरा : दैनिक संध्या

दिवसभर शेतात कष्ट करून बैलगाडीने घराकडे परतणाऱ्या एका वृद्ध शेतकऱ्यावर काळाने घाला घातला. नांदुरा-मोताळामार्गावर लोनवडी गावाजवळ भरधाव कारने बैलगाडीला जोरदार धडक दिली. यात 70 वर्षीय शेतकऱ्याचा दुर्दैवी मृत्यू झाला. ही घटना बुधवार, 11 नोव्हेंबर रोजी सायंकाळी सुमारे 7 वाजता घडली. धडकेची तीव्रता इतकी प्रचंड होती की बैलगाडीचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले. त्याला जुंपलेले दोन्ही बैल गंभीर जखमी झाले आहेत. मिळालेल्या माहितीनुसार, वासुदेव तुळशीराम कुटे (वय अंदाजे 70, रा. लोनवडी) असे मृत शेतकऱ्याचे नाव आहे. वासुदेव कुटे हे नेहमीप्रमाणे शेतातील कामे पूर्ण करून बैलगाडीने गावाकडे निघाले होते.लोनवडी गावाजवळ पोहोचले असताना नांदुऱ्याच्या दिशेने भरधाव वेगाने येणाऱ्या ब्रेझा कार (क्रमांक एमएच 34 बीआर7555) वरील चालकाचे अचानक नियंत्रण सुटले. सदर वाहनाने वासुदेव यांच्या बैलगाडीला जोरदार धडक दिली.या अपघातात बैलगाडीचा अक्षरशः चुराडा झाला. गंभीर मार लागल्याने वासुदेव कुटे यांचा घटनास्थळीच मृत्यू झाला. अपघाताची वार्ता समजताच नांदुरा येथील ओमसाई फाउंडेशनची रुग्णवाहिका स्वयंसेवकांसह तातडीने घटनास्थळी पोहोचली. विलास निबोळकर, बळीराम गोड, प्रमोद वरदे, संजय चोपडे, साहेबराव फासे आणि इतर स्वयंसेवकांनी मदतकार्य सुरू केले. त्यांच्या सहकार्याने मृतदेह नांदुरा येथील प्राथमिक आरोग्य केंद्रात हलवण्यात आला. दरम्यान,अपघातात गंभीर जखमी झालेल्या दोन्ही बैलांची प्रकृती चिंताजनक आहे.

एसटीच्या कंत्राटी भरती प्रक्रियेत पारदर्शकता राखा : मंत्री प्रताप सरनाईक

■ मुंबई (दै. संध्या)

महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळात (एसटी) लवकरच सुमारे 13 हजार 980 चालक व यांत्रिकी कर्मचाऱ्यांची कंत्राटी पद्धतीने भरती करण्यात येणार आहे. ही भरती प्रक्रिया पूर्णपणे पारदर्शक, निष्पक्ष आणि निर्धारित नियमांनुसार पार पडावी. बाह्य संस्थेमार्फत होणारी उमेदवारांची निवड महामंडळाने निश्चित केलेल्या पात्रता निकषांनुसारच करण्यात यावी. तसेच, या प्रक्रियेत कोणत्याही उमेदवाराची फसवणूक होणार नाही, याची दक्षता एसटी प्रशासनाने घ्यावी, असे स्पष्ट निर्देश परिवहन मंत्री तथा एसटी महामंडळाचे अध्यक्ष प्रताप सरनाईक यांनी दिले आहेत.

एसटी महामंडळाच्या नावाचा गैरवापर करून काही खासगी संस्था गरजू व बेरोजगार तरुणांना नोकरीचे आमिष दाखवत त्यांच्याकडून अवैधरित्या पैसे उकळत असल्याच्या तक्रारी प्रशासनाला प्राप्त झाल्या आहेत. नोकरीच्या अपेक्षेने या संस्थांवर विश्वास ठेवणाऱ्या तरुणांची आर्थिक फसवणूक होत असून, अशा प्रकारांमुळे महामंडळाच्या प्रतिमेलाही धक्का पोहोचत आहे. काही व्यक्तींच्या गैरकृत्यांमुळे एसटी महामंडळाची जनमानसातील विश्वासार्हता बाधित होणे ही गंभीर बाब असल्याचे मंत्री सरनाईक यांनी नमूद केले. या पार्श्वभूमीवर,



एसटी महामंडळाच्या नावाखाली सुरू असलेल्या बेकायदेशीर प्रकारांची महामंडळाच्या सुरक्षा व दक्षता विभागामार्फत सखोल चौकशी करण्यात यावी. उमेदवारांची फसवणूक करणाऱ्या खासगी संस्था तसेच त्यांच्याशी संबंधित व्यक्तींची ओळख पटवून दोषींविरुद्ध तातडीने गुन्हे दाखल करावेत, असे निर्देशही त्यांनी दिले आहेत. भरती प्रक्रियेच्या नावाखाली बेरोजगार तरुणांची आर्थिक लूट करणाऱ्यांची कोणतीही गय केली जाणार नाही. भरती प्रक्रियेतील पारदर्शकता आणि विश्वासार्हता कायम राखण्याबरोबरच उमेदवारांच्या हिताचे संरक्षण करण्यास सर्वोच्च प्राधान्य द्यावे, असे मंत्री प्रताप सरनाईक यांनी स्पष्ट केले.

'मंत्र्यांची ही अवस्था तर सामान्यांचे काय?'

विजय वडेट्टीवार यांची सरकारवर टीका; मंत्री संजय शिरसाटांच्या घरावर झाला होता हल्ला

■ अमरावती (दै. संध्या)

शिवसेना शिंदे गटाचे आमदार व छत्रपती संभाजीनगर जिल्ह्याचे पालकमंत्री संजय शिरसाट यांच्या घरावर गुरुवारी रात्री अकराच्या सुमारास काही अज्ञात तरुणांनी हल्ला केल्याचा धक्कादायक प्रकार समोर आला आहे. यावर प्रतिक्रिया देत शिरसाट यांनी म्हटले की, माझी ही अवस्था असेल तर सर्वसामान्य जनतेचे काय? अशा शब्दांत त्यांनी हतबलता व्यक्त केली आहे. यावर आता काँग्रेसचे नेते विजय वडेट्टीवार यांनी टीका केली आहे. विजय वडेट्टीवार यांनी ट्विट करत म्हटले की, निष्क्रिय महायुती सरकारच्या काळात गुन्हेगारांना कायद्याचा धाक राहिला नाही. महिला, मुली तर सुरक्षित नाहीतच, पण आता मंत्रीही सुरक्षित नसल्याचे सामाजिक न्याय मंत्री संजय शिरसाट यांच्या घरावर झालेल्या हल्ल्यातून स्पष्ट झाले आहे. हल्ला झालेल्या मंत्र्यांनाच जर "माझी ही अवस्था असेल तर सर्वसामान्य जनतेचे काय?" अशी हतबलता व्यक्त करावी लागत असेल, तर महाराष्ट्रातील सामान्य नागरिक आणि महिलांच्या सुरक्षिततेची हमी कोण घेणार? खुद्द कॅबिनेट मंत्र्यांच्या घराबाहेर दारू पिऊन हल्ला होत असेल आणि त्यांना पोलिसांचे सहकार्य मिळत नसेल, तर राज्यातील कायदा आणि सुव्यवस्था



पूर्णपणे कोलमडली आहे, अशा शब्दांत विजय वडेट्टीवार यांनी महायुती सरकारवर हल्ला चढवला. दरम्यान, चंद्रपूर येथे हक्काच्या जमीनिसाठी एका विशेष शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी बोलताना विजय वडेट्टीवार म्हणाले की, पिढ्यान् पिढ्या कसत असलेल्या जमिनीवर हक्क मिळवण्यासाठी हजारो कुटुंबांचा संघर्ष सुरू आहे. वनहक्क आणि अतिक्रमणधारकांच्या जमिनींचे पट्टे हा केवळ महसुली किंवा प्रशासकीय प्रश्न नसून हजारो कुटुंबांच्या अस्तित्वाचा, स्वाभिमानाचा आणि पुढील पिढ्यांच्या भविष्याचा प्रश्न आहे. त्यामुळे २०२७ हे वर्ष वनहक्क आणि अतिक्रमणधारकांच्या प्रश्नांच्या निराकरणाचे वर्ष ठरवण्याचा निर्धार वडेट्टीवार यांनी व्यक्त केला. एकही पात्र लाभार्थी आपल्या हक्कापासून वंचित राहू नये, यासाठी प्रशासनाकडे सातत्याने पाठपुरावा करणार असल्याचेही त्यांनी स्पष्ट केले.

चंद्रपूर जिल्ह्यातील ब्रह्मपुरी, सिंदेवाही, चिमूर आणि सावली तालुक्यांतील वनहक्क, महसूल तसेच अतिक्रमणधारकांच्या प्रलंबित प्रश्नांना न्याय मिळवून देण्यासाठी ब्रह्मपुरी येथील स्वर्गीय राजीव गांधी सभागृहात विशेष शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. या शिबिराला हजारो लाभार्थ्यांनी उत्स्फूर्त प्रतिसाद दिला. या शिबिराला जिल्हाधिकारी वसुमना पंत, उपविभागीय अधिकारी पर्वणी पाटील, उपवनसंरक्षक कुमार स्वामी, उपवनसंरक्षक राजन तलमले, युवक काँग्रेसच्या प्रदेश सरचिटणीस शिवानी वडेट्टीवार, सहाय्यक उपवनसंरक्षक अरविंद जे., ब्रह्मपुरीचे तहसीलदार सतीश मासाळ, सावलीच्या तहसीलदार प्रांजली चिरडे, सिंदेवाहीच्या तहसीलदार विजया झाडे यांच्यासह विविध पदाधिकारी आणि अधिकारी उपस्थित होते.

शिवकालीन शस्त्रांचे जतन आणि संवर्धन करणे कर्तव्यच

मंत्री ॲड. आशिष शेलार : 'शिवशस्त्र शौर्यगाथा' प्रदर्शनाला जनतेने आवर्जून भेट देण्याचे आवाहन

- छत्रपती शिवाजी महाराज वस्तुसंग्रहालयात प्रदर्शनाचे दिमाखात उद्घाटन
- पुढील सहा महिने प्रदर्शन सर्वांसाठी खुले

■ मुंबई (दै. संध्या)

छत्रपती शिवाजी महाराजांची ऐतिहासिक वाघनखे, सेनासाहेब सुभा रघुजीराजे भोसले यांची तलवार यांसारखी ऐतिहासिक शस्त्रे आंतरराष्ट्रीय स्तरावर प्रयत्न करून, सर्व नियम आणि प्रक्रियांचे पालन करत महाराष्ट्रात परत आणणे हे आमचे कर्तव्यच होते. शिवकालीन शस्त्रांचे जतन आणि संवर्धन करणे ही आपली जबाबदारी आहे. त्यामुळे 'शिवशस्त्र शौर्यगाथा' प्रदर्शनाला भेट देऊन महाराष्ट्राचा हा जाज्वल्य इतिहास समजून घ्यावा, असे आवाहन सांस्कृतिक कार्य, माहिती तंत्रज्ञान व कृत्रिम बुद्धिमत्ता मंत्री ॲड. आशिष शेलार यांनी केले. सांस्कृतिक कार्य विभाग, पुरातत्त्व व वस्तुसंग्रहालय संचालनालय आणि छत्रपती शिवाजी महाराज वस्तुसंग्रहालय यांच्या संयुक्त विद्यमाने मुंबईतील छत्रपती शिवाजी महाराज वस्तुसंग्रहालयात आयोजित 'शिवशस्त्र शौर्यगाथा' या विशेष प्रदर्शनाचे उद्घाटन सांस्कृतिक कार्यमंत्री ॲड. शेलार यांच्या हस्ते झाले. यावेळी ते बोलत होते. कार्यक्रमाला सांस्कृतिक कार्य व मराठी भाषा विभागाचे सचिव डॉ. किरण कुलकर्णी, छत्रपती शिवाजी महाराज वस्तुसंग्रहालयाचे महासंचालक




डॉ. सभ्यासाची मुखर्जी, पुरातत्त्व व वस्तुसंग्रहालय संचालनालयाचे संचालक डॉ. तेजस गर्गे, उपसंचालक हेमंत दळवी, विश्वस्त सायरस गुजर आणि शाहीर नंदेश उमप आदी मान्यवर उपस्थित होते. कार्यक्रमाच्या प्रारंभी शाहीर नंदेश उमप यांनी पोवाड्याच्या माध्यमातून अफजलखान वधाचा ऐतिहासिक प्रसंग सादर केला. यावेळी 'दांडपट्टा' या पुस्तकाचे अनावरण करण्यात आले.

सांस्कृतिक कार्यमंत्री ॲड. शेलार म्हणाले की, शस्त्रे ही केवळ पराक्रमाची प्रतीके नसून ती धैर्य, अभियांत्रिकी कौशल्य, धातुशास्त्र आणि अचूक नियोजनाचे दर्शन घडवतात. छत्रपती शिवाजी महाराजांची वाघनखे हे नियोजनबद्ध विजयाचे प्रतीक आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वाखाली राज्य शासनाने आणि प्रशासकीय अधिकाऱ्यांनी आंतरराष्ट्रीय नियम, प्रथा व संकेतांचे पालन करून प्रदीर्घ वाटाघाटी आणि अथक प्रयत्नांतून हा ऐतिहासिक ठेवा महाराष्ट्रात परत आणला आहे.

सेनासाहेब सुभा रघुजीराजे भोसले यांच्या तलवारीबाबतचा अनुभव सांगताना ते म्हणाले की, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखालील केंद्र शासनाच्या सहकार्याने परराष्ट्र मंत्रालय, रिझर्व्ह बँक आणि भारतीय दूतावासाच्या आवश्यक परवानग्या तातडीने मिळविण्यात आल्या. योग्य मध्यस्थी आणि समन्वयातून ही तलवार महाराष्ट्राच्या आणि मराठी माणसाच्या मालकीची म्हणून सन्मानाने परत आणण्यात आली.

छत्रपती शिवाजी महाराजांच्या १२ गडकिल्ल्यांना युनेस्कोच्या जागतिक वारसा यादीत स्थान मिळवून देण्याच्या प्रक्रियेचाही उल्लेख करताना मंत्री ॲड.शेलार म्हणाले की, प्रधानमंत्री नरेंद्र मोदी आणि मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या प्रयत्नांतून सदस्य राष्ट्रांशी संवाद साधून भारताची बाजू मांडण्यात आली.

या प्रदर्शनात छत्रपती शिवाजी महाराजांची वाघनखे, रघुजीराजे भोसले यांची तलवार, सरसेनापती प्रतापराव गुजर यांची तलवार, खंडेराव गायकवाड यांची ढाल, सरदार रास्ते यांचा दांडपट्टा यांसह शिवकालीन आणि समकालीन अनेक ऐतिहासिक शस्त्रे पाहण्याची संधी नागरिकांना मिळणार आहे. हे प्रदर्शन पुढील सहा महिने सर्वांसाठी खुले राहणार असून, मराठी बांधवांसह इतिहासप्रेमी आणि देशभक्त नागरिकांनी या प्रदर्शनाला आवर्जून भेट द्यावी, असे आवाहन मंत्री ॲड. शेलार यांनी केले.



समृद्धी महामार्गावर भीषण अपघात

■ जालना (दै. संध्या)

माजी मंत्री राजेश टोपे नागपूरहून जालन्याकडे समृद्धी महामार्गाने प्रवास करत असताना महामार्गावर एका भीषण अपघाताची दुर्दैवी घटना घडली. अपघातामुळे अनेक वाहने रस्त्यावर थांबलेली असताना पाठीमागून भरधाव वेगाने येणाऱ्या कंटेनरने सुमारे 15 ते 20 वाहनांना जोरदार धडक दिली. या भीषण अपघातात अनेक प्रवासी जखमी झाले. या घटनेची गंभीरता लक्षात घेऊन राजेश टोपे साहेब यांनी तत्काळ मदतीसाठी पुढाकार घेतला. अपघातग्रस्त वाहनांमध्ये अडकलेल्या जखमी नागरिकांना सुरक्षितपणे बाहेर काढण्यासाठी तसेच त्यांना तातडीने रुग्णालयात उपचारासाठी पाठविण्याची व्यवस्था करण्यासाठी त्यांनी सहकार्य केले. समृद्धी महामार्गावर सातत्याने घडणारे अपघात ही अत्यंत चिंतेची बाब आहे. प्रवाशांच्या सुरक्षिततेचा प्रश्न ऐरणीवर आला असून, अशा दुर्घटना रोखण्यासाठी शासनाने तातडीने ठोस उपाययोजना करणे आवश्यक आहे. महामार्गावरील वाहतूक नियंत्रण, वेगमर्यादेची कठोर अंमलबजावणी, आपत्कालीन मदत यंत्रणा अधिक सक्षम करणे आणि अपघातप्रवण ठिकाणी विशेष सुरक्षा व्यवस्था उभारणे गरजेचे आहे.

संपादकीय

महागाईचा भडका

वाढत्या महागाईने सर्वसामान्यांच्या घर खर्चाचे गणित पूर्णपणे बिघडवले आहे. रोजंदारीवर काम करणाऱ्या मजुरांपासून, ते मध्यमवर्गीय कुटुंबापर्यंत, सर्वच वाढत्या महागाईने होरपळत आहेत. उत्पन्नाच्या तुलनेत जीवनावश्यक वस्तूच्या किमती वेगाने वाढत असल्याने नागरिकांची क्रयशक्ती कमी होत असून भविष्यासाठी बचत करणे ही कठीण झाले आहे. गुरुवारी जाहीर झालेल्या अधिकृत आकडेवारीनुसार ऑक्टोबर मध्ये देशातील किरकोळ महागाईचा दर ६. ०९ टक्क्यावर पोहोचला गेल्या दोन वर्षातील हा सर्वाधिक दर असून रिझर्व बँकेने निश्चित केलेल्या ६ टक्केच्या कमाल सहनशीलतेच्या मर्यादेलाही महागाईने ओलांडले आहे. अन्नधान्य महागाईचा दर तब्बल८. ९४ टक्क्यावर गेल्याने सर्वसामान्य कुटुंबावरील आर्थिक ताण अधिक वाढला आहे. या पार्श्वभूमीवर पुढील महिन्यात रिझर्व बँकेकडून व्याजदर वाढ केली जाण्याची शक्यता व्यक्त होत आहे. सांख्यिकी आणि कार्यक्रम अंमलबजावणी मंत्रालयाने जाहीर केलेल्या प्राथमिक आकडेवारीनुसार सप्टेंबर मध्ये किरकोळ महागाईचा दर ५. ५४टक्के होता. ऑक्टोबरमध्ये तो वाढून ६. ०९ टक्क्यावर पोहोचला. त्याचप्रमाणे अन्नधान्य महागाईचा दर सप्टेंबर मधील ७. ७४ टक्यावरुन ८. ९४ टक्क्यावर गेला. उत्पन्नात अपेक्षित वाढ होत नसताना वस्तूच्या किमती वाढत असल्याने नागरिकांना कमी वस्तू खरेदी करणे, आवश्यक खर्च पुढे ढकलणे, किंवा बचतीचा पैसा खर्च करणे भाग पडू शकते. देशातील राज्य आणि केंद्रशासित प्रदेशांचा विचार करता पॉडिचेरी मध्ये सर्वाधिक ७. ९६ टक्के तर मिझोराम मध्ये सर्वात कमी २. ८५टक्के किरकोळ महागाई आहे. महाराष्ट्रात हा जर ५. ८५टक्के तर केरळमध्ये ६. २२ टक्के आणि उत्तर प्रदेशात ६. ४० टक्के इतका नोंदवण्यात आला आहे. यावरून देशातील विविध राज्यांमध्ये महागाईचा परिणाम वेगवेगळ्या प्रमाणात होत असल्याचे स्पष्ट होते. ग्रामीण भागातील किरकोळ महागाईचा दर ६. ६३ टक्के तर शहरी भागातील दर ५. ४१ टक्के आहे. ग्रामीण भागात अन्नधान्य महागाई ९. ०९ टक्के तर शहरी भागात ८. ६८टक्के नोंदवण्यात आला आहे. अन्नधान्याच्या किमती वाढल्याने गरीब कुटुंबाच्या पोषण विषयक गरजावर परिणाम होण्याची शक्यता आहे. निवृत्तीवेतनावर अवलंबून असलेल्या ज्येष्ठ नागरिकांनाही वाढत्या खर्चामुळे आर्थिक स्वातंत्र्य टिकवणे कठीण होऊ शकते.मध्यमवर्गीय कुटुंबांना मुलांचे शिक्षण, आरोग्यावरील खर्च,आणि भविष्यासाठीची बचत, याचा फेरविचार करावा लागू शकतो. देशाचा सरासरी महागाई दर मात्र अशा कुटुंबिनिहाय आर्थिक अडचणीचे संपूर्ण चित्र स्पष्ट करत नाही. नागरिकांची क्रयशक्ती कमी झाल्यावर अनावश्यक वस्तू आणि सेवा वरील खर्चात कपात होऊ शकते.त्यांचा परिणाम कंपन्यांच्या उत्पन्नावर, गुंतवणुकीवर, आणि शेअर बाजारातील मूल्यांकनावरही होण्याची शक्यता आहे. महागाईचा दर दीर्घकाळ उच्च पातळीवर राहिल्यास कर्ज घेण्याचाही खर्च वाढू शकतो. महागाई नियंत्रण ठेवताना आर्थिक विकासाचा वेग कायम राखण्याचे आव्हान रिझर्व बँकेसमोर आहे. आरबीआयचे महागाईचे लक्ष्य चार टक्के असून त्यासाठी दोन ते सहा टक्क्याची सहनशील मर्यादा निश्चित करण्यात आली आहे. ऑक्टोबर मधील महागाईने ही कमाल मर्यादा ओलांडली असली तरी केवळ या आकडेवारीच्या आधारे पुढील व्याज दर वाढ निश्चित मानता येणार नाही. महागाईचा सामना करण्यासाठी केवळ व्याज दरामध्ये बदल करणे पुरेसे ठरणार नाही, कृषी उत्पादनाची साठवणूक व्यवस्था सुधारणे, वितरणाचा वेग वाढवणे, बाजारात वेळेवर हस्तक्षेप करणे, आणि गरजू कुटुंबांना आर्थिक मदत देणे, यासारख्या उपाययोजना ही महत्त्वाच्या ठरू शकतात. विशेषतः अन्नधान्याच्या पुरवठ्यातील अडथळे दूर केल्याशिवाय ग्राहकांना दिलासा मिळणे कठीण आहे.अर्थव्यवस्थेचा विकासदर वाढत असला तरी त्याचा लाभ सर्वसामान्य कुटुंबाच्या क्रयशक्तीत, आणि आर्थिक सुरक्षिततेत कितपत प्रतिबंधक होतो,हा महत्त्वाचा प्रश्न आहे. क उत्पन्नाच्या तुलनेत जीवनावश्यक वस्तू परवडण्याजोग्या झाल्या नाही तर विकासाची आकडेवारी सर्वसामान्यांच्या दैनंदिन आर्थिक संघर्षाला दिलासा देऊ शकणार नाही. कांदा लसूण आले यासारख्या दैनंदिन वापरातील जिन्नसाचे भाव बदलल्याने घरगुती स्वयंपाक घराला किंमत वाढीच्या कवेत घेतले आहे ऑक्टोबर मध्ये कांद्याचे किमतीमध्ये सर्वाधिक ११६.२२ टक्के वाढ झाली, त्या पाठोपाठ लसूण ६०. ७४टक्के, आले ४८.३२ टक्के, तर लिंबाच्या किमतीमध्ये ४७. ३० टक्के वाढ नोंदविण्यात आली. सप्टेंबर मध्ये या जिन्नसाच्या किमतीतील वाढीचा महागाई दरावर परिणाम दिसला होता बरोबरीने चांदीच्या दागिन्याच्या किमतीही वार्षिक तुलनेत ५२.३९ टक्के दराने वधारल्या. महागाईचा दबाव केवळ अन्नधान्य पुरता मर्यादित नसून ऊर्जा आणि कच्च्या मालाच्या, वाढत्या किमतीचे पडसाद आता मूळ महागाईतही उमटत असल्याचे अर्थतज्ञ सांगत आहेत. जलाशयांमधील पाणीसाठा कमी असल्याने रब्बी हंगामातील पिकांच्या उत्पादनावर परिणाम होण्याची शक्यता आहे. त्यामुळे अन्नधान्याच्या किमती आणखी वाढण्याची शक्यता आहे. पुढील काही महिन्यात महागाईचा दर ६ टक्केच्या वर राहण्याची शक्यता व्यक्त करण्यात येत आहे. वाढत्या महागाईला लगाम घालण्यासाठी रिझर्व बँकेने गेल्या महिन्यात तब्बल चार वर्षानंतर प्रथमच मुख्य व्याज दरात वाढ केली. रिझर्व बँकेच्या अंदाजानुसार ऑक्टोबर, डिसेंबर तिमाहीत महागाई दर सरासरी सहा टक्के राहील. तर चालू आर्थिक वर्षासाठीचा महागाईचा अंदाज ५टक्के वरून वाढवून तो ५. २टक्के करण्यात आला आहे.त्यामुळे मध्यवर्ती बँक आगामी पतधोरण बैठकामध्ये एकूण पन्नास आधार बिंदूची व्याज दरवाढ करू शकते. परिणामी रेपोदर सहा टक्क्यापर्यंत पोहोचण्याची शक्यता अर्थतज्ज्ञांनी व्यक्त केलेली आहे. कमी झालेला मान्सून आणि तीव्र "एल निनो" परिस्थितीमुळे शेती, व ग्रामीण मागणीवर जोखीम निर्माण झाल्याचा इशारा रिझर्व बँकेचे गव्हर्नर संजय मल्होत्रा यांनी दिला आहे. दरम्यान अमेरिका इराण युद्ध निवळण्याच्या आशेने खनिज तेलाचे दर ९२ डॉलरच्या आसपास खाली आल्याने काहीसा दिलासा मिळाला आहे. वाढत्या महागाई वरून सब चंगासी असे पंतप्रधान नरेंद्र मोदी आधी म्हणत असत आता ते सब महंगा सी झाले आहे अशी टीका काँग्रेसने केंद्र सरकारवर केली आहे. सरकारने केवळ आश्वासने देऊ नये,तर चलनवाढ नियंत्रणात आणावी. अशी जनतेची इच्छा आहे. असे काँग्रेसचे सरचिटणीस जयराम रमेश यांनी म्हटले आहे.दूध, तांदूळ, पीठ, डाळी, खाद्यतेल, कांदे, बटाटे, टोमॅटो, साखर, तूप आणि दररोज लागणाऱ्या आवश्यक वस्तूंचे भाव गगनाला भिडले आहेत. असे त्यांनी समाज माध्यमावर नमूद केले आहे. काँग्रेसचे काळात महागाईचे विरोधात प्रचार करून सत्तेत आलेल्या मोदी सरकारने चलनवाढीचे गणित असे आहे की केवळ गरीब,आणि मध्यमवर्गीय, जनतेलाच महागाईचे परिणाम सहन करावे लागतात. दररोज वस्तूच्या वाढणाऱ्या किमतीमुळे प्रत्येक घराचे बजेट कोलमडले आहे. भाजपाने चांगल्या दिवसाचे आश्वासन दिले होते.महागाईमुळे जनतेला दररोज धक्के बसत आहेत. निष्ठूर मोदी सरकारच्या धोरणामुळे गरीब व मध्यमवर्ग याच्या खिशाला झळ बसत असल्याची टीका काँग्रेसने केली आहे.

सोमेश्वरने पहिला हप्ता जमा करावा - सतिश काकडे

■ सोमेश्वरनगर (दै. संध्या)



सोमेश्वर सहकारी साखर कारखाना १५ ऑक्टोंबर २०२६ रोजी सुरू झाला आहे. आज अखेर २६०१३४ एवढे गाळप होवुन २८५३५० एवढी साखर पोती तयार झालेली आहेत.तसेच पुणे व आसपासचे जिल्हे पाहता सर्वात जास्त रिकव्हरी म्हणजे ११.०४ सोमेश्वर कारखान्याची आहे. गेल्या आठवड्यात स्वाभिमानी शेतकरी संघटना व आम्हा सर्व शेतकऱ्यांचे नेते श्री. राजु शेट्टी साहेब यांनी सध्याची साखरेची व उसाची परिस्थिती पाहता पश्चिम भागातील सर्वच कारखान्यांनी पहिला हप्ता ४५००/-प्र.मे.टन द्यावा अशी मागणी केली होती.परंतु कारखानदार व सरकार या मागणीसाठी प्रतिसाद देत नसल्याने आंदोलन करून पुणे- बेंगलोर रस्ता वाहतुक बंद करून सातारा,सांगली,कोल्हापुर या जिल्हयातील सर्वच कारखाने बंद पाडले होते.त्यावर तोडगा म्हणुन सरकार व स्वाभिमानी शेतकरी संघटना यांच्यात चर्चा होवुन पहिला हप्ता ३९००/- रूपये देण्यात यावा असा निर्णय झाला.या सर्व बाबी सोमेश्वरच्या संचालक मंडळास माहीत असतीलच मी व कृती समितीचे सदस्य कारखान्याचे संस्थापक सभासद असल्यामुळे पंचकृशीतील भौगोलीक परिस्थिती पाहुन शेतकरी सभासदांचे नुकसान होवु नये म्हणुन राजु शेट्टी साहेब यांची परवानगी घेवुन शेतकरी कृती समितीने कारखाना चालू ठेवणे विषयी कुठेही अडचण निर्माण केली नाही.

सोमेश्वर कारखान्याची परिस्थिती चांगली असल्याने नवीन संचालक मंडळाने तात्काळ संचालक मंडळाची मिटींग घेवुन ३९००/- रू प्र.मे.टन पहिला हप्ता देवुन पुणे जिल्हा व आसपासच्या जिल्ह्यातील कोंडी फोडावी. शेतकरी कृती समितीने नवीन संचालक मंडळाला पुर्ण ताकदीनिशी पाठींबा दिल्यानेच चांगल्या मताधिक्याने आपला पॅनेल निवडुन आला आहे याचा विसर संचालक मंडळाला पडु देवु नये अशीही विनंती अपणास करण्यात येत आहे. वास्तविक कायद्यानुसार उस तुटल्यानंतर १४ दिवसात उस बील देणे बंधनकारक आहे.परंतु १४ दिवसात उस बील न दिल्यास त्यावर १५% प्रमाणे व्याज द्यावे लागते असे असतानाही कृती समिती सर्व विचार करता संचालक मंडळाला व्याजाची रक्कम न मागता संचालक मंडळाला पैशांची पुर्तता करण्या करीता दि. २५/११/२०२६ पर्यंत वेळ देत आहे.परंतु २५/११/२०२६ नंतरही संचालक मंडळाने यावर कोणताही निर्णय न घेतल्यास शेतकरी कृती समिती व मा.राजु शेट्टी साहेब अध्यक्ष स्वाभिमानी शेतकरी संघटना यांच्या पुढाकाराने कृती समितीस नाईलाजास्तव काटाबंद आंदोलन करावे लागेल. संचालक मंडळास काही अडचण असल्यास कृती समितीस चर्चेसाठी बोलाविल्यास आम्हीही चर्चेस तयार आहोत व चर्चेतुन मार्ग काढण्यास आम्ही तयार आहोत. परंतु ही वेळ संचालक मंडळाने येवु देवु नये अशी शेतकरी कृती समितीच्या वतीने विनंती करण्यात येत आहे. राज्याच्या उपमुख्यमंत्री श्रीमती सुनेत्राताई पवार सो यांनीही पहिला हप्ता 3900/-रूपये प्र. मे. टन देण्यात यावा असे निर्देश संचालक मंडळाला करावेत अशी नम्र विनंती शेतकरी कृती समितीच्या वतीने करण्यात येत आहे.

रात्रपाळीत कॉपर पाईपचे तुकडे करून महिनाभर चोरी


■ नाझरे सुपे पुरंदर (दै. संध्या)

ज्या कंपनीत रोजीरोटी कमावली, त्याच कंपनीच्या मालमत्तेवर डल्ला मारणाऱ्या दोन तरुण कामगारांचा सासवड पोलिसांनी पर्दाफाश केला आहे. सासवड येथील किर्लोस्कर न्यूमॅटिक कंपनीत रात्रीच्या वेळी तांब्याचे पाईप कापून त्यांचे तुकडे लंपास करणाऱ्या या दोघांना पोलिसांनी ताब्यात घेतले असून, त्यांच्याकडून सुमारे साडेतेरा किलो वजनाचे, ५४ हजार ७५६ रुपये किमतीचे तांब्याचे तुकडे जप्त करण्यात आले आहेत. मेघराज दत्तात्रय फडतरे (वय २३, रा. बोपगाव, ता. पुरंदर) आणि प्रकाश दीपक निरगुडे (वय १९, रा. शिंपी आळी, सासवड) अशी अटक करण्यात आलेल्या संशयितांची नावे आहेत. कंपनीचे सुरक्षा अधिकारी अरुण मनोहर मेदने (वय ३८, मूळ रा. सारोळा, पो. पळस, जि. धाराशिव) यांनी याबाबत पोलिसांत तक्रार दिली होती. २८ सप्टेंबर ते २७ ऑक्टोबर या महिनाभराच्या काळात रात्री साडेनऊ ते साडेअकराच्या दरम्यान वेळोवेळी कंपनीतील तांब्याचे पाईप गायब होत असल्याचे निदर्शनास आले. कंपनीतीलच कामगार यामागे असल्याचा संशय बळावल्याने ३० ऑक्टोबर रोजी सासवड पोलिस ठाण्यात भारतीय न्याय संहितेच्या कलम ३०६ व ३(५) अन्वये गुन्हा (गु. र. नं. ५४५/२०२६) दाखल करण्यात आला. गुन्हा दाखल होताच सासवड पोलिसांच्या गुन्हे शोध पथकाने घटनास्थळ गाठले. चोरीची पद्धत समजून घेत पथकाने कंपनीतील सीसीटीव्ही चित्रीकरणाची बारकाईने छाननी केली आणि त्याला तांत्रिक तपासाची जोड दिली. यातून दोघांभोवती संशयाचे जाळे घट्ट होत गेले. पोलिसांनी त्यांना ताब्यात घेऊन विश्वासात घेत चौकशी केली असता, दोघांनीही गुन्ह्याची कबुली दिली. त्यानंतर चोरलेले तांब्याचे तुकडे त्यांच्याकडून हस्तगत करण्यात आले. ही कारवाई पुणे ग्रामीणचे पोलिस अधीक्षक संदीपसिंह गिल, अपर पोलिस अधीक्षक शुभम कुमार, बारामती विभागाचे अपर पोलिस अधीक्षक गणेश बिरादार, भोर विभागाचे उपविभागीय पोलिस अधिकारी राजेंद्रसिंह गौर आणि सासवडचे पोलिस निरीक्षक संतोष घोळवे यांच्या मार्गदर्शनाखाली सहायक पोलिस निरीक्षक शंकर राऊत, हवालदार गणेश सोनवणे, दत्तात्रय काळे, गोकुळ हिप्परकर, कॉन्स्टेबल तुषार लोंढे, किरण तुपे, प्रवीण शेंडे व प्रणय मखरे यांच्या पथकाने केली.

अवैध दारू विरुद्ध विशेष मोहीम राबवून वेगवेगळ्या ठिकाणी छापे

रुपये २१,३२०/- किंमतीचा मुद्देमाल जप्त करून केली कारवाई

■ बारामती (दै. संध्या)



बारामती तालुक्यातील मौजे पारवडी गावचे हद्दीत होले हार्डवेअर दुकानाचे पाठीमागे इसम नामे सोमनाथ भगवान बेंगारे, रा. पारवडी, ता. बारामती, जि.पुणे याचेवर छापा टाकला असता त्याचे ताब्यातुन सिमला संत्रा,टेंगो पंच वर्णनाच्या बाटल्या किंमत 3,800/- रूपये किंमतीचा मुद्देमाल जप्त करुन गुन्हा दाखल करण्यात आला असुन सदर गुन्ह्याचा पुढील तपास राजीव शिंदे सहा.पोलीस फौजदार करीत आहेत. तसेच मौजे वंजारवाडी, ता. बारामती, जि.पुणे गावचे हद्दीत बारामती कुंभारकर वस्ती येथे बिल्डर अमृततुल्य टपरीच्या पाठीमागे आडोशात इसम नामे नारायण दिलीप कदम, रा. कुंभारकरवस्ती वंजारवाडी, ता. बारामती जिल्हा पुणे याच्यावर छापा टाकला असता त्याचे ताब्यातून देशी दारू टँगो पंचच्या बाटल्या असा एकूण 1,080/- रुपये किमतीचा मुद्देमाल जप्त करून गुन्हा दाखल करण्यात आला आहे.सदर गुन्हयाचा पुढील तपास पोलीस अंमलदार दीपक दरेकर हे करीत आहेत. तसेच मौजे सोनगाव ता.बारामती जिल्हा पुणे गावचे हद्दीत सोनगाव झारगडवाडी रोडचे कडेला एका पत्र्याचे शेडमध्ये इसम नामे दीपक राजेंद्र जाधव रा.जारकरवाडी ता.बारामती जिल्हा पुणे याचेवर छापा टाकून कारवाई केली असता त्याचे ताब्यातून देशी-विदेशी दारूच्या बाटल्या असा एकूण 15,210/- रुपये किमतीचा मुद्देमाल जप्त करून गुन्हा दाखल करण्यात आला आहे सदर गुन्हयाचा पुढील तपास संतोष बडे सहा.पोलीस फौजदार हे करीत आहेत. तसेच मौजे सोनगाव ता.बारामती जि. पुणे गावचे हद्दीत इसम नामे सोमनाथ दादाराव मदने रा.झारगडवाडी,ता. बारामती जिल्हा पुणे याचेवर छापा टाकून कारवाई केली असता त्याचे ताब्यातून देशी दारू टँगो पंच व एक गावठी हातभट्टी दारूचे कॅन असे एकूण 940/- रूपये किमतीचा मुद्देमाल जप्त करून गुन्हा दाखल करण्यात आला असून गुन्हयाचा पुढील तपास सुजय जगताप पोलीस हवालदार हे करीत आहेत.

सदरची कामगिरी मा.नारायण पवार, वरिष्ठ पोलीस निरीक्षक बारामती तालुका पोलीस स्टेशन यांचे मार्गदर्शनाखाली पोसई श्रीरंग शिंदे, पोलीस अंमलदार संतोष बडे, सुधीर काळे, संतोष कांबळे, अमोल खाडे, विठ्ठल तरंगे, महिला पोलीस अंमलदार आफरीन शेख यांनी केली आहे.

बारामतीत MH42CA वाहनांची नवी मालिका सुरू

आकर्षक पसंतीच्या क्रमांकांसाठी १९ नोव्हेंबरपासून अर्ज स्वीकारणार

■ बारामती (दै. संध्या)

खासगी चारचाकी वाहनांच्या (LMV-NT) नवीन नोंदणी क्रमांकांची मालिका MH42CA उपप्रादेशिक परिवहन कार्यालय, बारामती येथे १९ नोव्हेंबर २०२६ पासून सुरू करण्यात येणार आहे. या मालिकेतील आकर्षक व पसंतीचे वाहन क्रमांक आरक्षित करण्यासाठी इच्छुक वाहनधारकांना अर्ज करण्यासाठी खिडकी क्रमांक २७ उपलब्ध करून देण्यात आली आहे. इच्छुक अर्जदारांनी १९ नोव्हेंबर रोजी सकाळी १०.३० ते दुपारी ३ वाजेपर्यंत विहित नमुन्यातील अर्ज, आवश्यक कागदपत्रे आणि निर्धारित शुल्काचा धनाकर्ष (डीडी) कार्यालयात जमा करणे आवश्यक आहे. हा डीडी 'Dy. R.T.O., Baramati' यांच्या नावे राष्ट्रीयीकृत बँकेचा असावा. अर्जासोबत वाहनधारकाच्या पत्त्याच्या पुराव्याची साक्षांकित प्रत तसेच आधार कार्ड, निवडणूक ओळखपत्र, पासपोर्ट किंवा पॅनकार्ड यांसारख्या ओळखपत्रांपैकी छायाचित्र असलेल्या कागदपत्राची साक्षांकित प्रत जोडणे बंधनकारक आहे. १९ नोव्हेंबर रोजी एकाच पसंतीच्या नोंदणी क्रमांकासाठी एकापेक्षा अधिक अर्ज प्राप्त झाल्यास संबंधित अर्जदारांची यादी २० नोव्हेंबर रोजी सकाळी १० वाजता कार्यालयाच्या सूचना फलकावर प्रसिद्ध करण्यात येणार आहे. त्यानंतर संबंधित क्रमांकांचा वाटप निर्णय सीलबंद लिफाफा पद्धतीने लिलावाद्वारे घेतला जाणार आहे. लिलावात सहभागी होण्यासाठी अर्जदारांना विहित शुल्काव्यतिरिक्त स्वतःच्या इच्छेनुसार देऊ केलेल्या जादा रकमेचा स्वतंत्र डीडी २० नोव्हेंबर रोजी दुपारी ३.३० वाजेपर्यंत कार्यालयात जमा करावा लागणार आहे. या डीडीवर अर्जदाराचे नाव आणि इच्छित नोंदणी क्रमांक स्पष्टपणे नमूद करणे आवश्यक आहे. २० नोव्हेंबर रोजी दुपारी ४ वाजता सहायक प्रादेशिक परिवहन अधिकारी यांच्या उपस्थितीत संबंधित अर्जदार किंवा त्यांच्या अधिकृत प्रतिनिधीसमक्ष सीलबंद लिफाफे उघडण्यात येणार आहेत. पात्र अर्जदारांपैकी सर्वाधिक जादा रकमेचा डीडी सादर करणाऱ्या अर्जदाराला संबंधित पसंतीचा नोंदणी क्रमांक वितरित करण्यात येईल. लिलावाच्या नियोजित वेळी अर्जदार किंवा त्यांचा अधिकृत प्रतिनिधी उपस्थित नसल्यास संबंधित अर्जाचा लिलाव प्रक्रियेत विचार केला जाणार नाही. एकाच नोंदणी क्रमांकासाठी अर्ज केलेले सर्व अर्जदार अनुपस्थित राहिल्यास तो क्रमांक सर्वांसाठी खुला करण्यात येईल. एकदा आरक्षित केलेला नोंदणी क्रमांक बदलून दिला जाणार नाही. तसेच निर्धारित मुदतीत वाहन सादर करून नोंदणी प्रक्रिया पूर्ण न केल्यास संबंधित क्रमांकाचे आरक्षण आपोआप रद्द होईल.

भरलेले शुल्क परत मिळणार नाही किंवा त्याचे समायोजनही केले जाणार नाही. ही संपूर्ण लिलाव प्रक्रिया राबविणे, स्थगित करणे किंवा रद्द करण्याचे अधिकार सहायक प्रादेशिक परिवहन अधिकारी, बारामती यांच्याकडे राखीव राहतील. त्यामुळे MH42CA या नव्या मालिकेतील आकर्षक व पसंतीचे क्रमांक मिळवू इच्छिणाऱ्या वाहनधारकांनी विहित मुदतीत अर्ज करून या संधीचा लाभ घ्यावा, असे आवाहन उपप्रादेशिक परिवहन अधिकारी राहुल गावडे यांनी केले आहे.

जेजुरी बस स्थानकावर दोन महिलांचे साडे चार तोळे सोन्याचे दागिने चोरी


■ जेजुरी (दै. संध्या)



सोमवती अमावस्येला खंडोबाच्या दर्शनासाठी आलेल्या दोन महिलांचे साडेचार तोळे सोने जेजुरी एसटी स्टँडवर अज्ञात चोरट्यांनी लंपास केल्याची घटना सोमवती यात्रेत घडली आहे. सोमवारी सोमवती यात्रेसाठी जेजुरीच्या खंडोबा दर्शनासाठी आलेल्या महिला जेजुरी एसटी बसस्थानकावर पुण्याकडे जाणाऱ्या बसमध्ये चढत असताना गर्दीचा फायदा घेत दोन महिलांच्या हातातील सोन्याच्या बांगड्या अज्ञात चोरट्यांनी लंपास केल्या आहेत. या दोन्ही बांगड्यांची किंमत २ लाख २५ हजार रुपये असल्याची माहिती तक्रारीत देण्यात आली आहे. मिळालेल्या माहितीनुसार, ९ नोव्हेंबर रोजी सकाळी शोभा मारणे या पतीसोबत जेजुरीतील खंडोबा दर्शनासाठी आल्या होत्या. दर्शनानंतर दुपारी सव्वा एकच्या सुमारास त्या पुण्याला जाण्यासाठी एसटी बसमध्ये चढत असताना दरवाजात मोठी गर्दी होती. याच गर्दीचा फायदा घेत अज्ञात चोरट्याने त्यांच्या हातातील सव्वादोन तोळे वजनाची सोन्याची बांगडी कशाच्या तरी सहाय्याने कापून चोरून नेल्याची घटना घडली. तसेच पुण्यातील कृष्णाबाई घुबे या ६६ वर्षीय महिलेच्या हातातील दोन तोळे वजनाची, सोन्याची बांगडी चोरीला गेल्याचे समोर आले आहे. मागील जून महिन्यात झालेल्या सोमवती यात्रेत गर्दीचा फायदा घेऊन अनेक भाविकांच्या गळ्यातील सुमारे 42 तोळे सोन्याचे दागिने चोरट्यांनी लंपास केले होते. या पार्श्वभूमीवर जेजुरी पोलिसांनी 9 नोव्हेंबर दरम्यान सोमवारी सोमवती यात्रे दरम्यान 10 संशयित चोरट्यांना ताब्यात घेऊन त्यांच्यावर प्रतिबंधात्मक कारवाई केली होती. त्यामुळे या यात्रेत चोरीच्या घटनेला आळा बसला.मात्र जेजुरी बस स्थानकावर दोन महिलांना चोरट्यांनी लक्ष करून दागिन्यांची चोरी केली.

नगरपालिकेच्या मालकीचा भूखंड चोरीला गेल्याचा आरोप

नगरपरिषद कार्यालयासमोर बहुजन हक्क परिषदेचे हलगीनाद आंदोलन



■ जेजुरी (दै. संध्या)

जेजुरी नगरीच्या मध्य वस्तीमधील आणि बसस्थानका लगत नगरपरिषदेची मालकी असलेला गट न.४४७ (जुना गट न.१०९२) क्षेत्र ३९ गुंठे हा भूखंड चोरीला गेला असल्याचा आरोप करत शुक्रवारी (दि.१३)बहुजन हक्क परिषदेच्या वतीने नगरपालिका कार्यालयासमोर पोतराजासह हलगीनाद आंदोलन करत प्रशासनाचे लक्ष वेधून घेतले. याबाबत सविस्तर वृत्त असे की, बस स्थानकालगत गट न.४४८ (जुना गट न १०९३ ,सिटीसर्व्हे न.१५११)क्षेत्र १२१ गुंठे हा खाजगी मालकीचा भूखंड असून या लगतच नगरपालिकेच्या मालकीचा गट न.४४७ हा भूखंड आहे . मागील काही वर्षापासून खाजगी मालकीच्या जागांची गुंठेवारीने खरेदी विक्री झाली आहे ,व्यवसायिक इमारती झाल्या आहेत .मात्र ,खरेदी खाजगी मालकीच्या जागेची आणि व्यवसायिक इमारती नगरपरिषद मालकीच्या भूखंडा मध्ये असा प्रकार झाल्याचा तसेच या गंभीर प्रकाराकडे नगरपरिषद प्रशासन डोळेझाक करण्यात आल्याचा आरोप बहुजन हक्क परिषदेचे शहराध्यक्ष यशवंत दोडके यांनी केला आहे. नगरपरिषदेच्या गट न.४४७ या भूखंडाची शासकीय मोजणी करून हद्द कायम करण्यात यावी.

RNI No. 1663/1957 (DAILY SANDHYA) |
दैनिक संध्या पब्लिकेशन्स प्रा. लि. यांच्या मालकीचे हे दैनिक मुद्रक व प्रकाशक ज्योती नाळे यांनी सामना प्रेस (प्रबोधन प्रकाशन) सिंहगड रोड, वडगांव खुर्द पुणे-४११०४१ येथे छापून, १०३८ आकार भवन, दुसरा मजला, टिळक रोड, पुणे - ४११००२ येथे प्रसिद्ध केले. संपादिका : ज्योती नाळे (पी.आर.बी. कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी.) (फोन : ०२०-२४४७९२९२)
Daily "Sandhya" News paper is owned by Dainik Sandhya Publications Pvt. Ltd. Printed & Published by Jyoti Nale, Printed at Saamana Press (Prabodhan Prakashan) Pvt. Ltd. Sihagad Road, Vadgaon Khurd, Pune 411 041, published at 1038, Aakar Bhavan, Tilak Road, Pune 411002. Editor - Jyoti Nale.

थोडक्यात पण महत्वाचे



सीआयआरटीची ६० वर्षांची वाटचाल; वाहन सुरक्षेसोबत आता सायबर सुरक्षेवरही भर

पुणे : दैनिक संध्या

वाहन चाचणी, प्रमाणन आणि परिवहन क्षेत्रातील अग्रगण्य संस्था केंद्रीय रस्ते परिवहन संस्था (सीआयआरटी), पुणे यांनी हीरक महोत्सवी वर्षाचा (२०२६-२७) आराखडा सादर केला. वाहन सुरक्षा आणि रस्ता सुरक्षेसोबतच आता सायबर सुरक्षेच्या क्षेत्रातही संस्थेने महत्त्वपूर्ण पाऊल टाकले आहे. यानिमित्त भोसरी येथील संस्थेच्या परिसरात अत्याधुनिक ऑटोमोटिव्ह सायबर सुरक्षा पेनिट्रेशन टेस्टिंग प्रयोगशाळेची माहिती देण्यात आली. तसेच पत्रकारांसाठी प्रयोगशाळेची मार्गदर्शित भेट आयोजित करण्यात आली. १९६७ मध्ये स्थापन झालेल्या सीआयआरटीने गेल्या सहा दशकांत वाहन चाचणी, प्रमाणन, होमोलोगेशन आणि परिवहन क्षेत्रातील प्रशिक्षणाद्वारे महत्त्वपूर्ण योगदान दिले आहे. संस्थेच्या १० प्रयोगशाळांना एनएबीएल मान्यता असून, भारत एनसीएपीच्या कमांड अँड कंट्रोल सेंटरची जबाबदारीही संस्था सांभाळत आहे. सीआयआरटीचे संचालक डॉ. देवेंद्र सिंह यांनी सांगितले की, आधुनिक कनेक्टेड, इलेक्ट्रिक आणि स्वयंचलित वाहनांच्या वाढत्या वापरामुळे डिजिटल प्रणालींची सुरक्षा अत्यंत महत्त्वाची झाली आहे. ऑटोमोटिव्ह सायबर सुरक्षा विभागाचे प्रमुख फारुख मखदूम यांनी नव्या प्रयोगशाळेमुळे वाहन उत्पादक आणि पुरवठादारांना सायबर सुरक्षा चाचणी, त्रुटींचे मूल्यांकन आणि आंतरराष्ट्रीय मानकांनुसार परीक्षण सुविधा उपलब्ध होणार असल्याचे सांगितले. सप्टेंबर २०२६ ते सप्टेंबर २०२७ या कालावधीत राष्ट्रीय तांत्रिक कार्यशाळा, व्ही२व्ही/व्ही२एक्स जनजागृती, सायबर सुरक्षा प्रशिक्षण, रस्ता सुरक्षा अभियान आणि राष्ट्रीय तांत्रिक परिषद अशा विविध उपक्रमांचे आयोजन करण्यात येणार आहे. सप्टेंबर २०२७ मध्ये हीरक महोत्सवी प्रदर्शन आणि राष्ट्रीय परिषदेने या वर्षभराच्या कार्यक्रमांची सांगता होणार आहे. यावेळी सीआयआरटीचे संचालक डॉ. देवेंद्र सिंह यांच्यासह संस्थेचे विविध विभागप्रमुख आणि वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते.



भाऊबीजेनिमित्त आरपीआयच्या खिश्चन आघाडीतर्फे ५०० महिलांना साडीवाटप

■ सण-उत्सवांतून सामाजिक विद्वेष दूर करण्याची प्रेरणा घ्यावी : बाळासाहेब जानराव यांचे आवाहन


पुणे : दैनिक संध्या

दीपावलीचा सण अंधाराकडून प्रकाशाकडे जाण्याची प्रेरणा देतो, तर भाऊबीजेसारखा सण हेवेदावे विसरून परस्परांमध्ये बंधुभाव निर्माण करण्याचा संदेश देतो. सण-उत्सवांचा योग्य बोध घेऊन समाजातील विद्वेष दूर करण्याची प्रेरणा सर्वांनी घ्यावी, असे आवाहन रिपब्लिकन पक्षाचे प्रदेश महासचिव बाळासाहेब जानराव यांनी केले. भाऊबीजेनिमित्त रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया (आठवले गट) च्या खिश्चन आघाडीच्या वतीने घोरपडी गाव येथील संविधान चौकात सुमारे ५०० महिला भगिनींना साडीवाटप करण्यात आले. या कार्यक्रमात जानराव बोलत होते. त्यांच्या हस्ते तसेच पुणे शहराध्यक्ष संजय सोनवणे यांच्या हस्ते महिलांना साड्यांचे वाटप करण्यात आले. जानराव म्हणाले, सध्याच्या काळात विविध कारणांमुळे समाजातील दरी रुंदावत आहे. व्यक्तिगत प्रगतीसोबतच सामाजिक प्रगती साधायची असेल, तर परस्परांमधील संघर्ष टाळून एकोप्याने पुढे जाण्याची गरज आहे. दीपावली आणि भाऊबीजेसारखे सण सामाजिक सलोखा, बंधुभाव आणि एकतेचा संदेश देतात. या सणांमधून प्रेरणा घेऊन समाजात सकारात्मक वातावरण निर्माण करण्यासाठी सर्वांनी प्रयत्न करावेत. कार्यक्रमाचे आयोजन रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया (आठवले गट) खिश्चन आघाडीचे पुणे शहराध्यक्ष क्रिस्तोफर राजमनी यांनी केले.

सह्याद्रीच्या कपारीत गर्जना करणारा आदिवासींचा वाघ

■ सह्याद्रीच्या कपारीत गर्जना करणारा आदिवासींचा वाघ : राघोजी भांगरे

■ आदिवासी विकास मंत्री अशोक वुईके



■ पुणे (दै. संध्या)

भारताच्या इतिहासामध्ये डोकावून पाहत असताना राघोजी रामजी भांगरे या आदिवासी समुदायातील आद्यक्रांतिकारकांनी १८५७ च्या उठावाच्याही आधी इंग्रजांना सळो की पळो करून सोडले. आदिवासींच्या इतिहासातील सुवर्ण अक्षरात लिहिले जावे असे ते एक महान क्रांतिकारक होऊन गेले. तत्कालीन काळामध्ये राघोजी भांगरे यांच्या नावाने सह्याद्रीच्या दऱ्याखोऱ्यामध्ये आदिवासींचा बुलंद आवाज घुमत होता. इंग्रजांच्या विरोधात लढा जर कोणी दिला असेल आणि आदिवासी समुदायांमध्ये सर्वप्रथमता क्रांतीची ज्योत जर कोणी पेटवली असेल तर ती राघोजी भांगरे यांनी पेटवली. ज्यामुळे आदिवासी समाजाने स्वतःला स्वातंत्र्य युद्धाच्या अग्नीत झोकून दिले.

जुलमी ब्रिटिश सत्तेच्या विरोधामध्ये सिंहगर्जना करणाऱ्या आदिवासी आद्य क्रांतिकारक राघोजींच्या जीवन कार्यावर प्रकाश टाकणे ही काळाची गरज आहे. त्यांनी जो जिक्रिरीने लढा दिला तो लढा रात्रीच्यावेळी आकाशामध्ये शुक्रतारा जसा टपोर दिसावा, अगदी त्याप्रमाणे त्यांचं नाव व कार्य आपल्याला दिसेल.

राघोजी भांगरे यांचा जन्म ८ नोव्हेंबर १८०५ रोजी अहिल्यानगर (अहमदनगर) जिल्ह्यातील अकोले तालुक्यातील देवगाव येथे आदिवासी समाजातील महादेव कोळी कुटुंबात झाला. त्यांचे वडील रामजी भांगरे हे देखील शूर योद्धे आणि किल्लेदार होते. आदिवासी समाजावर होत असलेला अत्याचार दूर करण्यासाठी विविध भागातून आदिवासी लोकांना अन्यायातून सुटका करण्यासाठी आदिवासी समाजात वीर पुरुषाचा जन्म झाला. आदिवासी समाजाच्या जखमांवर मलम लावण्याचे काम राघोजींच्या कार्यामुळे झाले.

अहिल्यानगर जिल्ह्यातील अकोले तालुक्यात असलेला रतनगड हा सह्याद्रीच्या डोंगररांगांतील अत्यंत मोक्याचा किल्ला आहे. महादेव कोळी हा आदिवासी समाज परंपरागतपणे या किल्ल्याचा रक्षक होता. ब्रिटिशांनी जेव्हा रतनगड ताब्यात घेण्याचा प्रयत्न केला, तेव्हा राघोजींचे वडील रामजी भांगरे यांनी गोविंदराव खाडे आणि रामा किरवा यांच्या मदतीने १८२१ मध्ये रतनगडावर जाहीर बंड केले. त्या बंडात राघोजी भांगरे हे त्यांच्या वडीलासोबत वयाच्या १६ व्या वर्षी सहभागी झाले होते. इंग्रज अधिकारी कॅप्टन मॅकिंटॉश याने ५,००० सैन्य घेवून गडावर चाल केली. पण रामजी भांगरे यांच्या अवघ्या ५०० आदिवासी सैनिकांनी त्यांना कडवी झुंज दिली. मॅकिंटॉशला मदतीसाठी आणखी २,००० सैन्य मागवावे लागले. या युद्धात आदिवासींनी इंग्रजांचे सुमारे ३,५०० सैनिक मारले गेले. हे युद्ध रोघोजी भांगरे यांनी पाहिलेले पहिले युद्ध होते. मात्र शेवटी रामजी भांगरे यांना अटक होऊन काळ्या पाण्याची शिक्षा झाली. पिता आणि पुत्र एकाच युद्धामध्ये रणांगणावर आपले शौर्य दाखवीत होते. असा दुर्मिळ आणि एकमेकाद्वितीय प्रसंग इतिहासाच्या पानावर क्वचितच पाहायला मिळतो.

वडिलांच्या पावलावर पाऊल ठेवत राघोजी भांगरे आणि त्यांचे बंधू बापूजी भांगरे यांनी महादेव कोळी व भिल्ल तरुणांच्या टोळ्या संघटित केल्या. १८३८ मध्ये त्यांनी रतनगड आणि सनगर किल्ल्यांच्या परिसरात इंग्रज सत्तेविरुद्ध मोठा उठाव केला. राघोजींना सह्याद्रीच्या दऱ्याखोऱ्यांची आणि चोर वाटांची संपूर्ण माहिती होती. ते इंग्रजी फौजांवर अचानक छापे टाकून डोंगरात गायब होत असत. हे बंड मोडून काढण्यासाठी कॅप्टन मॅकिंटॉशने गडाकडे जाणारे सर्व घाट, रस्ते आणि जंगल मार्ग रोखून धरले. इंग्रजांनी रस्ते अडवल्यानंतरही राघोजी मागे हटले नाहीत. त्यांनी इंग्रजांच्या ताब्यातील तीन गावांवर हल्ला करून सरकारी तिजोरी लुटली आणि जुलमी सावकारांची कागदपत्रे जाळून टाकली. पेशवाईमध्ये आदिवासी समाजाला वतनदारीचे हक्क मिळालेले होते. पेशवाईच्या अस्तानंतर (१८१८) ब्रिटिशांनी महादेव कोळी समाजाचे सह्याद्रीतील किल्ल्यांचे आणि घाटमाथ्याचे परंपरागत रक्षणाचे अधिकार काढून घेतले. आणि मोठ्या प्रमाणात अन्याय चालू केला. या अन्याया विरोधात बंड करून आपले हक्क मिळवणे हे राघोजीं समोर लक्ष होते. आणि हे हिरावून घेतलेले हक्क आणि अधिकार परत मिळविण्यासाठी त्यांनी जीवाची बाजी लावली. १८२८ मध्ये ब्रिटिशांनी शेतसारा प्रचंड वाढवला. कर भरण्यासाठी गरीब शेतकऱ्यांना सावकारांकडून भरमसाठ व्याजाने कर्ज घ्यावे लागले होते. त्याबदल्यात सावकार त्यांच्या जमिनी बळकावू लागले. कर्जाच्या नावाखाली आदिवासी समाजातील जमिनी सावकार मोठ्या प्रमाणात हडप करत होते. हा अन्याय मोडून काढण्यासाठी राघोजींनी ठाम निर्णय घेतला. सुरुवातीला राघोजी भांगरे ब्रिटिश सरकारच्या सेवेत होते. परंतु नोकरीत होणारा अपमान, पगारातील कपात आणि त्यांच्या कुटुंबावर इंग्रज अधिकाऱ्यांनी केलेले अत्याचार यामुळे त्यांनी नोकरी सोडून बंडाचे निशाण हाती घेतले. राघोजींनी आपले बंधू बापूजी भांगरे आणि सहकाऱ्यांच्या मदतीने अकोले, जुन्नर, नाशिक, ठाणे, पुणे आणि सातारा परिसरात इंग्रज व जुलमी सावकारांविरुद्ध मोठा उठाव केला. ते जुलमी सावकारांची संपत्ती आणि कर्जाची कागदपत्रे जाळून लुटलेले धन गोरगरिबांना वाटून देत असत. त्यामुळे सामान्य जनतेत त्यांना देवासारखा मान होता. गनिमी काव्याने लढणाऱ्या राघोजींना पकडण्यासाठी ब्रिटिश सरकारने त्याकाळी ५,००० रुपयांचे बक्षीस जाहीर केले होते. ते अत्यंत कडक शिस्तीचे आणि महिलांचा नितांत आदर करणारे नेते होते. ते महादेवाचे निस्सीम भक्त होते.

राजूर मोहीमः अकोले आणि राजूर परिसरात शेतकऱ्यांची जमीन बळकावणाऱ्या सावकारांवर त्यांनी अनेक हल्ले केले. आणि आदिवासी समाजाची जमीन सोडवण्यास शेतकऱ्यांना मदत केली. राघोजींच्या दहशतीमुळे अनेक सावकार राजूर भाग सोडून पळून गेले. जुन्नर आणि नाशिकचा लढा (१८४४-१८४५): १८४४ ते १८४५ या काळात राघोजींचा उठाव शिगेला पोहोचला होता. त्यांनी उत्तर पुणे, जुन्नर, आंबेगाव, खेड आणि नाशिक जिल्ह्यातील इंग्रज ठाण्यांवर हल्ले केले.

क्रॉम्प्टनचे तीन नवीन सुपर प्रीमियम फॅन्स बाजारात!

■ पुणे (दै. संध्या)



आधुनिक घरांच्या सौंदर्यात भर घालण्यासोबतच दैनंदिन वापरात आरामदायी अनुभव देणाऱ्या अप्लायन्सेसची मागणी वाढत आहे. ग्राहकांची ही बदलती गरज लक्षात घेऊन सिलिंग फॅन क्षेत्रातील अग्रगण्य ब्रँड असलेल्या क्रॉम्प्टन ग्रीव्हज कंझ्युमर इलेक्ट्रिकल्स लिमिटेडने सुपर प्रीमियम फॅन्सची नवीन श्रेणी बाजारात आणली आहे. यामध्ये सायलेंटप्रो फ्लुइडो ग्लाइड, लक्झियन ज्युपिटर सेन्झ आणि लक्झियन स्टेटमेंट सेन्झ या तीन आकर्षक मॉडेल्सचा समावेश आहे. वैशिष्ट्यपूर्ण डिझाइन, स्मार्ट तंत्रज्ञान आणि वैयक्तिक आराम यांचा संगम या फॅन्समध्ये साधण्यात आला आहे.

आजच्या आधुनिक घरांमध्ये इंटेरिअर डिझाइनला विशेष महत्त्व दिले जात आहे. फर्निचर, प्रकाशयोजना आणि सजावटीच्या वस्तूंची निवड करताना ग्राहक विशेष काळजी घेतात. मात्र, घरातील महत्त्वाचा घटक असलेल्या सिलिंग फॅनच्या डिझाइनकडे अनेकदा दुर्लक्ष केले जाते. हीच बाब लक्षात घेऊन क्रॉम्प्टनने आपल्या नवीन श्रेणीमध्ये फॅनच्या कार्यक्षमतेसोबतच त्याच्या सौंदर्यपूर्ण रचनेलाही प्राधान्य दिले आहे. त्यामुळे घराच्या अंतर्गत सजावटीला पूरक ठरणारा आणि दैनंदिन गरजा पूर्ण करणारा फॅन ग्राहकांना निवडता येणार आहे. तरल आणि स्थापत्यशैलीवर आधारित तीन पात्यांच्या आकर्षक डिझाइनमुळे हा फॅन आधुनिक घरांना वेगळे सौंदर्य प्रदान करतो. यामध्ये वापरण्यात आलेले सायलेंटप्रो तंत्रज्ञान नेहमीच्या तुलनेत दुप्पट शांतपणे कार्य करण्यासाठी डिझाइन करण्यात आले असून, ५० टक्क्यांपर्यंत विजेची बचत करण्याची क्षमता आहे. हा फॅन १२०० मिमी आणि ९०० मिमी अशा दोन स्वीप साइजमध्ये उपलब्ध आहे. पॅसिफिक ब्लू, क्रेटर ब्राऊन, ग्लो व्हाइट, मॅट ब्लॅक आणि एस्प्रेसो वूड अशा पाच फिनिशमध्ये तो मिळतो. ९०० मिमी प्रकार काही निवडक रंगांमध्ये उपलब्ध आहे.

केएसबी लिमिटेडच्या व्यवसायाला मोठी गती

■ तिसऱ्या तिमाहीत विक्रीत १८.९५ टक्क्यांची वाढ

■ पुणे (दै. संध्या)



पंप, व्हॉल्व्ह आणि औद्योगिक यंत्रणा क्षेत्रातील आघाडीची कंपनी असलेल्या केएसबी लिमिटेडने आर्थिक वर्ष २०२६ च्या तिसऱ्या तिमाहीत व्यवसायात दमदार कामगिरी नोंदवली आहे. पेट्रोकेमिकल्स, अणुऊर्जा, ऊर्जा, रिफायनरी तसेच सुटे भाग या विविध क्षेत्रांतील मोठ्या प्रकल्पांच्या ऑर्डर्स आणि निर्यात व्यवहारांमुळे कंपनीच्या व्यवसायवाढीला चालना मिळाली आहे. जुलै ते सप्टेंबर २०२६ या तिमाहीत कंपनीची विक्री ७७२.७० कोटी रुपयांवर पोहोचली असून, मागील वर्षातील याच तिमाहीच्या तुलनेत १८.९५ टक्क्यांची वाढ झाली आहे.

जानेवारी ते सप्टेंबर २०२६ या पहिल्या नऊ महिन्यांच्या कालावधीत कंपनीची एकूण विक्री २,०६४.७० कोटी रुपये झाली. मागील वर्षातील याच कालावधीतील १,९११.७० कोटी रुपयांच्या विक्रीच्या तुलनेत ही वाढ ८ टक्के आहे. पेट्रोकेमिकल्स क्षेत्रात देशांतर्गत तसेच आंतरराष्ट्रीय ग्राहकांकडून रिफायनरी आणि खत उद्योगाशी संबंधित विविध प्रकल्पांसाठी ऑर्डर्स प्राप्त झाल्या आहेत. आफ्रिकेतील डांगोटेच्या आगामी खत प्रकल्पासाठी तसेच ओएनजीसीकडून पंप बदलण्यासाठी महत्त्वपूर्ण ऑर्डर्स मिळाल्या आहेत. अणुऊर्जा क्षेत्रात कैगा अणुऊर्जा प्रकल्पाच्या पाचव्या आणि सहाव्या युनिटसाठी कंपनीला मोठी ऑर्डर मिळाली आहे. देशाच्या अणुऊर्जा क्षेत्रातील पायाभूत सुविधांच्या विकासात केएसबीचे योगदान अधिक मजबूत करणारी ही महत्त्वपूर्ण घडामोड मानली जात आहे. ऊर्जा क्षेत्रात विविध मूळ उपकरण उत्पादक (OEM) आणि कंत्राटदारांकडून बॉयलर फीड पंप तसेच कंडेन्सेट एक्स्ट्रॅक्शन पंपसाठी ऑर्डर्स मिळाल्या आहेत. देशांतर्गत बाजारपेठेसोबतच निर्यात बाजारपेठेतही कंपनीला चांगला प्रतिसाद मिळत आहे.


व्हॉल्व्ह विभागात एनपीपी रिकव्हरी बॉयलर प्रकल्प, अँड्रिट्झ टेक्नॉलॉजीज, बीपीसीएल बिनाच्या रिफायनरी प्रकल्पासह विविध मोठ्या ग्राहकांकडून ऑर्डर्स प्राप्त झाल्या आहेत. याशिवाय, पूर्व भारतातील ग्राहकांकडून डिस्केलिंग पंपच्या सुट्या भागांसाठी ऑर्डर्स मिळाल्या आहेत. अदानी पॉवरकडून बॉयलर सर्क्युलेशन पंपच्या देखभाल, दुरुस्ती आणि सर्व्हिसिंगचे कामही कंपनीला मिळाले आहे.

आदिवासी आणि पर्यावरण; निसर्गाचे खरे रक्षक जैवविविधतेचे संवर्धक आणि शाश्वत विकासाचे मार्गदर्शक

■ श्रीमती रजनी गिरडकर, संशोधन आधिकारी, अनुसूचित जमाती प्रमाणपत्र तपासणी समिती, पुणे विभाग पुणे

(दै. संध्या)

मानव आणि निसर्ग यांचे नाते अतिशय प्राचीन आहे. परंतु निसर्गाशी समन्वय साधून, त्याचे महत्व ओळखून आणि त्याचे संरक्षण करुन जीवन जगण्याची परंपरा आदिवासी समाजाने पिढ्यानपिढ्या जपली आहे. आदिवासी समाजासाठी जंगल हे केवळ लाकूड, फळे, किंवा उपजीविकेचे साधन नसून ते त्यांच्या संस्कृतीचे, श्रद्धेचे, अर्थव्यवस्थेचे आणि अस्तित्वाचे केंद्र आहे. म्हणूनच आदिवासी समाजाला जल जंगल व जमीन यांचा पारंपारिक रक्षम मानले जाते.



महाराष्ट्रातील गडचिरोली, गोंदिया, चंद्रपूर, नंदुरबार, पालघर, नाशिक, ठाणे, पुणे, रायगड, यवतमाळ आणि अमरावती या जिल्ह्यांमध्ये विविध आदिवासी जमाती आजही निसर्गाशी जवळीक साधनू जीवन जगत आहेत. विशेषतः गडचिरोली जिल्ह्यातील गोंड, माडिया, कोलाम आणि इतर आदिवासी समुदायांचे जंगलाशी असलेले नाते अत्यंत महत्वपूर्ण आहे.

जंगल सवंर्धनातील आदिवासींची भूमिका : आदिवासी समाजाने जंगलाचा वापर करताना निसर्गाचे संतुलन राखण्याची परंपरा जपली आहे. जंगलातील फळे, फुले, कंदमुळे, औषधी वनस्पती, बांबू, तेंदूपाने, मोहफुले, हिरडा, बेहडा, आवळा, मध आणि डिंक यांसारख्या गौण वनोपजांचा वापर त्यांच्या दैनंदिन जीवनात केला जातो.

मात्र, या संसाधनांचा वापर करताना स्थानिक ज्ञान, ऋतुमान आणि उपलब्धतेचा विचार केला जातो, बियाणे आणि रोपे टिकून राहतील अशा पध्दतीने फळे गोळा करणे, मध संकलन करताना मधमाशांच्या वसाहतीचे संरक्षण करणे, औषधी वनस्पतींचा आवश्यक तेवढाच वापर करणे आणि वनक्षेत्राचे नुकसान टाळणे अशा पध्दती पर्यावरण संवर्धनासाठी उपयुक्त ठरतात. अनेक आदिवासी गावांमध्ये ग्रामसभांच्या माध्यमातून जंगलाच्या संरक्षणासाठी सामूहिक निर्णय घेतले जातात. जंगलातील आगीवर नियंत्रण, अवैध वृक्षतोड रोखणे, वन्यजीवांचे संरक्षण आणि वनक्षेत्राचे पुनरुज्जीवन यामध्ये स्थानिक समुदायांचा सहभाग महत्वाचा ठरतो. जैवविविधता म्हणजे पृथ्वीवरील विविध प्रकारच्या वनस्पती, प्राणी, पक्षी, कीटक आणि सूक्ष्मजीव यांची समृध्द विविधता जंगलातील प्रत्येक पर्यावरणीय संतुलन राखण्यात महत्वाची भूमिका बजावतो. आदिवासी समाजाला आपल्या परिसरातील जैवविविधतेची पिढ्यानपिढ्या विकसित झालेली माहिती असते.

कोणत्या ऋतुमध्ये कोणती वनस्पती फुलते, कोणत्या झाडाला औषधी महत्व आहे, कोणती फळे खाण्यायोग्य आहेत, कोणत्या वन्यप्राण्यांचे आधिवास कुठे आहेत, याचे ज्ञान स्थानिक आदिवासी समुदायांकडे असते. हे ज्ञान वनस्पती आणि प्राण्यांच्या संवर्धनासाठी उपयुक्त ठरते. आदिवासी समाजातील देवराई आणि पवित्र वनक्षेत्रांची परंपरा ही जैवविविधता संवर्धनाचे महत्त्वपूर्ण उदाहरण आहे. काही विशिष्ट वृक्ष, वनस्पती आणि वनक्षेत्रांना धार्मिक व सांस्कृतिक महत्व दिले जाते. अशा क्षेत्रांमध्ये वृक्षतोड किंवा अनावश्यक हस्तक्षेप टाळण्याची परंपरा असल्यामुळे अनेक स्थानिक वनस्पती आणि जीवसृष्टीचे संरक्षण होण्यास मदत होते. गडचिरोलीसारख्या वनसमृध्द जिल्ह्यात वाघ, बिबट्या, अस्वल, रानकुत्रे, हरिण, सांबर, विविध पक्षी आणि औषधी वनस्पतींच्या अधिवासांचे संरक्षण करण्यासाठी स्थानिक समुदायांचे सहकार्य महत्वपूर्ण आहे.

आदिवासी समाजाचे पारंपरिक ज्ञान हे पर्यावरणपूरक आणि शाश्वत जीवनपध्दतीचे महत्वपूर्ण उदाहरण आहे. पारंपरिक शेती, मिश्र पीक पद्धती, स्थानिक बियाण्यांचे जतन, नैसर्गिक खतांचा वापर, पावसाच्या पाण्याचे व्यवस्थापन आणि जमिनीची सुपीकता टिकवून ठेवण्याच्या पद्धती त्यांच्या जीवनाचा भाग आहेत.

स्थानिक हवामान, मातीचा प्रकार आणि पावसाचे प्रमाण लक्षात घेऊन शेती करणे, विविध पिकांची लागवड करणे आणि स्थानिक बियाण्यांचे संरक्षण करणे यामुळे शेतीतील जैवविविधता टिकण्यास मदत होते. औषधी वनस्पतींचे ज्ञान हा आदिवासी समाजाचा आणखी एक महत्त्वाचा पारंपरिक वारसा आहे. सर्दी, ताप, जखमा आणि इतर सामान्य त्रासांसाठी विविध वनस्पतींचा पारंपरिक उपयोग केला जातो. या ज्ञानाचे वैज्ञानिक दस्तऐवजीकरण करणे आणि स्थानिक समुदायांच्या बौद्धिक संपदा हक्कांचा सन्मान राखणे आवश्यक आहे.

अनुसूचित जमाती व इतर पारंपरिक वननिवासी (वनहक्कांची मान्यता) अधिनियम, २००६ अर्थात वनहक्क कायदा हा आदिवासी समाजाच्या वनधिकारांच्या दृष्टीने महत्त्वाचा कायदा आहे.

या कायद्यांतर्गत पात्र वननिवासी समुदायांना वैयक्तिक आणि सामुदायिक वनहक्कांची मान्यता देण्याची तरतूद आहे. विशेषतः कलम ३ (१) (१) नुसार सामुदायिक वनसंपत्तीचे सरंक्षण, संवर्धन, पुनर्निर्मिती आणि व्यवस्थापन करण्याचा अधिकार मान्य करण्यात आला आहे.

ग्रामसभांना वनसंपत्तीच्या शाश्वत व्यवस्थापनात महत्वपूर्ण भमिका बजावता येते. गडचिरोली जिल्ह्यात सामुदायिक वनहक्कांच्या माध्यमातून अनेक गावांनी जंगली व्यवस्थापन, बांबू व्यवस्थापन, गौण वनोपज संकलन आणि वनसंवर्धनाचा उपक्रमांत सहभाग घेतला आहे. या प्रक्रियेमुळे आदिवासी समाजाचे पारंपरिक ज्ञान आणि आधुनिक पर्यावरण व्यवस्थापन यांच्यात समन्वय निर्माण होऊ शकतो. वनसंवर्धनासोबत स्थानिक लोकांच्या उपजीवकेच्या संधी वाढविण्यासही मदत होते. आदिवासी समाजाच्या अर्थव्यवस्थेमध्ये गौण वनोपजाला विशेष महत्त्व आहे. मोहफुले, तेंदुपाने, बांबू, चारोळी, आवळा, हिरडा, बेहडा, मध, डिंक आणि इतर वनउत्पादने त्यांच्या उत्पन्नाचे महत्वाचे स्त्रोत आहेत, या वनोपजांचे योग्य संकलन, प्रक्रिया, साठवणूक, मूल्यवर्धन आणि बाजारपेठ उपलब्ध करुन दिल्यास आदिवासी कुटुबांचे आर्थिक सक्षमीकरण होऊ शकते, महिला बचतगटांच्या माध्यमातून मोहफुलांपासून विविध उत्पादने, आवळा प्रक्रिया, बांबू हस्तकला, मध प्रक्रिया आणि वनौषधीजन्य उत्पादनांना प्रोत्साहन देता येते. यामुळे जंगलाचे सरंक्षण आणि आदिवासींचा आर्थिक विकास या दोन्ही उद्दिष्टांची पूर्तता होण्यास मदत होते.

आज संपूर्ण जग हवामान बदल, अनियमित पाऊस, वाढते तापमान, जंगलातील वणवे, पाण्याची टंचाई आणि जैवविविधतेचा -हास अशा गंभीर समस्यांना सामोरे जात आहे. या पार्श्वभूमीवर आदिवासी समाजाचे स्थानिक पर्यावरणविषयक ज्ञान महत्वाचे ठरते. पावसाचे पारंपरिक निरीक्षण, ऋतूचक्रानुसार शेतीचे नियोजन, स्थानिक जलस्त्रोतांचे संरक्षण, जंगलातील आगींची पूर्वकल्पना आणि वनस्पतींच्या उपलब्धतेतील बदल याबाबतचे त्यांचे अनुभव पर्यावरण संशोधनसाठी उपयुक्त ठरु शकतात. आदिवासी समाजाच्या अनुभवांना वैज्ञानिक संशोधनाची जोड देऊन हवामान बदलाशी जुळवून घेणारे स्थानिक विकासाचे मॉडेल तयार करता येऊ शकते.

आदिवासी समाजातील सण, उत्सव, लोकगीते, नृत्य, पारंपरिक श्रध्दा आणि सामूहिक जीवनपद्धती यांचा निसर्गाशी जवळचा संबंध आहे. वृक्ष, नद्या, पर्वत वन्यजीव आणि भूमी यांच्याबद्दल आदराची भावना त्यांच्या सांस्कृतिक परंपरेत दिसून येते. भगवान बिरसा मुंडा यांनी आदिवासी समाजात स्वाभिमान, संघटन आणि आपल्या भूमीवरील आधिकारांची जाणीव निर्माण केली. त्यांच्या विचारांतून प्रेरणा घेऊन आदिवासी संस्कृती, नैसर्गिक संसाधने आणि पारंपारिक जीवनमूल्यांचे संरक्षण करणे ही आजच्या पिढीची जबाबदारी आहे. आदिवासी समाजाचे पारंपरिक ज्ञान, जंगलाशी असलेले नाते आणि जैवविविधतेच्या संरक्षणातील योगदान ही देशाची अमूल्य संपत्ती आहे. विकासाच्या प्रक्रियेत आदिवासी समाजाचा सहभाग, वनहक्कांचे प्रभावी संरक्षण, ग्रामसभांचे सक्षमीकरण, स्थानिक ज्ञानाचे दस्तऐवजीकरण आणि वनसंपत्तीचा शाश्वत वापर यांना प्राधान्य देणे आवश्यक आहे.

आदिवासी संशोधन व प्रशिक्षण संस्था, पुणे यांच्यामार्फत १५ नोव्हेंबर २०२६ रोजी गडचिरोली येथे आयोजित भगवान बिरसा मुंडा जयंती व जनजातीय गौरव दिवस राज्यस्तरीय कार्यक्रम हा आदिवासी समाजाच्या वैशिष्ट्यपूर्ण प्रथा, परंपरा, चालीरिती, आदिम संस्कृती इत्यादीचे द्योतक आहे.आदिवासी समाजाकडून निसर्गाशी सहअस्तित्वाची शिकवण घेऊन पर्यावरणपूरक विकासाचा मार्ग स्वीकारणे ही काळाजी गरज आहे.

जंगल वाचले तर जीवन वाचेल, जैवविविधता टिकली तर पर्यावरण सुरक्षीत राहील. आदिवासींच्या पारंपरिक ज्ञानाचा सन्मान करुया, निसर्गाचे संवर्धन करुया आणि पुढील पिढ्यांसाठी समृध्द पर्यावरणाचा वारसा जपूया.

जय आदिवासी, जय बिरसा !

थोडक्यात पण महत्वाचे



पाटस येथे कृषी सेवा केंद्राचे उद्घाटन 'वाघजाई ॲग्रो' खत दुकानाचा शुभारंभ

पाटस : दैनिक संध्या

पुणे जिल्ह्यातील फासे पारधी समाजातील कुटुंबे विकासाच्या मुख्य प्रवाहापासून अनेक वर्षे दूर राहिली आहेत.मात्र सामाजिक पाठबळ मिळाल्यास हा समाजही प्रगतीची नवी शिखरे गाठू शकतो, याचे उदाहरण संतोष शिंदे यांनी घालून दिले आहे. पाटस गावातील पूर्णवसंत वस्ती येथे संतोष शिंदे यांच्या 'वाघजाई ॲग्रो' कृषी रासायनिक खत दुकानाचा उद्घाटन सोहळा उत्साहात पार पडला. या वेळी दौंडचे माजी आमदार रमेश आप्पा थोरात, आदिवासीसेवक व साहित्यिक नामदेव भोसले यांच्यासह मान्यवर उपस्थित होते. सदर दुकानाचे उद्घाटन माजी सरपंच योगेंद्र शितोळे यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी बोलताना रमेश आप्पा थोरात म्हणाले, "नामदेव भोसले यांच्या प्रयत्नांतून संतोष शिंदे यांच्यासारखी अनेक कुटुंबे विकासाच्या मुख्य प्रवाहात येत आहेत. आदिवासी समाजातील तरुण अनेक संकटांवर मात करून स्वावलंबनाच्या दिशेने वाटचाल करीत आहेत, ही अभिमानास्पद बाब आहे. त्यांच्या प्रगतीसाठी आम्ही नेहमीच त्यांच्या पाठीशी राहू." पुढे ते म्हणाले, "शेखान आणि हरुबाई शिंदे यांच्या संघर्षमय जीवनातील दुःख मी जवळून पाहिले आहे. आज त्यांचा मुलगा स्वतःच्या पायावर उभा राहताना त्यांनी पाहीले असते तर निश्चितच आनंदी झाले असते." सदर कार्यक्रमाला भीमा पाटस कारखान्याचे संचालक नामदेव नाना शितोळे, ज्येष्ठ विचारवंत डॉ. मधुकर आव्हाड, उद्योजक जयंतराव शितोळे-पाटील, माजी सभापती फुले काका, पत्रकार विजय चव्हाण, वसंतराव साळुंखे, माजी सरपंच संभाजीराव खडके, माजी उपसरपंच बाळासाहेब तोंडे-पाटील, राजेंद्र सोनवणे यांच्यासह ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते. योगेंद्र बाबा शितोळे, नामदेव भोसले व नामदेव नाना शितोळे यांनी मनोगत व्यक्त केले. सूत्रसंचालन व स्वागत डॉ. मधुकर आव्हाड यांनी केले. सामाजिक पाठबळ आणि जिद्दीच्या जोरावर पारधी समाजातील तरुण उद्योजकतेकडे वळत असल्याचे हे उद्घाटन प्रेरणादायी ठरले.



वाढदिवसानिमित्त ५१ हजारांचा धनादेश

कोरेगावमुळ : दैनिक संध्या

वाढदिवस म्हणजे केवळ आनंदोत्सव आणि खर्चिक कार्यक्रम न करता, त्या निमित्ताने समाजोपयोगी उपक्रम राबवून सामाजिक बांधिलकी जपण्याचा आदर्श युवा नेते तथा अष्टापूर विविध विकास कार्यकारी सेवा सहकारी सोसायटीचे माजी चेअरमन अतुल सुखदेव कोतवाल यांनी घालून दिला असल्याचे मत पुणे कृषी उत्पन्न बाजार समितीचे सभापती प्रकाश जगताप यांनी व्यक्त केले. माजी चेअरमन अतुल कोतवाल यांनी आपल्या वाढदिवसानिमित्त होणारा अनावश्यक खर्च टाळून यशवंत सहकारी साखर कारखान्याचे चेअरमन सुभाष जगताप यांच्या मार्गदर्शनाखाली जिल्हा परिषद प्राथमिक शाळा, अष्टापूर येथील शैक्षणिक विकासासाठी ५१ हजार रुपयांचा धनादेश देऊन मोलाचे योगदान दिले. श्री. वारे गुरुजी यांच्या संकल्पनेतून बाबळेवाडी व जालिंदरनगर येथील शाळांच्या धर्तीवर अष्टापूर शाळेचा विकास करण्याच्या उद्देशाने हा मदतीचा हात पुढे करण्यात आला आहे. शाळेच्या भौतिक सुविधा आणि शैक्षणिक वातावरण अधिक समृद्ध करण्यासाठी अशा सामाजिक योगदानाचे मोठे महत्त्व आहे. वाढदिवसाच्या निमित्ताने स्वतःच्या आनंदाबरोबरच विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक भवितव्याचा विचार करुन केलेला हा उपक्रम निश्चितच कौतुकास्पद आहे. समाजातील इतर दानशूर व्यक्ती, उद्योजक आणि लोकप्रतिनिधींनीही अशा उपक्रमांतून जिल्हा परिषद शाळांच्या विकासासाठी पुढाकार घेण्याची गरज आहे. या सामाजिक योगदानाबद्दल अतुल सुखदेव कोतवाल यांचे शाळा व्यवस्थापन समितीच्या वतीने मनःपूर्वक आभार व्यक्त करण्यात आले. वाढदिवसाचा आनंद समाजोपयोगी कार्यातून द्विगुणित करण्याचा कोतवाल यांचा उपक्रम परिसरात कौतुकाचा विषय ठरत आहे.

बोगस प्रमाणपत्रांद्वारे SC आरक्षणात घुसखोरी

पिंपरी : दैनिक संध्या

अनुसूचित जातींच्या (SC) आरक्षण उपवर्गीकरणाच्या अभ्यास समितीच्या अहवालाचा दाखला देत, आमदार अमित गोरखे यांनी आरक्षणातील घुसखोरीवर गंभीर चिंता व्यक्त केली आहे. इतर प्रवर्गातील लोकांनी नामसदृश्यतेचा फायदा घेत बोगस प्रमाणपत्रांच्या आधारे SC आरक्षणात प्रवेश केल्याचा आरोप गोरखे यांनी केला आहे. यामुळे खऱ्या अर्थाने मागास आणि अतिवंचित असलेले घटक शिक्षण, नोकरी आणि शासकीय लाभांपासून वंचित राहत असल्याचे त्यांनी म्हटले आहे. या बोगस प्रमाणपत्रांची सरकारने तात्काळ सखोल चौकशी करावी, अशी मागणी त्यांनी केली आहे. तसेच, जनगणना किंवा लोकसंख्येच्या आकडेवारीचे कारण पुढे करून उपवर्गीकरणाचा निर्णय लांबवू नये; पंजाब आणि हरियाणाच्या धर्तीवर 'अतिवंचितपणा' हा मुख्य निकष मानून महाराष्ट्रात तात्काळ आरक्षण उपवर्गीकरण लागू करावे, असे मत आमदार अमित गोरखे यांनी मांडले आहे.

विलिनीकरणासंदर्भात चर्चा ना औपचारिक, ना अनौपचारिक...!

ना आमच्या बाजूने... ना त्यांच्या बाजूने.. ! - उमेश पाटील

इथून पुढे माध्यमांनी अशा अविश्वसनीय सूत्रांपासून सावध राहावे : सत्य परेशान हो सकता है, पराजित नहीं..!

■ मुंबई (दै. संध्या)



गेल्या आठवडाभरापासून राष्ट्रवादी काँग्रेसच्या विलिनीकरणाच्या बातम्या तथाकथित सूत्रांच्या हवाल्याने प्रसारित केल्या जात होत्या. मात्र विलिनीकरणासंदर्भात कोणतीही चर्चा सुरू नाही. ना औपचारिक, ना अनौपचारिक.. ! ना आमच्या बाजूने... ना त्यांच्या बाजूने.. ! हे आम्ही वारंवार स्पष्ट केले आहे अशी माहिती राष्ट्रवादी काँग्रेसचे राष्ट्रीय मुख्य प्रवक्ते उमेश पाटील यांनी स्पष्ट केले आहे. दरम्यान खोटे नॅरेटीव्ह सेट करून स्वतःचा राजकीय अजेंडा सेट करण्यासाठी माध्यमांचा वापर करणाऱ्या तथाकथित 'सूत्रां'वर किमान आतातरी विश्वास ठेऊ नये असे आवाहनही उमेश पाटील यांनी केले आहे. आदरणीय सुनेत्रा पवार या राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या राष्ट्रीय अध्यक्षा व राज्याच्या उपमुख्यमंत्री आणि पुणे जिल्ह्याच्या पालकमंत्री आहेत. त्या पुण्यात असताना पक्षाचे आमदार, पदाधिकारी, नगरसेवक आणि कार्यकर्ते त्यांना भेटायला जाणे अत्यंत स्वाभाविक आहे. मतदारसंघातील विकासकामे, जिल्हा नियोजन समितीचे विषय, मंत्रालयात प्रलंबित असलेली कामे यासाठी आमदार आपल्या नेतृत्वाची भेट घेणार नाहीत, तर कोणाची घेणार? असा सवाल करतानाच अशा नियमित भेटींनाही वेगळा राजकीय रंग देऊन 'पार्थ पवार यांनी आमदारांची बैठक बोलावली' अशा बातम्या प्रसारित केल्या जातात.यामागे नेमका कोणाचा अजेंडा आहे? असा प्रश्नही उमेश पाटील यांनी उपस्थित केला आहे.

खासदार सुप्रिया सुळे आणि आमदार रोहित पवार यांनीही विलिनीकरणाचा कोणताही प्रस्ताव नसल्याचे आणि त्यासंदर्भात चर्चा सुरू नसल्याचे स्पष्ट केले आहे. मग गेल्या आठवडाभरात या बातम्या माध्यमांना नेमक्या कोणी पुरवल्या? आम्ही सुरुवातीपासून सांगत असलेली वस्तुस्थिती दुर्लक्षित करून तथाकथित सूत्रांच्या माहितीवर विश्वास ठेवणे, हा आमच्या पक्षावर अन्याय नाही का?असा प्रश्न उमेश पाटील यांनी केला आहे.

काही मंडळी स्वतःचा छुपा राजकीय अजेंडा आणि व्यक्तिगत राजकीय हितसंबंध साधण्यासाठी माध्यमांचा वापर करून घेत आहेत का, याचा शोध आता माध्यमांनीच घेण्याची आवश्यकता आहे. त्यामुळे इथून पुढे माध्यमांनी अशा अविश्वसनीय सूत्रांपासून सावध राहावे, एवढीच आमची अपेक्षा आहे असेही उमेश पाटील यांनी स्पष्ट केले आहे. राष्ट्रवादी काँग्रेस पक्षासंदर्भात कोणतीही बातमी प्रसारित करण्यापूर्वी पक्षाचे अधिकृत प्रवक्ते किंवा प्रमुख नेते यांच्याकडून वस्तुस्थितीची खातरजमा करावी. माध्यमांची विश्वासार्हता हीच पत्रकारितेची खरी ताकद आहे. ती कोणाच्याही छुप्या राजकीय अजेंड्यासाठी पणाला लागू नये..! अशी अपेक्षा उमेश पाटील यांनी व्यक्त केली आहे. सत्य परेशान हो सकता है, पराजित नहीं..! असेही उमेश पाटील यांनी माध्यमांशी बोलताना स्पष्ट केले आहे.

ठाणे-पुण्यात २ हजारांहून अधिक पदांसाठी मेगा भरती!

■ ठाणे (दै. संध्या)



महिलांनी स्थापन केलेल्या तंत्रज्ञान आणि व्यवस्थापन सेवा क्षेत्रातील इम्पेरेटिव्ह बिझनेस व्हेंचर्स लिमिटेड (IBVL) या कंपनीने ठाणे आणि पुणे येथे २ हजारांहून अधिक पदांसाठी मेगा भरती मोहीम जाहीर केली आहे. या मोहिमेमुळे नोकरीच्या शोधात असलेल्या तरुणांसह अनुभवी उमेदवारांसाठी रोजगाराची मोठी संधी उपलब्ध झाली आहे. कंपनीच्या या भरती मोहिमेत BFSI, आरोग्यसेवा, ई-कॉमर्स आणि कृषी क्षेत्रांशी संबंधित विविध पदांचा समावेश आहे. ग्राहक सेवा, व्हॉइस, नॉन-व्हॉइस, ई-मेल, चॅट तसेच बॅक ऑफिस ऑपरेशन्स या विभागांमध्ये नियुक्त्या करण्यात येणार आहेत. बारावी उत्तीर्ण, पदवीपूर्व आणि पदवीधर उमेदवारांना अर्ज करता येणार असून फ्रेशर्स तसेच अनुभवी उमेदवारांनाही संधी मिळणार आहे. एक्झिक्युटिव्ह, टीम लीडरपासून ते विविध व्यवस्थापकीय पदांपर्यंतच्या जागा उपलब्ध आहेत. विशेष म्हणजे, पूर्णवेळ आणि अर्धवेळ अशा दोन्ही प्रकारच्या नोकऱ्यांची संधी कंपनीने उपलब्ध करून दिली आहे. या भरती मोहिमेबाबत बोलताना IBVLच्या संस्थापक आणि अध्यक्षा मंजुषा पैठणकर म्हणाल्या, "प्रत्येक नोकरी ही उज्ज्वल भविष्य घडवण्याची एक संधी असते, असा आमचा विश्वास आहे. तरुण प्रतिभेला प्रोत्साहन देणे, आर्थिक स्वावलंबनाला चालना देणे आणि अर्थपूर्ण रोजगाराच्या संधी उपलब्ध करून देणे हे या मोहिमेचे प्रमुख उद्दिष्ट आहे."IBVLचे सह-संस्थापक आणि व्यवस्थापकीय संचालक डॉ. सचिन पैठणकर म्हणाले, "रोजगारनिर्मिती आणि स्थानिक प्रतिभेला योग्य संधी देण्याच्या आमच्या बांधिलकीचे हे महत्त्वाचे पाऊल आहे. संरचित प्रशिक्षण आणि व्यावसायिक विकासाच्या माध्यमातून उमेदवारांना उज्ज्वल करिअर घडवण्याची संधी आम्ही देत आहोत."

ढेकळवाडी येथे ऊस पाचट व्यवस्थापन कार्यक्रम संपन्न

तालुका कृषी अधिकारी सचिन हाके यांचे शेतकऱ्यांना कृषी योजनांसह आधुनिक तंत्रज्ञानाबाबत मार्गदर्शन

■ बारामती (दै. संध्या)



शेतकऱ्यांना कृषी योजनांसह आधुनिक तंत्रज्ञानाबाबत मार्गदर्शन करण्यासाठी तालुका कृषी अधिकारी सचिन हाके यांच्या उपस्थितीत मौजे ढेकळवाडी येथे ऊस पाचट व्यवस्थापन कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. हा कार्यक्रम बारामती पंचायत समितीच्या सदस्या राजश्री भूषण टकले व सतीश जिजाबा टकले यांच्या शेतात घेण्यात आला.

यावेळी तालुका कृषी अधिकारी श्री. हाके यांनी शेतकऱ्यांना महाडीबीटी पोर्टलवरील विविध कृषी योजनांची माहिती दिली. तसेच मिनीकिट ज्वारी बियाणे, ज्वारी प्रकल्पांतर्गत शेतकरी बचत गटांची स्थापना, FFS ॲपद्वारे खतांची बुकिंग प्रक्रिया, महिला प्रमाणपत्र काढणे तसेच AI ॲपचा शेतीमध्ये होणारा उपयोग व त्याचे फायदे याविषयी सविस्तर मार्गदर्शन केले.

मंडळ कृषी अधिकारी बारामती संतोष पिसे यांच्या मार्गदर्शनाखाली उपकृषी अधिकारी मीरा राणे व सहाय्यक कृषी अधिकारी ज्योती आडके यांनी ऊस पाचट व्यवस्थापनाचे महत्त्व शेतकऱ्यांना पटवून दिले. एक हेक्टर क्षेत्रातून साधारणतः १० ते १२ टन ऊस पाचट तयार होते. या पाचटाचे योग्य व्यवस्थापन व कुजवणी केल्यास सुमारे ४ ते ५ टन सेंद्रिय खत उपलब्ध होते. तसेच १० टन पाचट कुजवल्यामुळे जमिनीला अंदाजे ४० ते ५० किलो नत्र, २० ते ३० किलो स्फुरद व ७५ ते १०० किलो पालाश उपलब्ध होत असल्याचे त्यांनी सांगितले. ऊस पाचट कुजविण्याची पद्धत : प्रति एकर क्षेत्रासाठी ४५ किलो युरिया, ५० किलो सुपर फॉस्फेट व ५ किलो पाचट कुजविणारे जिवाणू खत समप्रमाणात मातीमध्ये मिसळून पाचटावर टाकावे. पाचट सरीमध्ये दाबून घ्यावे. तसेच खोडव्याची बुडखे रिकामी करून धारदार कोयत्याने जमिनीलगत छाटणी करावी व शिफारशीनुसार बाविस्टीन या बुरशीनाशकाची फवारणी करावी. बगला फोडून त्यामधून रासायनिक खतांची मात्रा द्यावी. ऊस पाचट शेतात ठेवल्यामुळे जमिनीचे तापमान नियंत्रित राहते, पाण्याची बचत होते, जमिनीतील गांडुळांची संख्या वाढते, जमिनीचा सेंद्रिय कर्ब वाढतो व जमिनीची सुपीकता सुधारण्यास मदत होते. त्यामुळे शेतकऱ्यांनी ऊस पाचट न जाळता त्याचे योग्य व्यवस्थापन करून जमिनीचे आरोग्य जपावे, असे आवाहन कृषी विभागाच्या वतीने करण्यात आले.

या कार्यक्रमास प्रगतिशील शेतकरी राहुल घुले, दिलीप घुले, बापूराव घुले, नाना घुले, सुधीर टकले, पै. उमेश टकले, रविंद्र टकले सर, भिवा टकले, मयूर घुले, शामराव टकले यांच्यासह परिसरातील शेतकरी उपस्थित होते.

जेनेरली सेंट्रल लाईफ इन्शुरन्सची 'हेअर. नाऊ.' मोहीम

■ मुलांचे भविष्य आणि निवृत्तीच्या नियोजनासाठी ग्राहकांना प्रोत्साहन

■ अहिल्यानगर (दै. संध्या)



जेनेरली सेंट्रल लाईफ इन्शुरन्स कंपनी लिमिटेडने (जीसीएलआय) आपल्या 'हेअर. नाऊ.' (HERE.NOW.) या राष्ट्रीय ब्रँड मोहिमेचा नवा टप्पा सुरू केला आहे. 'बडा सोचो फॉर युअर बिंदास ड्रीम्स' या संकल्पनेवर आधारित या मोहिमेत मुलांच्या उज्ज्वल भविष्यासाठी आर्थिक नियोजन आणि स्वतःच्या निवृत्तीची तयारी करण्याचे महत्त्व अधोरेखित करण्यात आले आहे. यासोबतच कंपनीने 'वेव्हर ऑफ प्रीमियम रायडर' ही सुविधा उपलब्ध करून दिली आहे. मुलांच्या शिक्षणाचा वाढता खर्च आणि वाढते आयुर्मान यामुळे आर्थिक नियोजनाचे महत्त्व वाढले आहे. भविष्यातील आकांक्षा पूर्ण करण्यासाठी आजपासूनच नियोजन करणे आवश्यक असल्याचा संदेश या मोहिमेतून देण्यात येत आहे. अनपेक्षित परिस्थितीतही दीर्घकालीन आर्थिक उद्दिष्टांचे सातत्य कायम राहावे, हा या रायडरचा मुख्य उद्देश आहे. 'वेव्हर ऑफ प्रीमियम रायडर' अंतर्गत निश्चित अटी व शर्तींनुसार अपघातामुळे कायमस्वरूपी पूर्ण अपंगत्व, गंभीर आजाराचे निदान किंवा काही विशिष्ट परिस्थितींमध्ये विमाधारकाचा मृत्यू झाल्यास भविष्यातील प्रीमियम भरण्यापासून सवलत मिळू शकते. अशा वेळी मूळ विमा पॉलिसीचे लाभ सुरू राहतात. त्यामुळे अनपेक्षित आर्थिक संकटांमध्येही ग्राहकांच्या दीर्घकालीन योजनांना संरक्षण मिळण्यास मदत होते.

मुलांच्या भविष्यासाठी कंपनीच्या पोर्टफोलिओमध्ये जेनेरली सेंट्रल लॉन्ग टर्म इन्कम प्लॅन, मनी बॅक सुपर प्लॅन आणि ॲश्युअर्ड एज्युकेशन प्लॅन यांचा समावेश आहे. तसेच निवृत्तीच्या नियोजनासाठी सुनेहरा पेन्शन प्लॅन आणि लाइफटाइम पार्टनर प्लॅन यांसारखे पर्याय उपलब्ध आहेत. या मोहिमेचा महत्त्वाचा भाग म्हणून 'बडा सोचो ड्रीम्स वॉल' हे डिजिटल व्यासपीठ सुरू करण्यात आले आहे. याद्वारे नागरिकांना आपली स्वप्ने आणि आकांक्षा व्यक्त करण्यासह ती पूर्ण करण्यासाठी ठोस कृती करण्याची प्रतिज्ञा घेता येणार आहे. कंपनीचे व्यवस्थापकीय संचालक आणि मुख्य कार्यकारी अधिकारी आलोक रुंगटा म्हणाले की, मुलांचे भविष्य आणि स्वतःची निवृत्ती ही भारतीय कुटुंबांची महत्त्वाची आर्थिक प्राधान्ये आहेत. वेव्हर ऑफ प्रीमियम रायडरमुळे अनपेक्षित परिस्थितीतही आर्थिक नियोजनाचे सातत्य राखण्यास मदत होईल. ही मोहीम देशातील १०० हून अधिक शहरांमध्ये दहा भाषांमध्ये राबविण्यात येणार आहे. दूरचित्रवाणी, डिजिटल माध्यमे, ओटीटी, क्रिकेट आणि ट्रान्झिट जाहिरातींच्या माध्यमातून देशभरातील ग्राहकांपर्यंत पोहोचण्याचा कंपनीचा प्रयत्न आहे.

'कॅम्पस डायरीज सीझन २' या एमएक्स ओरिजिनल कॉलेज ड्रामाचा ट्रेलर प्रदर्शित

■ मुंबई (दै. संध्या)

एक्सक्लुझिव्ह ओरिजिनल कंटेन्टसाठी भारतातील सर्वात मोठी स्ट्रीमिंग सेवा असलेल्या प्राइम व्हिडिओने आज 'कॅम्पस डायरीज सीझन २' या आगामी एमएक्स ओरिजिनल सीरिजचा ट्रेलर प्रदर्शित केला. अभिषेक यादव दिग्दर्शित या सीरिजची निर्मिती प्रेम मिस्त्री आणि अभिषेक यादव यांनी केली आहे. या सीरिजमध्ये हर्ष बेनिवाल, ऋत्विक साहोरे, सलोनी गौर, सृष्टी गांगुली, सलोनी पटेल आणि अभिनव शर्मा या कलाकारांनी भूमिका साकारल्या आहेत. नव्या सीझनमध्ये प्रेक्षकांना पुन्हा एकदा कॉलेजच्या विश्वात घेऊन जाण्यात येणार आहे. या ठिकाणी मैत्रीची कसोटी लागते आणि नातेसंबंध अधिक गुंतागुंतीचे होतात. 'कॉलेज शोज का बाप' म्हणून ओळखल्या जाणाऱ्या या सीरिजच्या दुसऱ्या सीझनमध्ये भावनिक चढउतार, अनपेक्षित संघर्ष आणि कॉलेजमधील धमाल पाहायला मिळणार आहे. यलो मॉन्टाज या बॅनरअंतर्गत 'कॅम्पस डायरीज सीझन २'ची निर्मिती करण्यात आली आहे. पहिल्या सीझनला मिळालेल्या प्रचंड यशानंतर कॉलेज जीवनावर आधारित एक उत्कृष्ट सीरिज म्हणून 'कॅम्पस डायरीज सीझन २' आपले स्थान अधिक भक्कम करण्यास सज्ज आहे. कॉलेज जीवनावर आधारित इतर सीरिजपेक्षा ही सीरिज वेगळी ठरते, कारण आजच्या तरुणांना भेडसावणाऱ्या समस्यांचे वास्तववादी चित्रण यात करण्यात आले आहे. मैत्री, पहिले प्रेम, स्वतःच्या क्षमतांबद्दल वाटणारी शंका आणि मोठे होत असताना येणारा दबाव अशा तरुणांच्या आयुष्यातील विविध पैलूंवर या सीरिजमध्ये कोणताही आडपडदा न ठेवता प्रकाश टाकण्यात आला आहे. आजच्या तरुणांसमोरील खऱ्या आव्हानांचे चित्रण यात करण्यात आले असून पडद्यावर आपल्याच आयुष्यातील प्रसंग पाहायला मिळत असल्यामुळे प्रेक्षकांना ही कथा अधिक जवळची वाटते.



मधुमेहाच्या व्यवस्थापनात रक्तातील साखरेसोबतच 'हाडे आणि सांध्यांच्या आरोग्याकडे' ही लक्ष देणे गरजेचे – तज्ज्ञांचा सल्ला

■ पुणे (दै. संध्या)



मधुमेहाचा विपरीत परिणाम केवळ रक्तातील साखरेच्या पातळीपुरता मर्यादित नसून, हाडांची मजबुती, सांध्यांची हालचाल आणि एकूणच स्नायू व हाडांच्या आरोग्यावरही होऊ शकतो. जागतिक मधुमेह दिनानिमित्त तज्ज्ञांनी या दुर्लक्षित राहणाऱ्या परिणामांकडे लक्ष वेधत, रुग्णांची हालचाल करण्याची क्षमता आणि स्वावलंबन टिकवून ठेवण्यासाठी हाडे व सांध्यांच्या आरोग्याची काळजी घेण्याचे आवाहन केले आहे. रक्तातील साखरेची पातळी दीर्घकाळ वाढलेली राहिल्यास हाडांची अंतर्गत रचना आणि त्यातील कोलॅजनवर परिणाम होऊन हाडांची लवचिकता व मजबुती कमी होऊ शकते. त्यामुळे फ्रॅक्चरचा धोका वाढतो. टाइप २ मधुमेह असलेल्या व्यक्तींमध्ये मधुमेह नसलेल्या व्यक्तींच्या तुलनेत खुब्याचे फ्रॅक्चर होण्याचा धोका अधिक असतो. विशेष म्हणजे, हाडांची घनता सामान्य किंवा अधिक असली तरीही हा धोका कायम असू शकतो. याशिवाय फ्रोजन शोल्डर, स्नायूंची कमजोरी, मज्जातंतूंचे नुकसान आणि शरीराचा तोल सांभाळण्यात अडचणी अशा समस्या उद्भवू शकतात. त्यामुळे पडून दुखापत होण्याची शक्यता वाढते. मधुमेह नियंत्रणात नसल्यास फ्रॅक्चर भरून येण्यासही विलंब होऊ शकतो. लोकमान्य हॉस्पिटल्सचे कन्सल्टंट फिजिशियन डॉ. प्रणित पटणी म्हणाले, "मधुमेह असलेल्या व्यक्तींमध्ये हाडांची घनता सामान्य असली तरी हाडांची प्रत्यक्ष मजबुती सामान्य असेलच असे नाही. भारतात सामान्यपणे आढळणारी ड जीवनसत्व आणि कॅल्शियमची कमतरता हाडांच्या आरोग्याच्या समस्या अधिक गंभीर करू शकते. त्यामुळे मधुमेहाचे व्यवस्थापन केवळ रक्तातील साखर नियंत्रित ठेवण्यापुरते मर्यादित न राहता हाडांची मजबुती जपणे, सांध्यांची हालचाल कायम ठेवणे आणि पडून होणाऱ्या दुखापती टाळणे यांनाही तितकेच महत्त्व दिले पाहिजे. यामुळे व्यक्तीचे स्वावलंबन आणि जीवनमान टिकवून ठेवण्यास मदत होते." हाडांचे आरोग्य जपण्यासाठी वेळोवेळी आवश्यक तपासण्या करणे, पुरेशा प्रमाणात कॅल्शियम व व्हिटॅमिन डी घेणे, प्रथिनयुक्त संतुलित आहार घेणे आणि नियमित चालणे महत्त्वाचे आहे. यासोबतच स्नायूंची ताकद आणि शरीराचा तोल सुधारण्यासाठी व्यायाम करणे आवश्यक आहे. वय आणि वैयक्तिक जोखमीचे घटक लक्षात घेऊन, विशेषतः ज्येष्ठ नागरिक तसेच यापूर्वी फ्रॅक्चर किंवा वारंवार पडण्याचा अनुभव असलेल्या व्यक्तींनी डॉक्टरांच्या सल्ल्याने डेक्सा बोन डेन्सिटी तपासणी करून घ्यावी.

महानिर्मिती
महाराष्ट्र राज्य वीज निर्मिती कंपनी मर्यादित

इ-निविदा सूचना
क्र.ना.औ.वि.कें/२०२६-२७/४०

अ. क्र.	निविदा क्र./ विभाग	निविदा तपशील	अंदाजे रक्कम (रु.) इसारा रक्कम (रु.)
१.	३०००००७३३७१ / टेस्टींग	मायक्रोप्रोसर आधारित बॉयलर फ्लेम मॉनिटरिंग आणि ॲनालयझिंग प्रणालीची खरेदी	४९,८४,५९५/- / ५३,३५०/-
२.	३०००००६६४०४ / सीएचपी	कन्व्हेयर क्रमांक २३ अ वर मोटराईज्ड पुलीव्दारे संपूर्ण कन्व्हेयर सिस्टीममध्ये बदलांसह पुरवठा, उभारणी, चाचणी आणि कार्यान्वित करणे.	४९,५०,०००/- / ५३,०००/-
३.	३०००००७३३७५ / सीएचपी	ववविध कन्व्हेयर बेल्टचे हॉट व्हल्कनायझिंग, कन्व्हेयर पुलीचे रबर आणि सिरॅमिक लॅगिंग आणि पॅच दुरूस्तीसाठी वार्षिक करार.	६०,१२,७९१/- / ६३,६३०/-
४.	३०००००७३३७४ / सीएचपी	एनटीपीएस परिसरात सुरक्षा कर्तव्यांसाठी वाहन भाडयाने घेणे.	२५,३२,७६८/- / २८,८३०/
५.	३०००००७३३७६ / ओएस	युनिट ३ टर्बाइन हाऊस आणि पीसीआर साठी दैनंदिन साफसफाईच्या कामांच्या सेवेसाठी द्विवार्षिक करार.	१,१४,२६,४९९/- / १,१७,७७०/-

नविन विक्रेते/ नोंदणी नसलेल्या विक्रेत्यांना विनंती आहे की त्यांनी त्यांच्या कंपनीची ई-टेंडरिंगसाठी नोंदणी करावी.
अधिक तपशीलांसाठी वेबसाइटवर लॉग इन करा.
प्रत्येक निविदा किंमत: रु. ११८०/-, अधिक माहिती व अद्यतनांसाठी कृपया https://eprocurement.mahagenco.in येथे भेट द्यावी.
मुख्य अभियंता, नाशिक
औ.वि.केंद्र, एकलहरे



पिंपरी-चिंचवड आणि परिसर
शनिवार, दि. १४ नोव्हेंबर २०२६
दैनिक संध्या
निःपक्ष समीक्षणाचे... निर्भीड दैनिक

थोडक्यात पण महत्वाचे



पोलीस फ्रेन्डस् वेलफेअर असोसिएशनच्या वतीने पोलीसांना मिठाई वाटप

पिंपरी: दैनिक संध्या

प्रत्येक सणाला पोलीस आपले कर्तव्य बजावत रस्त्यावर उभे असतात. म्हणून आपण आनंदाने आणि सुखाने दिवाळी साजरी करू शकतो, पोलीसांच्या याच कर्तव्यभावनेची जाण राखून पोलीस फ्रेन्डस् वेलफेअर असोसिएशनने चिंचवड पोलीस स्टेशन येथे पोलीसांना मिठाई वाटून दिवाळीचा सण साजरा केला. दिवाळीसह प्रत्येक सणाला पोलीस आपल्या कुटूंबापासून दूर राहून कर्तव्य बजावत असतात. अनेकदा ऊन पाऊस याची तमा न बाळगता ते रस्त्यावर उभे असतात. अशावेळी त्यांना देखील आपल्या कुटूंबासोबत दिवाळी साजरी करावीशी वाटते पण कर्तव्यभावनेमुळे त्यांना काम करावे लागते. त्यांच्या याच कर्तव्यनिष्ठतेची जाण ठेवून आजच्या या दिवाळीचा सण पोलीस बांधवांना मिठाई वाटून साजरा करण्यात आल्याचे संस्थापक/ अध्यक्ष गजाननभाऊ द. चिंचवडे यांनी सांगितले. यावेळी चिंचवड पोलीस स्टेशनचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक दत्तात्रय चासकर साहेब, शुभम चिंचवडे, पुणे जिल्हा युवक अध्यक्ष कमलजित सिंग,राकेश सायकर, विजय महाजन, संग्राम लाड, रामय्या हिरेमठ आदि उपस्थित होते.

थेरगाव येथे दुकानफोडी करून महागडी घड्याळे चोरणारे दोन चोरटे जेरबंद

पिंपरी : दैनिक संध्या

थेरगाव येथील घड्याळाच्या दुकानाचे छताचे पत्रे उचकटून आणि पीओपी फोडून महागडी घड्याळे चोरी करणाऱ्या दोन चोरट्यांना वाकड पोलिसांनी जेरबंद केले आहे. अमिर शब्बीर शेख आणि इरफान हमीद मुलानी अशी अटक करण्यात आलेल्या आरोपींची नावे आहेत. पोलिसांनी त्यांच्याकडून टायटन, फास्टट्रॅकसह विविध नामांकित कंपन्यांची १०८ महागडी घड्याळे, दुचाकी आणि मोबाईल असा एकूण ९ लाख ८४ हजार ७७० रुपयांचा १०० टक्के मुद्देमाल हस्तगत केला आहे. थेरगाव येथील डांगे चौकाजवळ असलेल्या 'लाले चष्मेवाले अँड वॉचेस' या दुकानात दि. ३ नोव्हेंबर रोजी रात्री ते ४ नोव्हेंबर रोजी सकाळच्या दरम्यान चोरीची घटना घडली होती. चोरट्यांनी दुकानाच्या छताचे पत्रे उचकटून आणि पीओपी फोडून आत प्रवेश केला. त्यानंतर सुमारे ८ लाख २३ हजार ७०१ रुपये किमतीची महागडी घड्याळे आणि डीव्हीआर मशीन चोरी करून पोबारा केला होता. याप्रकरणी वाकड पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला होता. दुकानातील सीसीटीव्ही डीव्हीआरच चोरट्यांनी चोरून नेल्याने तपासात अडचणी निर्माण झाल्या होत्या. मात्र, वाकड पोलिसांच्या तपास पथकाने घटनास्थळाच्या परिसरातील तब्बल १५० ते २०० सरकारी आणि खासगी सीसीटीव्ही कॅमेऱ्यांची तपासणी केली. तांत्रिक विश्लेषणाच्या आधारे चोरट्यांचा माग काढत पोलिसांनी आरोपींची ओळख पटवली. चोरीची घड्याळे विक्री करण्यासाठी संशयित आरोपी काळाखडक, वाकड परिसरात येणार असल्याची माहिती पोलिसांना मिळाली. त्यानुसार पोलिसांनी सापळा रचून दि. १० नोव्हेंबर रोजी अमिर शब्बीर शेख (वय २८) याला ताब्यात घेतले. चौकशीत त्याने साथीदार इरफान हमीद मुलानी (वय २१) याच्या मदतीने चोरी केल्याचे निष्पन्न झाले. त्यानंतर पोलिसांनी इरफान यालाही अटक केली. आरोपींकडून टायटन, टायटन रागा, टायटन एज, फास्टट्रॅक आदी कंपन्यांची १०८ घड्याळे (किंमत ९ लाख ४ हजार ७७० रुपये), ५० हजार रुपये किमतीची ऑक्टिव्हा दुचाकी आणि ३० हजार रुपये किमतीचा मोबाईल असा एकूण ९ लाख ८४ हजार ७७० रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.

सफाई कर्मचाऱ्यांना श्री स्वामी समर्थ सेवा प्रतिष्ठानतर्फे मिठाई वाटप

पिंपरी: दैनिक संध्या

दिवाळी सणाचे औचित्य साधून श्री स्वामी समर्थ सेवा प्रतिष्ठान, शिवतेजनगर यांच्या वतीने पिंपरी-चिंचवड महानगरपालिकेच्या आरोग्य विभागातील सफाई कर्मचाऱ्यांना मिठाईचे वाटप करण्यात आले. शहर स्वच्छ व सुंदर ठेवण्यासाठी अहोरात्र मेहनत घेणाऱ्या सफाई कर्मचाऱ्यांचे योगदान अत्यंत मोलाचे आहे. सणासुदीच्या काळातही आपले कर्तव्य प्रामाणिकपणे बजावणाऱ्या या कर्मचाऱ्यांच्या चेहऱ्यावर आनंद फुलविण्याच्या उद्देशाने प्रतिष्ठानच्या वतीने हा स्तुत्य उपक्रम राबविण्यात आला. या कार्यक्रमाचे आयोजन श्री स्वामी समर्थ सेवा प्रतिष्ठानचे संस्थापक अध्यक्ष तथा माजी नगरसेवक मा. नारायण बहिरवाडे यांनी केले होते. यावेळी प्रतिष्ठानचे उपाध्यक्ष राजीव गुणवंत, सामाजिक कार्यकर्ते प्रा. कल्याणवाणी, राजेंद्र हळी, डॉ. प्रियंका सपकाळ आदी उपस्थित होते. तसेच पिंपरी-चिंचवड महानगरपालिकेच्या आरोग्य विभागाचे आरोग्य निरीक्षक सतीश रोकडे, आरोग्य सहाय्यक राहुल कुकुर्डी, मुकादम विजय डोलारे, संजय हिवाळे, कैलास मांढरे आणि सुभाष कामले आदींची उपस्थिती होती. समाजातील प्रत्येक घटकाचा दिवाळी सण आनंदात साजरा व्हावा आणि समाजासाठी अहोरात्र सेवा देणाऱ्या सफाई कर्मचाऱ्यांप्रती कृतज्ञता व्यक्त व्हावी, या सामाजिक बांधिलकीच्या भावनेतून प्रतिष्ठानने राबविलेल्या या उपक्रमाचे उपस्थितांनी कौतुक केले.

बहिणींच्या उपचारांचा खर्च कमी करण्यासाठी भाऊ म्हणून पूर्ण ताकद लावणार : शेळके

मावळ : दैनिक संध्या

नातं प्रेमाचं, बंध मायेचा आणि सण भाऊबीजेचा... या भावनिक नात्याला सामाजिक बांधिलकीची जोड देत मावळचे आमदार सुनील शेळके यांनी वडेश्वर येथे आयोजित 'मायेची भाऊबीज' सोहळ्यात माता-भगिनींना मदतीचा शब्द दिला. "माझ्या कोणत्याही बहिणीला किंवा तिच्या कुटुंबातील सदस्याला दवाखान्यात दाखल करण्याची वेळ आली, तर रुग्णालयात जाण्यापूर्वी मला एकदा संपर्क करा. उपचारांचा खर्च कमीत कमी कसा होईल, मोफत उपचार कसे मिळतील, यासाठी हा भाऊ पूर्ण ताकदीने प्रयत्न करेल," अशी भावनिक ग्वाही आमदार शेळके यांनी दिली. त्यांच्या या विधानाने उपस्थित माता-भगिनींमध्ये भावनिक वातावरण निर्माण झाले. आंदर मावळमधील वडेश्वर येथे गुरुवारी (दि. १२) आयोजित या भाऊबीज सोहळ्याला माता-भगिनींनी प्रचंड मोठ्या संख्येने उपस्थिती लावली. वडेश्वर, वहानगाव, नागाथली, माऊ, गभालेवाडी आणि सटवाईवाडी परिसरातील महिलांनी या सोहळ्याला मोठी गर्दी केली होती. आमदार सुनील शेळके यांचे स्वागत करण्यासाठी रस्त्याच्या दुतर्फा आकर्षक रांगोळ्या काढण्यात आल्या होत्या. विशेष म्हणजे, आमदार शेळके यांची बैलगाडीतून मिरवणूक काढण्यात आली. या बैलगाडीचे सारथ्य एका महिला भगिनीने केले, तर इतर महिलांनीही बैलगाडीतून सहभागी होत उत्साहात मिरवणूक काढली. महिलांनी भाऊबीजेची गीते गात आमदार शेळके यांचे औक्षण केले आणि त्यांच्याविषयीचे प्रेम व विश्वास व्यक्त केला. यावेळी बोलताना आमदार शेळके म्हणाले की, माझ्या राजकीय वाटचालीच्या सुरुवातीपासूनच माता-भगिनी माझ्या पाठीशी खंबीरपणे उभ्या राहिल्या आहेत.

मृत कर्मचाऱ्यांच्या वारसांना सदनिका वाटपाचे आयुक्त डॉ. सूर्यवंशी यांचे आदेश

■ पिंपरी(दै. संध्या)

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या मोशी येथील कचरा डेपोमध्ये ८ जुलै २०२६ रोजी झालेल्या दुर्घटनेत मृत्यू झालेल्या कर्मचाऱ्यांच्या कुटुंबीयांना दिलासा देणारा महत्त्वपूर्ण निर्णय महापालिका प्रशासनाने घेतला आहे. या दुर्घटनेतील मृत कर्मचाऱ्यांच्या कायदेशीर वारसांना पिंपरी येथील यशवंतनगरमधील एसआरए प्रकल्पांतर्गत महानगरपालिकेकडे उपलब्ध असलेल्या सदनिकांचे वाटप करण्यात येणार आहे. याबाबत महापालिका आयुक्त डॉ. विजय सूर्यवंशी यांच्या स्वाक्षरीने आदेश जारी करण्यात आला आहे.

या आदेशात म्हटले आहे की, ५ नोव्हेंबर २०२६ रोजीच्या मान्यताप्राप्त प्रस्तावानुसार, एकूण ९ पैकी ८ मृत कर्मचाऱ्यांच्या कायदेशीर वारसांना मोफत सदनिकांचे वाटप करण्यात येणार आहे. यामध्ये दिवंगत राहुल धोंडिबा गायकवाड यांच्या पत्नी अश्विनी राहुल गायकवाड, दिवंगत महेश सुरेश कुंभार यांच्या पत्नी शिवुबाई महेश कुंभार, दिवंगत अक्षय राजू सावंत यांच्या पत्नी हर्षदा सुरेश बने, दिवंगत वामन दगडू कसबे यांच्या



पत्नी सुनीता वामन कसबे, दिवंगत सनी अशोक माने यांच्या पत्नी कांचन सनी माने, दिवंगत सुनील भारत कोरके यांच्या पत्नी पल्लवी सुनील कोरके, दिवंगत भावेश मोहन वाणी यांच्या पत्नी मोहिनी भावेश वाणी, तर दिवंगत रणजित जयवंत पाटील यांच्या आई छाया जयवंत पाटील यांचा समावेश आहे. तर दुर्घटनेतील मृत नागेश गायकवाड यांच्या कायदेशीर वारसांच्या कागदपत्रांची पूर्तता अद्याप झालेली नाही. संबंधितांनी कागदपत्रांची पूर्तता केल्यानंतर त्यांना सदनिका वाटप करण्याबाबत कार्यवाही करण्यात येणार आहे. मोशी कचरा डेपो दुर्घटनेतील मृत कर्मचाऱ्यांच्या वारसांना मोफत सदनिका देण्याबाबत मा. महापालिका सभेने दिनांक २ सप्टेंबर २०२६ रोजीच्या ठरावानुसार मान्यता दिली होती. त्यानंतर तातडीने आयुक्त डॉ. विजय सूर्यवंशी यांच्या मार्गदर्शनाखाली व उपायुक्त अण्णा बोदडे यांच्या अधिपत्याखाली झोपडपट्टी पुनर्वसन व निर्मूलन विभागाने मोफत सदनिका देण्याबाबत कार्यवाही सुरू केली होती. त्यानुसार आता पिंपरी येथील यशवंतनगरमधील एसआरए प्रकल्पात या आठ सदनिका उपलब्ध करून देण्याबाबतचा आदेश आयुक्त डॉ. सूर्यवंशी यांच्या स्वाक्षरीने जारी करण्यात आला आहे. या निर्णयामुळे दुर्घटनेत कुटुंबातील कर्त्या व्यक्तीला गमावलेल्या कुटुंबांना निवाऱ्याचा कायमस्वरूपी आधार मिळणार आहे. महापालिका प्रशासनाच्या या निर्णयामुळे दुर्घटनेतील मृत कर्मचाऱ्यांच्या कुटुंबीयांना सामाजिक सुरक्षिततेचा आधार मिळणार असून, त्यांच्या पुनर्वसनाच्या दृष्टीने हा महत्त्वपूर्ण निर्णय ठरणार आहे.

मोशी कचरा डेपो दुर्घटनेत मृत्यू झालेल्या कर्मचाऱ्यांच्या कुटुंबीयांच्या दुःखाची महापालिका प्रशासनाला पूर्ण जाणीव आहे. या कठीण प्रसंगी महापालिका प्रशासन त्यांच्या पाठीशी खंबीरपणे उभे असून, मृत कर्मचाऱ्यांच्या वारसांना आवश्यक ते सर्वतोपरी सहकार्य करण्यात येत आहे. त्यांच्या कुटुंबीयांना आर्थिक मदतीसोबतच हक्काचा निवारा उपलब्ध करून देण्याबाबत महापालिका संवेदनशील असून, त्यांच्या पुनर्वसनासाठी प्रशासन कटिबद्ध आहे, असे डॉ. विजय सूर्यवंशी, आयुक्त, पिंपरी चिंचवड महानगरपालिका यांनी सांगितले. मोशी कचरा डेपो दुर्घटनेत मृत्यू झालेल्या ९ कर्मचाऱ्यांच्या वारसांना सदनिका देण्यात येणार आहेत. त्यापैकी एका कर्मचाऱ्याच्या वारसा कडून अद्याप कागदपत्र पूर्तता केली नाही. त्यामुळे सध्या ८ सदनिका वाटप आदेश करण्यात आले आहेत. या ८ सदनिका यशवंतनगर येथील एसआरए प्रकल्पात उपलब्ध करून देण्यात आल्या आहेत. संबंधित लाभार्थ्यांनी आवश्यक प्रशासकीय प्रक्रिया पूर्ण केल्यानंतर त्यांना सदनिकांचा ताबा देण्यात येईल. यासाठी झोपडपट्टी पुनर्वसन व निर्मूलन विभागामार्फत आवश्यक ती कार्यवाही करण्यात येत आहे, असे अण्णा बोदडे, उपायुक्त, पिंपरी चिंचवड महानगरपालिका यांनी सांगितले.

वारसांना प्रत्येकी १० लाख रुपयांचे आर्थिक सहाय्य

मोशी कचरा डेपो दुर्घटनेत मृत झालेल्या कर्मचाऱ्यांच्या वारसांना प्रत्येकी १० लाख रुपयांचे आर्थिक सहाय्य देण्याबाबतचा ठराव पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या मा. महापालिका सभेने केला होता. त्यानंतर तातडीने आवश्यक ती कार्यवाही करून मृत कर्मचाऱ्यांच्या वारसांना प्रत्येकी १० लाख रुपयांचे आर्थिक सहाय्य मंजूर करून त्याचे वाटपही करण्यात आले. आता मोशी कचरा डेपो दुर्घटनेतील मृत कर्मचाऱ्यांच्या वारसांना मोफत सदनिका उपलब्ध करून देण्याबाबत कार्यवाही सुरू झाली असून, यशवंतनगरमधील एसआरए प्रकल्पात यासाठी ८ सदनिकादेखील उपलब्ध करून देण्यात आल्या आहेत.



नगरसेवक राहुल कलाटे यांच्या पुढाकाराने आयोजित 'दिवाळी संध्या आणि फराळ २०२६' कार्यक्रम संपन्न

■ वाकड (दै. संध्या)

दिवाळी निमित्त नगरसेवक राहुल कलाटे यांच्या पुढाकाराने वाकड येथील कमल प्रतिष्ठान माउंट लिटेरा स्कूल येथे आयोजित करण्यात आलेला 'दिवाळी संध्या आणि फराळ २०२६' हा सांगीतिक सोहळा उत्साहात संपन्न झाला. राष्ट्रीय पुरस्कार विजेते प्रसिद्ध शास्त्रीय गायक राहुल देशपांडे यांच्या सुरेल गायनाने या सोहळ्याला विशेष रंगत आली. संगीत, संस्कृती, भारतीय परंपरा आणि सामाजिक स्नेहबंध यांचा सुंदर संगम घडवणाऱ्या या कार्यक्रमाने उपस्थित रसिकांना मंत्रमुग्ध केले.

दिवाळी निमित्त भाजपा नगरसेवक राहुल कलाटे यांच्या वतीने दरवर्षी प्रमाणे या वर्षी देखील दिवाळी संध्या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. दिवाळीच्या आनंदात नागरिकांना सहभागी करून घेत, त्यांना दर्जेदार सांस्कृतिक कार्यक्रमाची मेजवानी देण्याचा या उपक्रमामागील उद्देश होता.

राष्ट्रीय पुरस्कार विजेते प्रसिद्ध गायक राहुल देशपांडे यांच्या सादरीकरणाने कार्यक्रमातील वातावरण संगीतमय झाले. भारतीय शास्त्रीय आणि उपशास्त्रीय संगीताची समृद्ध परंपरा आपल्या सादरीकरणातून रसिकांपर्यंत पोहोचवणाऱ्या राहुल देशपांडे यांनी आपल्या गायनातून उपस्थितांची मने जिंकली. त्यांच्या सुरेल सादरीकरणाचा आनंद घेताना रसिकांनी या सांगीतिक सोहळ्याला उत्स्फूर्त प्रतिसाद दिला. दिवाळीच्या उत्सवी वातावरणात संगीताची जोड मिळाल्याने हा कार्यक्रम उपस्थितांसाठी एक अविस्मरणीय सांस्कृतिक अनुभव ठरला. कार्यक्रमाच्या माध्यमातून भारतीय संगीतपरंपरेचा गौरव करण्याबरोबरच कला आणि संस्कृतीच्या माध्यमातून समाजातील विविध घटकांना एकत्र आणण्याचा प्रयत्न करण्यात आला. यावेळी राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे पश्चिम महाराष्ट्र कार्यकारिणी सदस्य हेमंतराव हरहरे, विश्वास मोरे, अविनाश चिलेकर, सुनील लांडगे, वसंत कलाटे, सभागृह नेते प्रशांत शितोळे, नगरसेविका सुलभाताई उबाळे, भाजपा शहर सरचिटणीस मधुकर बच्चे, पृथ्वीराज साठे, नगरसेवक कुणाल वाव्हळकर, चेतन भुजबळ, संजय काटे, काळूराम बारणे, सुरेंद्र भोईर, कुशाग्र कदम, यांच्यासह विविध क्षेत्रांतील मान्यवर आणि शहराच्या विविध भागांतून आलेले नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.



संस्कृती आणि सामाजिक एकोप्याचा संदेश

सण-उत्सवांच्या माध्यमातून नागरिकांमध्ये आपुलकीचे नाते अधिक दृढ व्हावे, नव्या पिढीला भारतीय संगीत आणि सांस्कृतिक परंपरेची ओळख व्हावी तसेच समाजातील सर्व घटकांना एकत्र येण्याची संधी मिळावी, या उद्देशाने अशा सांस्कृतिक उपक्रमांचे महत्त्व अधोरेखित होते. 'दिवाळी संध्या आणि फराळ २०२६' या कार्यक्रमाच्या माध्यमातून वाकड परिसरात दिवाळीचा आनंद आणि सांस्कृतिक उत्साह अनुभवायला मिळाला. राहुल कलाटे यांच्या पुढाकाराने आयोजित या सोहळ्याने दिवाळीच्या सणाला सुरेल संगीताची आणि सामाजिक एकोप्याची सुंदर जोड दिली.

"वाकडमध्ये दरवर्षप्रमाणे यंदा देखील 'दिवाळी संध्या आणि फराळ २०२६' या विशेष सांगीतिक सोहळ्याचे आयोजन करण्यात आले होते. राष्ट्रीय पुरस्कार विजेते गायक राहुल देशपांडे यांच्या सुरेल गायनाचा आनंद आपल्या भागातील नागरिकांना एकत्रितपणे घेता यावा, हा यामागील मुख्य हेतू होता. आपल्या समृद्ध भारतीय संगीतपरंपरेचा अभिमान जपत, अशा सांस्कृतिक उपक्रमांच्या माध्यमातून समाजातील प्रत्येक घटकाला आनंदाचे क्षण अनुभवता यावेत, हीच माझी यामागील प्रामाणिक भावना आहे. या सोहळ्याला उत्स्फूर्त प्रतिसाद देणाऱ्या सर्व मान्यवरांचे, नागरिकांचे आणि रसिकांचे मी मनःपूर्वक आभार मानतो."

- राहुल तानाजी कलाटे, नगरसेवक, पिंपरी-चिंचवड महानगरपालिका

गिनीज विश्वविक्रमाची नोंद करणारी 'इंद्रायणी रिव्हर सायक्लोथॉन' २९ नोव्हेंबरला मोशीत!

■ पिंपरी-चिंचवड (दै. संध्या)

सायकलींची सर्वांत लांब रांग उभारून २०२३ मध्ये गिनीज विश्वविक्रम नोंदविणाऱ्या 'इंद्रायणी रिव्हर सायक्लोथॉन'चे यंदाचे आयोजन रविवार, दि. २९ नोव्हेंबर २०२६ रोजी मोशी येथे करण्यात आले आहे. आमदार महेश लांडगे यांच्या संकल्पनेतून सुरू झालेल्या या उपक्रमाची यंदाची रॅली सकाळी ६ वाजता हिंदुभूषण छत्रपती संभाजी महाराज स्मारकाजवळील पीआयईसीसी मैदानावरून (PIECC Ground) सुरू होणार आहे. सहभाग मोफत असून नोंदणीला सुरुवात झाली आहे.

इंद्रायणी नदीची स्वच्छता आणि संवर्धनाचा संदेश देण्यासाठी सुरू झालेल्या या उपक्रमाला यापूर्वीही मोठा प्रतिसाद मिळाला आहे. २०२३ मध्ये सायक्लोथॉनच्या टीमने जर्मनीचा तत्कालीन विक्रम मोडून 'Longest Line of Bicycles (Static)' या प्रकारात गिनीज विश्वविक्रम नोंदवला. त्या वर्षीच्या सायकल रॅलीत ३० हजारांहून अधिक सायकलस्वार सहभागी झाले होते. Pune

तसेच, २३ नोव्हेंबर २०२५ रोजी मोशी येथे झालेल्या सायक्लोथॉनमध्ये ५१ हजार ३०० हून अधिक सायकलस्वार सहभागी झाले होते, तर कार्यक्रमाला सुमारे ७९ हजार नागरिकांची एकूण उपस्थिती होती. यावर्षी आतापर्यंतचे रेकॉर्ड मोडीत काढण्याचा संकल्प आयोजकांनी केला आहे. सहभागींना आपल्या क्षमतेनुसार ५ किंवा २५ किलोमीटर अंतर निवडता येईल. प्रत्येक सहभागीला टी-शर्ट, सहभागाचे पदक आणि अल्पोपाहार देण्यात येणार आहे. इच्छुकांनी अधिकृत पोस्टरवरील QR कोड स्कॅन करून मोफत नोंदणी करावी, असे आवाहन आयोजकांनी केले आहे. या उपक्रमाच्या आयोजनात आणि सहकार्यात अविरत श्रमदान, सायकल मित्र, महेशदादा स्पोर्ट्स फाउंडेशन, पिंपरी-चिंचवड महानगरपालिका, पिंपरी-चिंचवड पोलीस आयुक्तालय आणि पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरण (पीएमआरडीए) यांचा सहभाग आहे.

पिंपरी-चिंचवडमध्ये प्रथमच वरिष्ठ महिला क्रिकेट स्पर्धेचे आयोजन



■ पिंपरी-चिंचवड (दै. संध्या)

पिंपरी-चिंचवड शहर क्रिकेट संघटनेच्या वतीने शहरात प्रथमच वरिष्ठ महिला खुल्या गटाच्या टी-२० क्रिकेट स्पर्धेचे आयोजन करण्यात आले आहे. या स्पर्धेला गुरुवार, दिनांक १२ नोव्हेंबर २०२६ पासून प्रारंभ होणार असून, स्पर्धेची सांगता २३ नोव्हेंबर २०२६ रोजी होणार आहे.

या स्पर्धेत व्हेरॉक वेंगसरकर क्रिकेट अकॅडमी, एसएसए क्रिकेट अकॅडमी, क्विक फिट क्रिकेट अकॅडमी, एस. पी. राठोड इलेव्हन, स्कोर स्पोर्ट्स क्रिकेट अकॅडमी, लक्ष क्रिकेट अकॅडमी, एमबीसीएस क्रिकेट संघ आणि मॅव्हरिक्स क्रिकेट क्लब असे आठ संघ सहभागी होणार आहेत.

स्वच्छ सर्वेक्षणात महाराष्ट्रात पिंपरी चिंचवड महापालिका ठरली अव्वल

■ पिंपरी (दै. संध्या)

स्वच्छ सर्वेक्षण २०२५-२६ मध्ये उल्लेखनीय कामगिरी करत १० लाखांपेक्षा अधिक लोकसंख्या असलेल्या गटात पिंपरी चिंचवड महानगरपालिकेने महाराष्ट्र राज्यात प्रथम क्रमांक पटकावला असून, राज्यातील सर्वाधिक स्वच्छ शहराचा बहुमान मिळविला आहे. शहराच्या स्वच्छता व्यवस्थेत सातत्याने सुधारणा घडवून आणण्यासाठी महापालिकेने केलेल्या नियोजनबद्ध प्रयत्नांची राष्ट्रीय स्तरावरही दखल घेण्यात आली असून, महानगरपालिकेला राष्ट्रीय पुरस्काराने सन्मानित करण्यात आले आहे. नवी दिल्ली येथील विज्ञान भवनात आयोजित पुरस्कार वितरण सोहळ्यात राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांच्या हस्ते हा पुरस्कार प्रदान करण्यात आला.

महानगरपालिकेच्या वतीने महापौर रवि लांडगे आणि आयुक्त डॉ. विजय सूर्यवंशी यांनी हा सन्मान स्वीकारला. यावेळी अतिरिक्त आयुक्त कुलदीप जंगम, उप आयुक्त डॉ. प्रदीप ठेंगल आदी उपस्थित होते. केंद्रीय गृहनिर्माण आणि शहरी कार्यमंत्री मनोहर लाल, केंद्रीय राज्यमंत्री तोखन साहू, संबंधित विभागाचे सचिव सतेंद्र सिंह आणि



सचिव डी. थारा यांच्यासह केंद्र शासनातील वरिष्ठ अधिकारी या सोहळ्यास उपस्थित होते. महाराष्ट्रात मिळालेल्या प्रथम क्रमांकाच्या पुरस्काराने पिंपरी चिंचवड शहराच्या शिरपेचात मानाचा आणखी एक तुरा रोवला गेला आहे. स्वच्छतेच्या बाबतीत शहराची कामगिरी उंचावण्यासाठी केवळ महापालिका यंत्रणेच्या माध्यमातून स्वच्छता राखण्याऐवजी नागरिकांच्या दैनंदिन व्यवहारात स्वच्छतेची शिस्त रुजविण्यावर महानगरपालिकेने भर दिला आहे. कचऱ्याचे उगमस्थानी विलगीकरण, नियमित संकलन, शास्त्रोक्त प्रक्रिया आणि पुनर्वापर या बाबींची प्रभावी अंमलबजावणी करण्याबरोबरच सार्वजनिक ठिकाणांच्या स्वच्छतेकडे विशेष लक्ष देण्यात आले. या प्रयत्नांना तंत्रज्ञानाची जोड आणि विविध प्रशासकीय विभागांचा समन्वय मिळाल्याने शहराच्या स्वच्छता व्यवस्थेला अधिक संघटित आणि परिणामकारक स्वरूप प्राप्त झाले.

थोडक्यात पण महत्वाचे



संगीतरत्न 'दत्ता महाडिक पुणेकर' यांच्या पुण्यतिथी निमित्त तमाशा महोत्सव

नारायणगाव: दैनिक संध्या

महाराष्ट्राच्या लोककलेचा समृद्ध वारसा जपणारे ज्येष्ठ 'संगीतरत्न' कै. दत्ता महाडिक पुणेकर यांच्या पुण्यतिथीनिमित्त मंगरुळ तालुका- जुन्नर, जि- पुणे येथे दिनांक 13 व 14 नोव्हेंबर 2026 रोजी भव्य 'तमाशा महोत्सवाचे' आयोजन करण्यात आले आहे. अशी माहिती कै.संगीतरत्न दत्ता महाडिक यांचे चिरंजीव संजय महाडिक यांनी दिली आहे. या महोत्सवाच्या निमित्ताने लोककलेची परंपरा, इतिहास आणि सद्यस्थितीवर प्रकाश टाकणारे दोन दिवस सांस्कृतिक कार्यक्रमात 6 तमाशाचे कार्यक्रम होणार आहेत.या महोत्सवाला महाराष्ट्रातील राजकीय, सामाजिक, साहित्यिक आणि सांस्कृतिक क्षेत्रातील अनेक मान्यवरांची प्रमुख उपस्थिती लाभणार आहे. ज्येष्ठ साहित्यिक व कलावंत: महाराष्ट्राच्या मातीतील कला आणि साहित्याचा समृद्ध वारसा उलगडण्यासाठी ज्येष्ठ साहित्यिक आणि कला क्षेत्रातील दिग्गजांची विशेष उपस्थिती असणार आहे. राज्यातील प्रमुख तमाशा फडांचे मालक, ज्येष्ठ व तरुण कलावंत या सोहळ्यासाठी एकत्र येणार आहेत.विविध राजकीय पक्षांचे लोकप्रतिनिधी आणि सामाजिक क्षेत्रातील विचारवंत या सोहळ्यात सहभागी होऊन कै. दत्ता महाडिक पुणेकर यांच्या स्मृतींना अभिवादन करतील. पारंपरिक तमाशा कलेचे सादरीकरण, गण, गवळण, बतावणी,सवालजबाब, लावणी, वगनाट्य लोकसंगीताचे रंगतदार कार्यक्रम रसिकांसाठी विशेष आकर्षण ठरणार आहेत. लोककलाप्रेमींनी या महोत्सवात मोठ्या संख्येने उपस्थित राहून कार्यक्रमाची शोभा वाढवण्याचे आवाहन कै.संगीतरत्न दत्ता महाडीक परीवार आणि मंगरुळ समस्त ग्रामस्थ यांनी केले आहे.

भोसे सोसायटीच्या चेअरमनपदी कर्तुत्ववान महिलेला संधी, कानडे अध्यक्षपदी विराजमान



चाकण : दैनिक संध्या

खेड तालुक्यातील भोसे विविध कार्यकारी सेवा सहकारी विकास सोसायटीच्या चेअरमनपदी येथील कर्तुत्ववान महिला अपर्णा सुरेश कानडे यांना संधी देण्यात आली आहे. कानडे ह्या अध्यक्षपदी विराजमान झाल्या आहेत. या संस्थेच्या १०० वर्षांच्या इतिहासात प्रथमच कानडे यांना महिला चेअरमन होण्याचा मान मिळाला आहे. अपर्णा कानडे यांनी अत्यंत प्रतिकूल परिस्थितीत शिक्षणाची जिद्द कायम ठेवत बी कॉम, जीडीसी अँड ए तसेच डीसीएम, डीएड, बाळ मानसशास्त्र असे शिक्षण पूर्ण केले आहे. शिक्षण, सामाजिक कार्य आणि प्री स्कूल प्राचार्य आदी संस्थात्मक जबाबदारीत त्यांचा सुंदर संगम त्यांच्या व्यक्तिमत्त्वात पाहायला मिळतो. अपर्णा कानडे यांच्या यशस्वी वाटचालीत त्यांचे पती सुरेश कानडे यांची मोलाची साथ, प्रोत्साहन आणि मार्गदर्शन लाभले. चेअरमन पदाच्या माध्यमातून शेतकरी, सभासद आणि संस्थेच्या सर्वांगीण विकासासाठी प्रामाणिकपणे कार्य करण्याचा संकल्प त्यांनी यावेळी व्यक्त केला आहे. तसेच त्यांचा मुलगा आशुतोष, डॉ. राधिका व छोटा चिरंजीव अद्वय यांचे प्रेम, सहकार्य व पाठबळ त्यांच्यासाठी प्रेरणादायी ठरले. भोसे ग्रामस्थ, सोसायटीचे सर्व संचालक, गणेश कानडे यांची साथ, आई, नातेवाईक तसेच हितचिंतकांनी त्यांचे कौतुक करून पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या आहेत.

ओळख श्री ज्ञानेश्वरी' पुस्तकाचे शनिवारी प्रकाशन; मान्यवरांचा सन्मान सोहळा

आळंदी देवाची : दैनिक संध्या

श्री ज्ञानेश्वर महाराज संस्थान कमिटी, आळंदी देवाची आणि 'ओळख श्री ज्ञानेश्वरी' एक परिवार यांच्या संयुक्त विद्यमाने 'ओळख श्री ज्ञानेश्वरी' या पुस्तकाचा प्रकाशन सोहळा आणि पुस्तक निर्मितीत सहभागी संस्था, प्राचार्य व अध्यापकांचा सन्मान सोहळा आयोजित करण्यात आला आहे. शनिवार (दि.१४) आळंदीतील कुबेर बँक्वेट हॉल येथे दोन सत्रांत हा कार्यक्रम होणार आहे. पहिल्या सत्रात सकाळी पुस्तक प्रकाशन सोहळा पार पडणार असून, आमदार बाबाजी काळे यांच्या शुभहस्ते प्रकाशन होणार आहे. यावेळी नगराध्यक्ष प्रशांत कुऱ्हाडे, श्री ज्ञानेश्वर महाराज संस्थान कमिटीचे प्रमुख विश्वस्त डॉ.भावार्थ देखणे आणि विश्वस्त पुरुषोत्तम महाराज पाटील यांची प्रमुख उपस्थिती असणार आहे. दुसऱ्या सत्रात डॉ.नारायण महाराज जाधव यांच्या प्रमुख उपस्थितीत सन्मान सोहळा होणार आहे. यावेळी उपनगराध्यक्षा सुजाता तापकीर, संस्थानचे विश्वस्त चैतन्य महाराज लोंढे, योगी निरंजननाथ तसेच संत साहित्याचे ज्येष्ठ अभ्यासक अभय टिळक उपस्थित राहणार आहेत. या कार्यक्रमाच्या माध्यमातून श्री ज्ञानेश्वरी ग्रंथाचा परिचय अधिक व्यापक करण्यासह पुस्तक निर्मितीत योगदान देणाऱ्या संस्था, प्राचार्य आणि अध्यापकांच्या कार्याचा गौरव करण्यात येणार आहे. कार्यक्रमास भाविक, वारकरी, साहित्यप्रेमी आणि नागरिकांनी उपस्थित राहावे, असे आवाहन ओळख श्री ज्ञानेश्वरी परीवाराचे समन्वयक प्रकाश काळे यांच्या वतीने करण्यात आले आहे.

वडगाव कांदळीत 'किल्ले शिवनेरी स्पर्धे'चे पाचवे पर्व उत्साहात संपन्न

वडगाव कांदळी : दैनिक संध्या

छत्रपती शिवाजी महाराजांच्या पराक्रमाची आणि देदीप्यमान इतिहासाची साक्ष देणाऱ्या शिवनेरी किल्ल्याच्या प्रेरणेतून वडगाव कांदळी येथे आयोजित करण्यात आलेल्या 'किल्ले शिवनेरी किल्ले बनवा स्पर्धा २०२६' या स्पर्धेचे पाचवे पर्व मोठ्या उत्साहात आणि दिमाखात संपन्न झाले. या ऐतिहासिक स्पर्धेचे आयोजन स्वराज्य ग्रुपच्या वतीने करण्यात आले होते. लहान मुलांपासून तरुणांपर्यंत शिवरायांचा जाज्वल्य इतिहास पोहोचवणे, गडकिल्ल्यांविषयी आवड निर्माण करणे तसेच ऐतिहासिक वारसा आणि गड-किल्ल्यांच्या संवर्धनाबाबत जनजागृती करणे हा या उपक्रमामागील मुख्य उद्देश होता. स्पर्धेमध्ये सहभागी झालेल्या स्पर्धकांनी आपल्या कल्पकतेतून आणि मेहनतीतून शिवनेरी किल्ल्याच्या प्रतिकृती साकारल्या. प्रत्येक स्पर्धकाला आकर्षक ट्रॉफी आणि रोख बक्षीस देऊन गौरविण्यात आले. त्यामुळे स्पर्धकांचा उत्साह द्विगुणित झाला. या कार्यक्रमास वडगाव कांदळीच्या सरपंच सौ. उल्काताई श्रीकांत पाचपुते, उपसरपंच संजय खेडकर, माजी सरपंच रामदासशेठ पवार, शरदशेठ पाचपुते, आर. डी. पाचपुते साहेब, बबन पाचपुते सर, रंगनाथ पाचपुते, गोरक्ष मुटके, रामदास भोर, मच्छिंद्र भोर, महेंद्र सोनवणे, विनोद पवार आणि सुभाष लांडगे आदी मान्यवर उपस्थित होते. या स्पर्धेच्या यशस्वी आयोजनासाठी स्वराज्य ग्रुपचे कृष्णा भोर, विनायक लांडगे, प्रकाश थोरात, गौरव पाचपुते, रोहन पाचपुते, संदीप निलख, प्रसाद पवार, सूरज मुटके, रत्नाकर पवार, संदेश पवार, रोहन भोर, साहिल भोर, अभि पाचपुते, सिद्धेश सोनवणे, अफलाब शेख, मच्छिंद्र मुटके, संदीप भोर आदी सदस्यांनी विशेष परिश्रम घेतले.

बहिरवाडी शाळेसाठी मदतीचा माजी विद्यार्थ्यांचा संकल्प

■ काळदरी (दै. संध्या)



येथील पुणे जिल्हा परिषद, पुणे अंतर्गत जिल्हा परिषद प्राथमिक शाळा, बहिरवाडी केंद्र -काळदरी, तालुका पुरंदर या ठिकाणी माजी विद्यार्थी स्नेहमेळावा आयोजित करण्यात आला. शाळेतून शिकून गेलेले व वेगवेगळ्या क्षेत्रात कार्यरत असलेल्या माजी विद्यार्थ्यांचा भव्य मेळावा दिवाळी पाडव्याच्या शुभमुहूर्तावर उत्साहात आणि भावनिक वातावरणात पार पडला. या स्नेहमेळाव्याचे आयोजन शाळा व्यवस्थापन समिती, माजी विद्यार्थी संघ, माता पालक संघ, ग्रामपंचायत बहिरवाडी यांनी केले होते. यावेळी गावाच्या शैक्षणिक परंपरेला नवचैतन्य देणारा आणि पिढ्यान्पिढ्या विद्यार्थ्यांना ज्ञानदान करणाऱ्या या शाळेच्या विकासासाठी माजी विद्यार्थ्यांनी सर्वतोपरी मदत करण्याचे आश्वासन दिले.

यावेळी शाळा व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष श्री सागर ढगारे यांच्या हस्ते या स्नेहमेळाव्याचे उद्घाटन करण्यात आले तर मुख्याध्यापक अनिल गळंगे यांनी मेळाव्याचे अध्यक्षस्थान भूषवले. मेळाव्याचा उद्देश माजी आणि विद्यमान विद्यार्थ्यांमधील स्नेहबंध दृढ करणे, शाळेच्या विकासासाठी उपाययोजना चर्चा करणे, तसेच शिक्षण आणि सामाजिक क्षेत्रात सहकार्य वाढवणे हा होता. याप्रसंगी स्नेहमेळाव्यात माजी विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते. अनेकांनी आपल्या शालेय जीवनातील सुवर्ण आठवणींना उजाळा दिला.

शाळेने त्यांच्या आयुष्याला दिलेली दिशा, शिक्षकांचे संस्कार आणि शिक्षणामुळे मिळालेले यश याबद्दल सर्वांनी शाळेप्रती कृतज्ञता व्यक्त केली. यावेळी माजी विद्यार्थ्यांनी एकमुखाने निर्णय घेतला की, शाळेच्या शैक्षणिक आणि भौतिक विकासासाठी आम्ही नेहमी तत्पर राहू.


आपल्या ज्ञानाचा, अनुभवांचा, मार्गदर्शनाचा शाळेच्या भविष्यातील वाटचालीसाठी सदुपयोग करण्याबाबत मानस व्यक्त केला. यावेळी शाळेसाठी शिष्यवृत्ती पुस्तके, अवांतर पुस्तके, इलेक्ट्रीकल साहित्य बक्षीसे म्हणून देण्यात आली. तसेच मान्यवरांच्या शुभहस्ते दिवाळी सुट्टीतील किल्ले स्पर्धेतील विजेत्यांना बक्षिसे देण्यात आली तसेच कब-बुलबुल प्रमाणपत्रांचे वाटप करण्यात आले.

शाळा व्यवस्थापन समिती तर्फे आयडॉल शिक्षक म्हणून निवड झाल्याबद्दल श्री अनिल गळंगे सर यांचा सत्कार करण्यात आला.

माजी विद्यार्थी प्रिया वाघमारे ,सागर ढगारे, राजेंद्र कोकरे, मारुती कोकरे,स्वाती वाघमारे,अलका वाशिलकर यांनी मनोगत व्यक्त केली. कार्यक्रमप्रसंगी शाळा व्यवस्थापन समिती अध्यक्ष श्री सागर ढगारे, राजेंद्र कोकरे,किरण चिव्हे, संतोष कोकरे, मारुती कोकरे, विजय जानकर, दत्तात्रय जानकर, सुभाष भगत, तुषार भगत, राजू भगत, शंकर भगत, कारकूडदादा, बनूबाई ढगारे, सुनिता ढगारे, स्वाती वाघमारे, संगिता ढगारे आदी मान्यवर उपस्थित होते.

दौंड पश्चिम पट्ट्यातील शैक्षणिक क्षेत्रातील लिंगपिसाट एका शिक्षकाची चर्चा!

■ दौंड (दै. संध्या)



दौंड तालुक्याच्या पश्चिम पट्ट्या मधील उच्च माध्यमिक विद्यालयातील एका शिक्षकाने अनेक विद्यार्थिनीशी लैंगिक अत्याचार केल्याची घटना घडली असून नागरिकांमधून दबक्या आवाजात बोलले जात आहे.

दौंड तालुक्याच्या पश्चिम पट्ट्यातील एका उच्च माध्यमिक विद्यालयातील शिक्षकाच्या कथित गैरवर्तनाबाबत परिसरात चर्चेला उधाण आले असून, या प्रकरणामुळे शिक्षण क्षेत्राच्या विश्वासार्हतेवर प्रश्नचिन्ह उपस्थित केले जात आहे.

संबंधित शिक्षकाने विद्यार्थिनींशी अनुचित जवळीक साधल्याचे तसेच यापूर्वीही अशा प्रकारच्या तक्रारी असल्याचे आरोप चर्चेतून पुढे येत आहेत.

ग्रामीण भागातील सर्वसामान्य कुटुंबांना शहरातील महागडे शिक्षण परवडत नसल्याने पालक आपल्या मुलींना जवळच्या शैक्षणिक संस्थांमध्ये प्रवेश देऊन शिक्षणाची संधी उपलब्ध करून देतात. अशा परिस्थितीत विद्यार्थिनींच्या सुरक्षिततेची जबाबदारी ही शैक्षणिक संस्थांची अत्यंत महत्त्वाची जबाबदारी ठरते.

शिक्षक आणि विद्यार्थी यांच्यातील नाते हे विश्वास, संस्कार आणि मार्गदर्शनाचे असते. या नात्याला बाधा पोहोचविणाऱ्या कोणत्याही प्रकाराची गंभीर दखल घेणे आवश्यक आहे. शिक्षकाच्या कथित गैरवर्तनामुळे पालकांमध्ये चिंतेचे वातावरण निर्माण होत असल्याची चर्चा आहे. दरम्यान, संबंधित शिक्षकाला संस्थाचालकांकडून पाठीशी घातले जात असल्याचीही चर्चा परिसरात सुरू आहे. मात्र, या संदर्भातील अधिकृत भूमिका अद्याप स्पष्ट झालेली नाही.आरोपांची निष्पक्ष चौकशी करून सत्य परिस्थिती जनतेसमोर आणण्याची मागणी होत आहे. या प्रकरणाची शिक्षण विभागाने तातडीने दखल घ्यावी, विद्यार्थिनींचे जबाब सुरक्षित वातावरणात नोंदवावेत, तसेच आरोप सिद्ध झाल्यास संबंधित शिक्षकावर नियमानुसार कठोर शिस्तभंगाची कारवाई करावी, अशी मागणी पालक व नागरिकांमधून होत आहे.

नगदवाडीत 'नगदवाडी प्रीमियर लीग' क्रिकेट स्पर्धेचा थरार

■ वडगाव कांदळी (दै. संध्या)

ग्रामीण भागातील क्रिकेटपटूंना हक्काचे व्यासपीठ मिळावे, युवकांमध्ये क्रीडाभावना निर्माण व्हावी आणि ग्रामस्थांमध्ये एकोपा व उत्साह वाढावा, या उद्देशाने सिद्धिविनायक ग्रुप व समस्त ग्रामस्थ नगदवाडी (कांदळी) यांच्या वतीने 'नगदवाडी प्रीमियर लीग (NPL) पर्व सहावे' या भव्य क्रिकेट स्पर्धेचे आयोजन करण्यात आले आहे. शुक्रवार, दि. १३ नोव्हेंबर ते रविवार, दि. १५ नोव्हेंबर २०२६ या कालावधीत खंडोबा मंदिराजवळ, नगदवाडी, (ता. जुन्नर)येथे या स्पर्धेचा क्रिकेटचा थरार रंगणार आहे.

या स्पर्धेचा उद्घाटन समारंभ शुक्रवार, दि. १३ नोव्हेंबर रोजी सकाळी ९ वाजता होणार असून, रविवार, दि. १५ नोव्हेंबर रोजी सायंकाळी ५ वाजता बक्षीस वितरण समारंभ आयोजित करण्यात आला आहे. या स्पर्धेत विजेत्या संघाला २१ हजार रुपये, द्वितीय क्रमांकाच्या संघाला १८ हजार रुपये, तृतीय क्रमांकाला १५ हजार रुपये, तर चतुर्थ क्रमांकाला १२ हजार रुपये रोख पारितोषिक देण्यात येणार आहे.

याशिवाय उत्कृष्ट खेळाडूंना विविध वैयक्तिक पुरस्कारांनी गौरविण्यात येणार आहे. मॅन ऑफ द मॅच, मैदानाचा राजा, बॉल बॉय, टी-शर्ट, कॅप तसेच ट्रॉफींसाठी विविध मान्यवरांनी आणि दानशूर व्यक्तींनी प्रायोजकत्व दिले आहे. स्थानिक उद्योजक, व्यावसायिक आणि ग्रामस्थांच्या सहकार्यामुळे या स्पर्धेला भव्य स्वरूप प्राप्त झाले आहे. स्पर्धेच्या आयोजनासाठी सिद्धिविनायक ग्रुपच्या सदस्यांनी विशेष मेहनत घेतली असून, सरपंच, उपसरपंच, ग्रामपंचायत सदस्य, ग्रामसेवक, कर्मचारीवृंद, ग्रामस्थ मंडळी आणि परिसरातील मान्यवरांची प्रमुख उपस्थिती लाभणार आहे. ग्रामीण भागातील खेळाडूंना आपले कौशल्य दाखविण्याची संधी मिळावी, नवोदित क्रिकेटपटूंना प्रोत्साहन मिळावे आणि गावातील तरुणाईला एकत्र आणणारा क्रीडामहोत्सव साजरा व्हावा, हा या स्पर्धेमागील प्रमुख हेतू आहे.

वित्त आयोगातून तीन गावांसाठी घंटागाड्या मंजूर



■ चाकण (दै. संध्या)

ग्रामीण भागातील स्वच्छता आणि कचरा व्यवस्थापनाला चालना देण्यासाठी खेड तालुक्यातील कोरेगाव खुर्द, रोहकल व वाकी खुर्द या प्रमुख तीन गावांसाठी घंटागाड्या मंजूर झाल्या आहेत.

माजी आमदार दिलीप मोहिते, जिल्हा परिषदेचे माजी सदस्य शरद बुट्टे पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली व पंचायत समितीच्या सदस्या श्रद्धा मांडेकर यांच्या प्रयत्नांतून पंधराव्या वित्त आयोगाच्या निधीतून तीन घंटागाड्या मंजूर करण्यात आल्या आहेत. या कामांना प्रशासकीय मान्यता देण्यात आली असून, शरद बुट्टे पाटील यांच्या हस्ते मान्यता प्रदान करण्यात आली आहे. वरील तीनही गावांमधील कचरा संकलन आणि व्यवस्थापन यापुढे अधिक सक्षम होण्यास मोठी मदत होणार आहे. घंटागाडीमुळे परिसरातील कचरा नियमित आणि दररोज उचलण्यात येणार आहे. त्यामुळे नागरिकांची दुर्गंधीतून सुटका होऊन सर्वजण मोकळा श्वास घेऊ शकतील. ग्रामपंचायत स्तरावर स्वच्छतेचा प्रश्न मार्गी लावण्यासाठी उचललेले हे महत्त्वपूर्ण पाऊल असल्याचे श्रद्धा मांडेकर यांनी सांगितले. चाकण नजीक असलेल्या वाकी खुर्द येथील ग्रामस्थांना याबाबत माहिती देण्यात आली आहे. यावेळी माजी सदस्य शरद बुट्टे पाटील, माजी सरपंच सुनील वहिले, उद्योजक नितीन जाधव, संतोष जाधव, प्रमोद जाधव व दीपक जाधव आदी उपस्थित होते.

चाकण परिसरात भाऊबीज दिमाखात साजरी

■ चाकण (दै. संध्या)



भाऊ बहिणीच्या प्रेमाचे, जिव्हाळ्याचे नाते घट्ट करणारा भाऊबीजेचा सण चाकण शहर व परिसरात मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला.

भाऊ बहिणीमधील प्रेमाचे नाते अधिक घट्ट व्हावे, या भावनेतून बहिणींनी भावांना औक्षण करून त्यांच्या दीर्घायुष्याची प्रार्थना केली. तर भावांनी बहिणींना भेटवस्तू देत या नात्यातील गोडवा अधिक वाढवला. चाकण येथील उद्योजक विकासभाऊ गोरे यांनी अनोख्या पद्धतीने भाऊबीज सण साजरा केला. भाऊबीजेनिमित्त चाकण शहरातील मुख्य बाजारपेठेत नागरिकांची मोठी गर्दी पाहायला मिळाली. विशेषतः कपड्यांची दुकाने, भेटवस्तूंची दुकाने तसेच चिकन, मटण व मच्छी मार्केट परिसरात खरेदीसाठी नागरिकांची प्रचंड वर्दळ पहायला मिळाली.

नवीन कपडे, मिठाई आणि विविध भेटवस्तू खरेदी करण्यासाठी नागरिकांनी बाजारपेठेत तोबा गर्दी केली होती. सणाच्या उत्साहामुळे संपूर्ण बाजारपेठेला चैतन्याचे वातावरण निर्माण झाले होते.

भाऊबीजेच्या निमित्ताने शहरातील व्यापाऱ्यांमध्येही समाधानाचे वातावरण दिसून आले. प्रेम, आपुलकी आणि कौटुंबिक नात्यांचा गोडवा जपणारा भाऊबीजेचा सण चाकणकरांनी मोठ्या दिमाखात साजरा केला. चाकण नगरपरिषदेचे मुख्याधिकारी डॉ. अंकुश जाधव, नगराध्यक्षा मनीषा गोरे व गटनेते नितीन गोरे आदींनी चाकणकरांनी राबविलेल्या विविध उपक्रमांचे कौतुक केले.

जयाद्री खोऱ्यात मांडकी येथे हौदात पडलेल्या बिबट्याची सुखरूप सुटका

■ पुरंदर (दै. संध्या)



जयाद्री खोऱ्यातील मांडकी गाव परिसरात गोठ्याशेजारील पाण्याच्या हौदात पडलेल्या बिबट्याची वनविभाग, जेजुरी पोलीस आणि रेस्क्यू चॅरिटेबल ट्रस्टच्या पथकाने संयुक्त बचावमोहीम राबवून सुखरूप सुटका केली. शुक्रवारी (दि. १३ नोव्हेंबर) दुपारी साडेबारा वाजण्याच्या सुमारास ही मोहीम यशस्वी झाली. त्यानंतर बिबट्याला पुढील वैद्यकीय तपासणी व उपचारांसाठी बावधन येथील वन्यजीव उपचार केंद्रात हलविण्यात आले.

मांडकी येथील धुळोबा वस्तीमध्ये श्रीकांत किसन जगताप यांच्या गोठ्याशेजारी असलेल्या पाण्याच्या हौदात बिबट्या पडल्याची माहिती मिळताच वनविभाग पुरंदरचे कर्मचारी, जेजुरी पोलीस ठाण्याचे कर्मचारी आणि रेस्क्यू चॅरिटेबल ट्रस्टच्या बचाव पथकाने तातडीने घटनास्थळी धाव घेतली. सर्व यंत्रणांनी समन्वयाने आणि काळजीपूर्वक बचावकार्य राबविले. अखेर दुपारी १२.३० वाजता बिबट्याला हौदातून सुरक्षित बाहेर काढण्यात यश आले.

या बचाव मोहिमेत वनविभागाचे वनपरिक्षेत्र अधिकारी सागर ढोले (सासवड), वनपाल दीपाली शिंदे (जेजुरी), गणेश पवार (सासवड), तसेच वनरक्षक अशोक फडतरे, विकास निकम, अक्षय लव्हाळे, अमीर सय्यद व गणेश तांबे यांनी सहभाग घेतला. जेजुरी पोलीस ठाण्याचे सहाय्यक पोलीस निरीक्षक रविंद्र पाटील यांनीही सहकार्य केले. रेस्क्यू चॅरिटेबल ट्रस्टच्या वतीने तुहिन, श्रेयस कांबळे, श्रीनाथ चव्हाण, हेमराज आणि अन्य स्वयंसेवकांनी बचावकार्यात महत्त्वाची भूमिका बजावली.सध्या परिसरात ऊसतोड हंगाम सुरू असल्याने बिबट्यांचा मानवी वस्त्यांमध्ये वावर वाढण्याच्या घटना घडत आहेत. या पार्श्वभूमीवर नागरिकांनी सतर्क राहण्याचे आवाहन वनविभागाकडून करण्यात आले आहे. घराजवळील विहिरी, हौद आणि पाण्याच्या टाक्यांना सुरक्षित संरक्षक कठडे किंवा जाळी बसवावी, असे आवाहन करण्यात आले आहे.बिबट्या किंवा अन्य वन्यप्राणी आढळल्यास घाबरून न जाता गर्दी करू नये, दगड मारू नये अथवा स्वतःहून पकडण्याचा प्रयत्न करू नये. तातडीने वनविभागाला माहिती देऊन बचावकार्यात सहकार्य करावे, असे आवाहन करण्यात आले आहे. मांडकी येथील या घटनेत विविध यंत्रणांनी दाखविलेल्या तत्परतेमुळे बिबट्याचे प्राण वाचविण्यात यश आले असून, वन्यजीव संरक्षणासाठी नागरिकांची सतर्कता आणि प्रशासनाचा समन्वय किती महत्त्वाचा आहे, हे पुन्हा अधोरेखित झाले आहे.

थोडक्यात पण महत्वाचे



FIआयएसटीइ महाराष्ट्र-गोवा विभागीय पुरस्कारांत एमएसीओइ ची दुहेरी बाजी

पुणे : दैनिक संध्या

मराठवाडा मित्रमंडळाच्या कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग (MMCOE), पुणे या संस्थेने प्रतिष्ठेच्या ISTE (इंडियन सोसायटी फॉर टेक्निकल एज्युकेशन) महाराष्ट्र-गोवा विभागीय पुरस्कार २०२६ मध्ये दोन मानाचे पुरस्कार पटकावत उल्लेखनीय यश संपादन केले आहे. महाविद्यालयाला 'बेस्ट इंजिनिअरिंग कॉलेज (डिग्री)' हा पुरस्कार प्रदान करण्यात आला, तर महाविद्यालयाच्या कॉम्प्युटर इंजिनिअरिंग विभागाच्या प्रमुख व ISTE समन्वयक डॉ.संकीर्ती शिरवले यांना 'बेस्ट वुमन टीचिंग फॅकल्टी' पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. तांत्रिक शिक्षणातील उत्कृष्ट कामगिरी,शैक्षणिक गुणवत्ता आणि संस्थात्मक विकासातील योगदानाची दखल घेत महाविद्यालयाला हा पुरस्कार देण्यात आला. महाविद्यालयाच्या वतीने प्राचार्य डॉ. सचिन साखरे, डॉ. संकीर्ती शिरवले, ISTE फॅकल्टी अॅडव्हायझर माधवी इंदलकर आणि डॉ. विलास बुगडे यांनी पुरस्कार स्वीकारला. डॉ. संकीर्ती शिरवले यांनी अध्यापन क्षेत्रात केलेले उल्लेखनीय कार्य,शैक्षणिक योगदान आणि विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी केलेल्या प्रयत्नांची दखल घेत त्यांना वैयक्तिक पुरस्काराने गौरविण्यात आले. महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. सचिन साखरे यांच्या दूरदृष्टीपूर्ण नेतृत्वाखाली संस्थेत गुणवत्तापूर्ण शिक्षण, संशोधन,नवे उपक्रम आणि कौशल्याधारित तांत्रिक शिक्षणाला सातत्याने प्रोत्साहन दिले जात आहे.या पुरस्कारांमुळे महाविद्यालयाच्या शैक्षणिक वाटचालीला आणि प्राध्यापकांच्या योगदानाला विभागीय स्तरावर मान्यता मिळाली आहे. या दुहेरी यशाबद्दल संस्थेचे पदाधिकारी, प्राचार्य, शिक्षकवृंद आणि शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी पुरस्कारप्राप्त मान्यवरांचे अभिनंदन केले.

बाईकस्वाराने घेतला खेळाडूचा जीव; आरोपीला सोडल्याने भूमिकेवर संशय

नागपूर : दैनिक संध्या

निष्काळजीपणे वाहन चालवून एका दुचाकीस्वाराने राष्ट्रीय खेळाडूचा जीव घेतला. अपघातानंतर जमावाने आरोपीला पकडून पोलिसांच्या हवाली केले. मात्र, पोलिसांनी मध्यरात्रीच्या सुमारास त्याला संशयास्पदरीत्या सोडून दिले. पोलिसांच्या या संवेदनाहीन कारवाईमुळे संतप्त झालेल्या नातेवाइकांसह नागरिकांनी अवनीचा मृतदेह थेट डीसीपी कार्यालयासमोर नेला. तेथे घोषणाबाजी करीत रोष व्यक्त केल्याने परिसरात तणाव निर्माण झाला. अवनी मुकेश बघेल असे मृत युवतीचे नाव आहे. जिद्द आणि परिश्रमाच्या बळावर सेपक टकरा या खेळात तिने राष्ट्रीय स्तरावर नाव कमावले होते. या प्रतिभावान खेळाडूचा बुधवारी सायंकाळी संघर्षनगर चौकात झालेल्या अपघातात मृत्यू झाला. अपघाताला कारणीभूत असलेल्या दुचाकीस्वाराला नागरिकांनी पकडून नंदनवन पोलिसांच्या स्वाधीन केले होते. मात्र, बुधवारी मध्यरात्रीनंतर परिसरात सामसूम झाल्यावर पोलिसांनी त्याला सोडून दिले. गुरुवारी सकाळी ही माहिती अवनीच्या कुटुंबीयांना मिळताच त्यांचा संताप अनावर झाला. कुटुंबीयांनी ही माहिती नगरसेवक वसीम खान यांना दिली. त्यांनी नातेवाइकांसह नंदनवन पोलिस ठाण्यातील वरिष्ठ अधिकाऱ्यांशी संपर्क साधला. संबंधित व्यक्तीला सूचना पत्र देऊन सोडण्यात आले असून, पुढील कारवाई केली जाईल, असे जुजबी उत्तर पोलिसांकडून देण्यात आले. त्यामुळे नातेवाइकांचा रोष आणखीच वाढला. दरम्यान, गुरुवारी अवनीचे नातेवाईक, क्रीडा अकादमीतील सहकारी खेळाडू आणि परिसरातील नागरिक मोठ्या संख्येने एकत्र आले.

गुंडाची मेडिकल चौकात निर्घृण हत्या

नागपूर : दैनिक संध्या

रामबागमधील कुख्यात गुंड पलाश वासनिक याची त्याच्या मेव्हण्याने घातक शस्त्राचे घाव घातल्यानंतर दगडाने ठेचून निर्घृण हत्या केली. गुरुवारी रात्री १०.३० ते ११ च्या सुमारास मेडिकल चौकात ही थरारक घटना घडली. यामुळे परिसरात मध्यरात्रीपर्यंत तणावाचे वातावरण होते. पलाश वासनिक हा शहरातील जुना हिस्ट्रीशीटर असून, त्याच्याविरुद्ध अनेक गंभीर गुन्हे दाखल आहेत. दोन महिन्यांपूर्वीच तो एमपीडीए अंतर्गत झालेल्या कारवाईतून कारागृहातून बाहेर आला होता. तो गुरुवारी रात्री १०.३० च्या सुमारास मेडिकलच्या गेटजवळ आला असताना दोन आरोपी त्याच्याजवळ आले. त्यांनी पलाशसोबत वाद घातला. पलाश आणि आरोपी अचानक आक्रमक झाले आणि आरोपींनी त्याच्यावर चाकूचे सपासप घाव घातले. तो प्रतिकार करीत असताना खाली पडला. त्यानंतर आरोपींनी बाजूची सिमेंटची कुंडी उचलून त्याच्या डोक्यावर, तोंडावर अनेक फटके मारून त्याला अक्षरश: ठेचून काढले. प्रत्यक्षदर्शींच्या माहितीनुसार, अत्यंत वर्दळीच्या ठिकाणी भर रस्त्यावर हा थरार घडत असल्याने जाणाऱ्या-येणाऱ्यांच्या अंगावर काटे येत होते. अनेकांनी आपली वाहने कशीबशी तेथून काढली. दरम्यान, पलाशचा मृत्यू झाल्यानंतर आरोपी त्याला रक्ताच्या थारोळ्यात सोडून पळून गेले. त्यानंतर तेथे बघ्यांची मोठी गर्दी जमली. त्यामुळे वाहतूकीला अडसर निर्माण झाला. दरम्यान, या घटनेची माहिती कळताच अजनी, इमामवाडा पोलिस ठाण्यातील ताफा आणि गस्तीवरील वाहने तेथे पोहोचली. ट्रॅफिक जाममुळे घटनास्थळी प्रचंड तणाव निर्माण झाल्याचे समजल्याने झोन ४ च्या डीसीपी रश्मिता राव, गुन्हे शाखेचे उपायुक्त दीपक अग्रवाल, अतिरिक्त आयुक्त वसंत परदेशी, अतिरिक्त आयुक्त राजेंद्र दाभाडे, सहपोलिस आयुक्त नवीनचंद्र रेड्डी हेसुद्धा घटनास्थळी पोहोचले. तोपर्यंत पोलिसांनी तेथील गर्दी हटवून 'क्राईम स्पॉट'ला बॅरिकेड केले.

बाजारगावातील अनंतारा हॉटेल आगीच्या भक्ष्यस्थानी; मंडळ अधिकाऱ्याचा गुदमरून मृत्यू

बाजारगाव: दैनिक संध्या

नागपूर-अमरावती राष्ट्रीय महामार्गावरील बाजारगाव येथील प्रसिद्ध अनंतारा हॉटेलला गुरुवारी (ता. १२) रात्री भीषण आग लागली. आगीमुळे हॉटेलच्या खोल्यांमध्ये धुराचे लोट पसरले. याच धुरामुळे खोलीत अडकलेल्या एका व्यक्तीचा गुदमरून मृत्यू झाला. मनोज सदाशिवराव बांडे (वय ५८, रा. अंजनगावसुर्जी, जि. अमरावती) असे मृताचे नाव असून, ते अंजनगावसुर्जी तहसील कार्यालयात मंडळ अधिकारी म्हणून कार्यरत होते. रात्री ७.३० ते ७.४५ वाजताच्या सुमारास घडलेल्या या घटनेमुळे परिसरात खळबळ उडाली. मिळालेल्या माहितीनुसार, मनोज बांडे हे अमरावतीहून नागपूरकडे जात होते. दरम्यान, गुरुवारी सायंकाळी ६ वाजताच्या सुमारास ते बाजारगाव येथील अनंतारा हॉटेलमध्ये थांबले. त्यांनी हॉटेलमधील २०८ क्रमांकाची खोली घेतली होती. रात्रीच्या सुमारास अचानक हॉटेलला आग लागली. काही वेळातच आगीने रौद्र रूप धारण केले. आगीमुळे हॉटेलमध्ये धुराचे लोट पसरले. खोलीत धूर साचल्याने बांडे यांचा गुदमरून मृत्यू झाल्याची प्राथमिक माहिती आहे. घटनेची माहिती मिळताच कोंढाळी पोलिस घटनास्थळी दाखल झाले. आग विझविण्यासाठी सोलर कंपनीचे अग्निशमन दल आणि कोंढाळी अग्निशमन दलाच्या गाड्या घटनास्थळी पोहोचल्या. दोन्ही अग्निशमन दलांच्या जवानांनी आग आटोक्यात आणण्यासाठी शर्थीचे प्रयत्न केले. दरम्यान, मृत व्यक्तीच्या ओळखपत्रावरून मनोज बांडे यांची ओळख पटली.



मज्जाविकार उपचारसेवा अधिक शहीद आणि बेपत्ता जवानांच्या वीर पत्नींची भाऊबीज

■ पुणे (दै. संध्या)

भारत माता की जय... वंदे मातरम... च्या जयघोषात सन १९६२ ते १९९९ च्या युद्धातील बेपत्ता आणि शहीद सैनिकांच्या वीरपत्नींना मानवंदना देत पुणेकरांनी त्यांच्यासोबत आगळीवेगळी भाऊबीज साजरी केली. भारतीय सैनिकांसह वीरमाता आणि वीरपत्नी यांनी देशासाठी दिलेले योगदान मोठे आहे. त्यांचा त्याग अवर्णनीय असल्याची भावना यावेळी उपस्थितांनी व्यक्त केली. सैनिक मित्र परिवार, सेवा मित्र मंडळ, रोटरी क्लब ऑफ पूना मिडटाऊन, नारद मंदिर, बँक ऑफ इंडिया कर्मचारी संघटना आणि सहयोगी संस्थांच्या वतीने शहीद आणि बेपत्ता जवानांच्या वीर पत्नींची भाऊबीज या कार्यक्रमाचे आयोजन सदाशिव पेठेतील नारद मंदिर येथे करण्यात आले. यावेळी ज्येष्ठ संपादक व पत्रकार विजय कुवळेकर, चंदूकाका सराफ पेढीचे संचालक अतुल शहा, रोटरी क्लबच्या डॉ.शुभदा जठार, नारद मंदिराचे अध्यक्ष डॉ.विलासबुवा परांजपे, हरी गणेश साने प्रतिष्ठानचे संजय गोखले, सेवा मित्र मंडळाचे अध्यक्ष राजाभाऊ महाडिक आदी व्यासपीठावर उपस्थित होते. साडी, मिठाई, तिरंगी उपरणे, चांदीचे नाणे आणि भेटवस्तू प्रत्येक वीरपत्नीला भाऊबीज म्हणून देण्यात आली. चंदूकाका सराफ पेढी आणि लोकमान्य मल्टीपर्पज सोसायटीने या उपक्रमाला विशेष सहकार्य केले. रेखा देशपांडे, नितीन पंडित, गिरीश पोटफोडे, पराग गुजराथी, अमर लांडे, शेखर कोरडे यांनी कार्यक्रमाच्या आयोजनात सहभाग घेतला. विजय कुवळेकर म्हणाले, ज्या सैनिकांमुळे आपण आनंद साजरा करू शकतो, त्या सैनिकांची आठवण ठेवणे हे महत्वाचे आहे. सैनिकांसह त्यांच्या कुटुंबाची आठवण ठेवणे हे आपले राष्ट्र कर्तव्य आहे. सैनिकांविषयी चार लोकांना जाणीव असणे पुरेसे नाही, तर संपूर्ण समाजाला जावीं असणे आवश्यक असल्याचे त्यांनी सांगितले. आनंद सराफ म्हणाले, सन २००१ सालापासून या उपक्रमाला प्रारंभ झाला. बेपत्ता आणि शहीद सैनिकांच्या वीरपत्नी व माता यांच्यासाठी वानवडी येथे वीरस्मृती ही वसाहत आहे.

आज याच वीरपत्नी व त्यांच्या कुटुंबाच्या त्यागामुळे तिरंगा आकाशात फडकत आहे. त्यामुळे त्यांच्यासोबत दरवर्षी भाऊबीज साजरी केले जाते. यंदा २६ वीरपत्नींसोबत भाऊबीज साजरी करण्यात आली, असेही त्यांनी सांगितले. गिरीश पोटफोडे यांनी सूत्रसंचालन केले.

दिवाळीच्या स्नेहभेटीतून सूरज चौधरी यांचा पत्रकारांशी संवाद सामाजिक बांधिलकी जपणारा उपक्रम

■ कोरेगावमुळ(दै. संध्या)



दिवाळी हा केवळ दिव्यांचा आणि रोषणाईचा सण नसून माणसामाणसांतील नाती जपण्याचा, आपुलकी वृद्धिंगत करण्याचा आणि आनंदाची देवाणघेवाण करण्याचा उत्सव आहे. याच सामाजिक भावनेतून पेठ गावचे माजी आदर्श सरपंच सूरज भालचंद्र चौधरी यांच्या वतीने पत्रकार बांधवांसाठी विशेष स्नेहभेटीचे आयोजन करण्यात आले होते.

या निमित्ताने उपस्थित पत्रकार बांधवांशी विविध सामाजिक, राजकीय तसेच ग्रामीण भागातील विकासाच्या प्रश्नांवर मनमोकळा संवाद साधण्यात आला. पत्रकारिता क्षेत्रातील आव्हाने, सर्वसामान्य नागरिकांचे प्रश्न, स्थानिक विकासकामे आणि लोकशाही व्यवस्थेतील पत्रकारितेची महत्त्वपूर्ण भूमिका अशा विविध विषयांवर विचारांची देवाणघेवाण झाली. पत्रकार हा समाजातील सामान्य माणसाचा आवाज असून प्रशासन आणि जनता यांच्यातील महत्त्वाचा दुवा म्हणून कार्य करतो. ग्रामीण भागातील समस्या, नागरिकांच्या अडचणी आणि विकासाचे प्रश्न प्रभावीपणे समाजासमोर मांडण्याचे महत्त्वपूर्ण कार्य पत्रकार बांधव करीत असतात. त्यांच्या कार्याप्रती आदर व्यक्त करण्याबरोबरच स्नेहाचे नाते अधिक दृढ व्हावे, हा या उपक्रमामागील प्रामाणिक हेतू होता. विशेष म्हणजे, केवळ दिवाळीच्या शुभेच्छांपुरता मर्यादित न राहता संवाद, आपुलकी आणि सामाजिक बांधिलकी जपणारा हा स्नेहमेळावा उपस्थितांसाठी आनंददायी ठरला. सूरज चौधरी यांच्या या उपक्रमाचे उपस्थित पत्रकार बांधवांनी कौतुक केले. यावेळी कोरेगाव मूळचे माजी उपसरपंच लोकेश कानकाटे, सोरतापवाडी व पेठचे पोलीस पाटील दत्तात्रय चौधरी, पत्रकार सचिन सुंबे, ज्येष्ठ पत्रकार शरद पुजारी, सुवर्णाताई कांचन, चंद्रकांत दुंडे, अमोल आढागळे, बापू धुमाळ, बापूसाहेब चौधरी, भाऊसाहेब महाडिक, सुभाष कड, गजानन जगताप, दिनेश कदम, अमोल महाडिक, सुहास चौधरी, सूरज बोधे आदी मान्यवर उपस्थित होते.

'तन्वी द ग्रेट' आणि 'द ग्रेट ग्रँड सुपरहिरो' यांचे वर्ल्ड टेलिव्हिजन प्रीमियर!


■ पुणे : (दै. संध्या)



यंदाच्या बालदिनानिमित्त झी सिनेमा प्रेक्षकांसाठी मनोरंजनाची एक खास पर्वणी घेऊन येत आहे. धैर्य, कल्पनाशक्ती आणि स्वतःवर विश्वास ठेवण्याची ताकद अधोरेखित करणाऱ्या दोन प्रेरणादायी कथा या निमित्ताने प्रेक्षकांच्या भेटीला येणार आहेत. 'द ग्रेट ग्रँड सुपरहिरो : एलियन्स का आगमन' या थरारक सुपरहिरो साहसापासून ते 'तन्वी द ग्रेट' या प्रेरणादायी प्रवासापर्यंत, झी सिनेमाच्या या विशेष चित्रपटांची मेजवानी ॲक्शन, भावना आणि आशयपूर्ण कथाकथन यांचा सुंदर मिलाफ सादर करणार आहे. हे चित्रपट केवळ मुलांचे मनोरंजनच करणार नाहीत, तर त्यांना विचार करायला आणि संवाद साधायलाही प्रवृत्त करतील. त्यामुळे संपूर्ण कुटुंबाने एकत्र बसून आवर्जून पाहावेत असे हे चित्रपट आहेत. या खास सोहळ्याची सुरुवात दुपारी १.३० वाजता झी सिनेमावर होणाऱ्या 'तन्वी द ग्रेट'च्या वर्ल्ड टेलिव्हिजन प्रीमियरने होणार आहे. हा चित्रपट प्रेक्षकांना तन्वीच्या असामान्य विश्वात घेऊन जातो. ऑटिझम स्पेक्ट्रमवर असलेली तन्वी ही एक लहान मुलगी असून, तिची अढळ जिद्द आणि दृढनिश्चय तिला असे स्वप्न पूर्ण करण्यासाठी प्रेरित करतात, जे अनेकांना अशक्य वाटते. कुटुंबाच्या प्रेमाची आणि भक्कम पाठिंब्याची, विशेषतः आई आणि आजोबांच्या साथीची शिदोरी घेऊन तन्वी आपल्या दिवंगत वडिलांशी निगडित एक अनमोल इच्छा पूर्ण करण्यासाठी भावनिक आणि वैयक्तिक प्रवासाला सुरुवात करते.

'अमर प्रेमनाथ'मधून त्यांच्या असामान्य कारकिर्दीला उजाळा

■ पुणे : (दै. संध्या)



प्रेमनाथजी यांच्या जन्माला १०० वर्षे पूर्ण झाली असली, तरी हिंदी चित्रपटसृष्टीच्या इतिहासातील त्यांचे स्थान आजही अढळ आहे. आपल्या अभिनयाने, व्यक्तिमत्त्वाने आणि पडद्यावरच्या अनोख्या शैलीने प्रेक्षकांच्या मनावर कायमस्वरूपी छाप उमटवणारे प्रेमनाथजी हे भारतीय चित्रपटसृष्टीतील एक अविस्मरणीय व्यक्तिमत्त्व होते. त्यांच्या समृद्ध कारकिर्दीचा आणि अतुलनीय योगदानाचा पुन्हा एकदा गौरव करण्यासाठी यंदाच्या नोव्हेंबर महिन्यात झी क्लासिक 'अमर प्रेमनाथ' या विशेष उपक्रमातून त्यांना आदरांजली अर्पण करत आहे. या महिनाभर चालणाऱ्या विशेष सोहळ्यात चार भागांची खास माहितीपट मालिका, त्यांचे सुपुत्र मॉन्टी नाथ यांनी वडिलांच्या स्मृतींना वाहिलेली भावपूर्ण आदरांजली आणि त्यांच्या गाजलेल्या चित्रपटांचा विशेष समावेश असणार आहे. ७ नोव्हेंबरपासून दर शनिवारी सकाळी ११:३० वाजता या माहितीपट मालिकेचा एक नवीन भाग प्रेक्षकांच्या भेटीला येईल. त्यानंतर दुपारी १२:०० वाजता प्रेमनाथजी यांचा एक विशेष चित्रपट प्रसारित केला जाईल. हिंदी चित्रपटसृष्टीतील प्रेमनाथजी यांचा प्रवास खऱ्या अर्थाने विलक्षण होता. आपल्या कारकिर्दीच्या सुरुवातीच्या काळात नायक म्हणून त्यांनी स्वतःची वेगळी ओळख निर्माण केली.

दिवाळी पाडव्याला शिवरायांच्या अश्वारुढ स्मारकाला ८ हजार पणत्यांची मानवंदना

सलग १५ व्या वर्षी शिवजयंती महोत्सव समितीचा अभिनव उपक्रम

■ पिंपरी (दै. संध्या)



दिवाळी पाडव्याची मंगलमय संध्याकाळ... तुतारीची ललकारी... सनई-चौघड्यांचा मंगलमय सूर... आणि स्वराज्यघराण्यांच्या वंशजांनी, पुणेकरांनी केलेला छत्रपती शिवाजी महाराज की जय... जय भवानी... जय शिवाजी.. हर हर महादेवचा... मर्दानी जयघोष... अशा शिवमय झालेल्या वातावरणात... तिमिरातून तेजाकडे नेणाऱ्या अष्ट सहस्त्र पणत्यांच्या लखलखाटात छत्रपती श्री शिवाजी महाराजांच्या विश्वातील पहिल्या भव्यदिव्य अश्वारूढ स्मारकापाशी व पहिल्या शिवराज्याभिषेक शिल्पा पाशी शिवजयंती महोत्सव समिती तर्फे सलग १५ व्या वर्षी "छत्रपती श्री शिवाजी महाराज दीपोत्सव सोहळा" संप्पन्न झाला. श्री शिवछत्रपती स्मारक, एसएसपीएमएस संस्था प्रांगण येथे आयोजित दीपोत्सवाचे उद्घाटन समितीच्या महिला सदस्या रिंकल अमित गायकवाड, नगरसेविका स्वप्नाली नितीन पंडित, ललिता रवींद्र कंक, अश्विनी शंकर कडू, विजया सागर पवार, प्रिया निलेश जेधे, पूनम रोहित घोरपडे, प्रियांका मोहन पासलकर, कामिनी प्रविण गायकवाड, दिपाली विशाल गव्हाणे, जोत्स्ना निलेश जगताप, शोभा भोई सांसह उपस्थित महिलांच्या हस्ते तसेच समितीचे प्रवर्तक संस्थापक अध्यक्ष अमित गायकवाड, रवींद्र कंक, सचिन पायगुडे, समीर जाधवराव, शंकर कडू, निलेश जेधे, मंगेश शिळीमकर, किरण शितोळे, गोपी पवार, ईशान अमित गायकवाड, मोहन पासलकर तसेच शिवकालीन स्वराज्य घराण्यांच्या वंशजांच्या व पदाधिकाऱ्यांच्या हस्ते झाले.

ग्रामदैवत श्री कसबा गणपतीला अन्नकोटाचा महानैवेद्य

■ पुणे (दै. संध्या)




ग्रामदैवत श्री कसबा गणपती मंदिर देवस्थानच्या वतीने दीपावली पाडव्यानिमित्त अन्नकोटाचा महानैवेद्य दाखविण्यात आला. गाभाऱ्यासह मंदिरात केलेली आकर्षक सजावट आणि अन्नकोट पाहण्यासाठी पुणेकरांनी मोठी गर्दी केली. अन्नकोटामध्ये गोवर्धन पर्वत सजावटीसह चिवडा, चकली, काजू, बदाम पिस्ते, अनारसे, कडबोळी, शंकर पाळी, केळी, खव्याच्या पोळ्या असे मिष्टान्न मांडण्यात आले होते. मंदिरात दीपावली निमित्त दररोज सकाळी व सायंकाळी विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होते.

पाडव्या निमित्त अन्नकोट आणि भरतनाट्यम कार्यक्रम देखील पार पडला. तसेच सकाळी दिवाळी पहाटनिमित्त सुगम संगीताचा कार्यक्रम होता. कार्यक्रमांचे आयोजन देवस्थानचे खजिनदार व सांप्रत पुजारी हेरंब ठकार आणि अश्विनी हेरंब ठकार यांनी केले. यावेळी मंदिराचे विश्वस्त, पदाधिकारी व भाविक मोठ्या संख्येने उपस्थित होते.



दैनिक संध्या
निःपक्ष समीक्षणाचे... निर्भीड दैनिक
शनिवार, दि. १४ नोव्हेंबर २०२६

www.dainikesandhya.com www.youtube.com/@sandhyalivenews



थोडक्यात पण महत्वाचे



रब्बी हंगाम व एफएफएस खत बुकिंग ॲपविषयी मार्गदर्शन शिबिर संपन्न

यवत : दैनिक संध्या

महाराष्ट्र शासन कृषी विभागाच्या वतीने शेतकऱ्यांना रब्बी हंगामाच्या पूर्वतयारीसाठी आणि आधुनिक तंत्रज्ञानाची माहिती देण्यासाठी तालुका कृषी अधिकारी अजिंक्य दुधाने व मंडळ कृषी अधिकारी सतीश जगताप यांच्या मार्गदर्शनाखाली विविध मोहिमांचे आयोजन करण्यात येत आहे. याच पार्श्वभूमीवर दौंड तालुक्यातील खामगाव येथे नुकतेच शेतकऱ्यांसाठी विशेष मार्गदर्शन शिबिर पार पडले. या कार्यक्रमात शेतीमध्ये आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर वाढावा आणि शेतकऱ्यांना सुलभतेने खते उपलब्ध व्हावीत, यासाठी एफएफएस (FFS) खत बुकिंग ॲप बाबत उपकृषी अधिकारी संतोष मोरे यांनी उपस्थितांना सविस्तर माहिती दिली. या ॲपच्या माध्यमातून शेतकरी घरबसल्या किंवा आपल्या मोबाईलवरून खतांचे नियोजन व बुकिंग कसे करू शकतात, याविषयी मोलाचे मार्गदर्शन त्यांनी केले. तसेच, रब्बी हंगामातील पिकांचे व्यवस्थापन करताना बीज प्रक्रिया, बियाण्यांची उगवण क्षमता तपासणे आणि पिकांची जोपासना कशी करावी, याविषयी सहाय्यक कृषी अधिकारी विनायक जगताप यांनी उपस्थितांना मार्गदर्शन केले. योग्य बीज प्रक्रियेमुळे पिकांचे रोगांपासून संरक्षण होते आणि उत्पादनात वाढ होते, असे त्यांनी स्पष्ट केले. सदर कार्यक्रमास तुकाराम मदने, किसन टिळेकर, तुषार शेळके, तुषार यादव, योगेश टिळेकर, कोंडीबा नागवडे, भालचंद्र नागवडे, पोपट नागवडे, बाळासाहेब नागवडे, विकास शेळके यांच्यासह परिसरातील शेतकरी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

महावितरण पुणे परिमंडलाच्या मुख्य अभियंतापदी पंकज तगलपल्लेवार रुजू



पुणे : दैनिक संध्या

महावितरणच्या पुणे परिमंडलाच्या मुख्य अभियंतापदी पंकज सुभाष तगलपल्लेवार गुरुवारी (दि. १२) रुजू झाले. त्यांनी प्रभारी मुख्य अभियंता ज्ञानदेव पडळकर यांच्याकडून पदाची सूत्रे स्वीकारली. पुणे परिमंडलाचे तत्कालीन मुख्य अभियंता सुनील काकडे यांची कार्यकारी संचालकपदी नियुक्ती झाल्यानंतर हे पद रिक्त होते. त्यामुळे रास्तापेठ शहर मंडलाचे अधीक्षक अभियंता ज्ञानदेव पडळकर यांच्याकडे मुख्य अभियंतापदाचा अतिरिक्त कार्यभार सोपविण्यात आला होता. दरम्यान, पडळकर यांना मुख्य अभियंतापदी पदोन्नती मिळाल्याने ते गुरुवारी सायंकाळी कार्यमुक्त झाले. तगलपल्लेवार हे यापूर्वी महावितरणच्या मुंबई येथील मुख्यालयात विशेष प्रकल्प विभागाचे मुख्य अभियंता म्हणून कार्यरत होते. तेथून प्रशासकीय बदलीने त्यांची पुणे परिमंडलात नियुक्ती झाली आहे. यापूर्वी त्यांनी पुण्यातील गणेशखिंड मंडलाचे अधीक्षक अभियंता म्हणून काम पाहिले आहे. त्यामुळे पुणे शहर आणि परिसरातील वीज वितरण व्यवस्थेची त्यांना चांगली जाण आहे. याशिवाय त्यांनी महाऊर्जाचे अतिरिक्त महासंचालक म्हणूनही काम केले आहे. ज्ञानदेव पडळकर यांना पदोन्नती मिळाल्याने रिक्त झालेल्या रास्तापेठ शहर मंडलाच्या अधीक्षक अभियंतापदी अशोक जाधव यांची पदोन्नतीने नियुक्ती झाली आहे. त्यांनी गुरुवारी दुपारी पडळकर यांच्याकडून पदभार स्वीकारला.



फुलगावच्या श्री शनैश्वर मंदिरात हजारो पणत्यांनी दीपोत्सव

आळंदी : दैनिक संध्या

दिवाळी पाडव्याचे औचित्य साधून फुलगाव येथील श्री शनैश्वर मंदिरात शिवसेना आळंदी शहरप्रमुख राहुल ज्ञानेश्वर चव्हाण यांच्या वतीने भव्य दीपोत्सवाचे आयोजन करण्यात आले. यावेळी हजारो पणत्या प्रज्वलित केल्याने मंदिर परिसर प्रकाशाने उजळून निघाला. भक्तिमय वातावरणात हा सोहळा उत्साहात पार पडला. श्री शनैश्वर महाराजांच्या चरणी दीपप्रज्वलन करून शेतकऱ्यांवरील संकटे दूर होऊन सर्वांच्या जीवनात सुख, शांती, समृद्धी व आरोग्य नांदावे, अशी प्रार्थना करण्यात आली. यावेळी उपशहरप्रमुख विशाल पंडित तापकीर, ज्ञानेश्वर घुंडरे, मंदिर ट्रस्टचे अध्यक्ष शामतात्या कोळपकर, सुयश कदम, हिरामण तळेकर, स्वराज चव्हाण, पृथ्वीराज गावडे, संतोष शेवाळे, शांभवी चव्हाण यांच्यासह शिवसैनिक व भाविक उपस्थित होते.



पाण्याच्या शोधात आलेल्या मोराला जीवदान

नारायणगाव : दैनिक संध्या

पाण्याच्या शोधात जंगलातून मानवी वस्तीत आलेल्या मोरावर पाळीव कुत्र्यांनी हल्ला केल्याची घटना पिंपळगाव तर्फे नारायणगाव येथील वाणीमाळा, सावरगाव गुंजाळवाडी सीमेवर घडली. मात्र, वन विभागाच्या रेस्क्यू टीम आणि आपदा मित्रांच्या तत्परतेमुळे या मोराला सुखरूप जीवदान मिळाले. सोमवारी दुपारी चारच्या सुमारास हा मोर पाण्याच्या शोधात ठाकर वस्तीजवळ आला होता. त्यावेळी काही पाळीव कुत्र्यांनी त्याचा पाठलाग करत हल्ला केला. कुत्र्यांपासून बचाव करण्यासाठी मोराने जवळच असलेल्या कोपीमध्ये आश्रय घेतला. हा प्रकार स्थानिक नागरिकांच्या निदर्शनास येताच त्यांनी वन विभाग आणि आपदा मित्रांना माहिती दिली. घटनेची माहिती मिळताच वनरक्षक राम वारे,रेस्क्यू टीम सदस्य आदित्य डेरे, शंतनु डेरे, समीर बोऱ्हाडे, वैशाली चांभारे आणि आपदा मित्र सुशांत भुजबळ यांनी घटनास्थळी धाव घेतली. त्यांनी मोराला सुरक्षितपणे ताब्यात घेतले. जुन्नरचे वनपरिक्षेत्र अधिकारी प्रदीप चव्हाण यांच्या मार्गदर्शनाखाली मोराची तपासणी करण्यात आली. सुदैवाने त्याला कोणतीही दुखापत झाली नसल्याचे आढळले. त्याला पाणी पाजून काही वेळ विश्रांती देण्यात आली.

‘शाहू, फुले, आंबेडकर वाचन कट्टा’ सुरू

■ सासवड (दै. संध्या)



वाचन संस्कृतीला चालना देण्यासाठी आणि वाचनाची गोडी पुन्हा निर्माण करण्यासाठी सासवड (ता. पुरंदर) येथील सोपाननगरमध्ये नव्याने उभारण्यात आलेल्या ‘शाहू, फुले, आंबेडकर वाचन कट्ट्या’ चे उद्घाटन नुकतेच अत्यंत उत्साहात संपन्न झाले. या उपक्रमामुळे परिसरातील नागरिकांना, ज्येष्ठांना व विद्यार्थ्यांना पुस्तके आणि वर्तमानपत्रांच्या रूपाने ज्ञानाचे एक नवीन केंद्र उपलब्ध झाले आहे.

या वाचन कट्ट्याचे उद्घाटन नगराध्यक्षा आनंदीकाकी जगताप, सेवानिवृत्त मुख्याध्यापक उल्हास ताकवले, माजी उपनगराध्यक्ष यशवंतराव जगताप, ज्येष्ठ नागरिक सुधाकर गिरमे आणि सुरेश काकडे यांच्या हस्ते अत्यंत उत्साही वातावरणात पार पडले. पालिकेच्या पाणीपुरवठा सभापतींच्या विशेष पुढाकाराने हा वाचन कट्टा सुरू करण्यात आला असून, २००७ मध्ये तत्कालीन नगराध्यक्ष चंदुकाका जगताप यांनी शहरातील विविध वॉर्डमध्ये सुरू केलेल्या १७ वाचन कट्ट्यांपैकीच हा एक भाग आहे. या ठिकाणी ज्येष्ठांसह विविध वयोगटातील महिला आणि नागरिकांसाठी विविध प्रकारची वाचनीय पुस्तके आणि वर्तमानपत्रांची उपलब्धता करून देण्यात आली आहे. तसेच येथे वाचकांसाठी सूचनाफलक, कपाट आणि बसण्यासाठी सुंदर बाकांची व्यवस्था ज्ञानेश्वर गिरमे व त्यांच्या कुटुंबीयांकडून सढळ हस्ते करण्यात आली आहे. या संपूर्ण वाचन कट्ट्याची आणि साहित्याची नियमित देखभाल करण्याची जबाबदारी येथील ज्येष्ठ नागरिक राजाराम बेंगळे यांच्याकडे सोपवण्यात आली आहे. उद्घाटनाप्रसंगी आयोजित कार्यक्रमात सेवानिवृत्त मुख्याध्यापक आत्माराम शिंदे, पांडुरंग शिरवळकर आणि उल्हास ताकवले यांनी आपल्या मनोगतातून वाचनाचे महत्त्व सविस्तरपणे विशद केले. आजच्या काळात वाचन संस्कृती टिकवणे आणि ती पुढच्या पिढ्यांमध्ये वाढवणे किती गरजेचे आहे, याबाबत त्यांनी उपस्थितांना मोलाचे आवाहन केले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक व सूत्रसंचालन हेमंत ताकवले यांनी केले, तर ज्ञानेश्वर गिरमे यांनी हा वाचन कट्टा सुरू करण्यामागील मूळ हेतू स्पष्ट करत सर्वांचे आभार मानले. या सोहळ्याप्रसंगी उपनगराध्यक्ष मनोहर जगताप, गटनेते अजित जगताप, सेवानिवृत्त आरोग्य अधिकारी मोहन चव्हाण, प्रगती ग्रंथालयाचे तानाजी सातव, ॲड आनंद जगताप, तुकाराम गिरमे, सूर्यकांत जगताप, सोपानराव गिरमे, माजी नगरसेवक संतोष गिरमे, सुहास बेंगळे, कैलास बलकवडे, सुनील जगताप, प्रशांत बेंगळे, रवींद्र जगताप, यांच्यासह परिसरातील अनेक मान्यवर व नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

पोलीस चौकीत शेतकऱ्याला मारहाण केल्याचा उपनिरीक्षकावर आरोप

■ कवठे येमाई (दै. संध्या)

■ वरिष्ठांकडे लेखी चौकशीची मागणी !

शिरुरच्या बेट भागातील टाकळी हाजी पोलीस चौकीत चौकशीसाठी बोलावून एका शेतकऱ्याला मारहाण, शिवीगाळ व जीवे मारण्याची धमकी दिल्याचा गंभीर आरोप पोलीस एका उपनिरीक्षकावर करण्यात आला आहे.या प्रकरणाची वरिष्ठ पोलीस अधिकाऱ्यांमार्फत सखोल चौकशी करून संबंधित अधिकाऱ्यांवर कारवाई करण्याची मागणी देखील करण्यात आली आहे. टाकळी हाजी येथील रावसाहेब सुखदेव घोडे (वय ३४) यांनी याबाबत उपविभागीय पोलीस अधिकाऱ्यांकडे तक्रार दिली आहे. तक्रारीनुसार ३१ ऑक्टोबर रोजी शेतीच्या वादातून त्यांच्या चुलतभावाच्या कुटुंबीयांशी वाद झाला होता. दोन्ही बाजूंनी पोलीस चौकीत तक्रार दिल्यानंतर मध्यस्थीने वाद मिटवण्यात आला होता.त्यानंतर ५ नोव्हेंबर रोजी हवालदार वायाळ यांनी फोन करून घोडे यांना चौकशीसाठी पोलीस चौकीत बोलावले. तेथे उपनिरीक्षक गोविंद खटिंग यांनी दमदाटी करून मारहाण केली, मोबाईल हिसकावून घेतला, शिवीगाळ केली तसेच जीवे मारण्याची धमकी दिल्याचा आरोप घोडे यांनी तक्रारीत केला आहे. त्यांच्या कुटुंबीयांशीही अपमानास्पद वर्तन झाल्याचे तक्रारीत नमूद आहे. विशेष म्हणजे, संबंधित उपनिरीक्षकाची घटनेपूर्वीच अन्यत्र बदली झाली होती, असा दावा तक्रारदाराने केला आहे. त्यामुळे बदली आदेश, कार्यमुक्तीची तारीख आणि चौकशी करण्याचा अधिकार संबंधित अधिकाऱ्यांना होता का, याचीही तपासणी करण्याची मागणी करण्यात आली आहे. दरम्यान, या प्रकरणाचा तपास सुरू असल्याची माहिती शिरूरचे पोलीस निरीक्षक विनोद पाटील यांनी दिली आहे. आता या प्रकरणात वरिष्ठ पोलीस अधिकारी काय भूमिका घेतात आणि चौकशीतून नेमके काय समोर येते, याकडे टाकळी हाजी सह बेट परिसरातील नागरिकांचे लक्ष लागले आहे.

पत्रकार कोल्हे यांच्या सतर्कतेमुळे तासाभरातच चोरीचा छडा

■ नारायणगाव (दै. संध्या)



जेष्ठ महिलेचे नारायणगाव बस स्थानकातून चोरीला गेलेले 5 लाख 25 हजार रुपये किमतीचे सोन्याचे दागिने व मोबाईलचा तपास अवघ्या एक तासात करून आरोपीला ताब्यात घेण्यात पोलिसांना यश आले. ही घटना सोमवारी दुपारी एक वाजण्याच्या सुमारास नारायणगाव बस स्थानकात घडली. याप्रकरणी नारायणगाव पोलिसांनी रमेश सुंदर भास्कर (वय 71,राहणार विठ्ठलवाडी-आगर, ता.जुन्नर) या ज्येष्ठ नागरिकाला अटक केली असून त्याने चोरीची कबुली दिली आहे. वत्सला सिताराम पवार (वय 64, रा. बोडके नगर, जुन्नर) या सोमवारी दुपारी एक वाजण्याच्या सुमारास जुन्नर येथे जाण्यासाठी दोन नातवंडासह नारायणगाव बस स्थानक आगारात बसची वाट पहात बसल्या होत्या. बस स्थानकातील खुर्चीवर त्यांनी 5 लाख 20 हजार रुपये किमतीचे सोन्याचे दागिने व पाच हजार रुपये किमतीचा मोबाईल असलेली पिशवी ठेवली होती. दिवाळी सण असल्याने बस स्थानकात गर्दी होती. या संधीचा फायदा घेत रमेश भास्कर यांनी दागिने व मोबाईल असलेली पिशवीची चोरी केली. त्यानंतर ते घाई घाईने नाशिककडे जाणाऱ्या बसमध्ये बसले. दरम्यान महिलेचा आरडाओरडा ऐकून बस स्थानकात या वेळी उपस्थित असलेले ज्येष्ठ पत्रकार रवींद्र कोल्हे यांनी महिलेकडे चौकशी केली असता दागिने असलेल्या पिशवीची चोरी झाली असल्याची माहिती त्यांनी दिली. कोल्हे यांनी तातडीने वाहतूक पोलीस काळूराम मासळकर यांना माहिती दिली. मासळकर यांनी या बाबतची माहिती प्रभारी अधिकारी प्रवीण सपांगे यांना दिली. फौजदार जगदेव पाटील,हवालदार मंगेश लोखंडे यांनी सहकारी पोलिसांच्या मदतीने बस स्थानकातील सीसीटीव्ही फुटेजची तपासणी केली असता एका ज्येष्ठ नागरिकाने दागिने असलेल्या पिशवीची चोरी केली. त्यानंतर तो घाईघाईने पुणे -नाशिक बस मध्ये बसला असल्याचे स्पष्ट झाले. नारायणगाव पोलिसांनी तातडीने आळेफाटा पोलिसांशी संपर्क साधला. दरम्यान नारायणगाव पोलीस आळेफाटा बस स्थानकात दाखल झाले. आळेफाटा पोलिसांच्या मदतीने नारायणगाव पोलिसांनी रमेश भास्कर याला आळेफाटा बस स्थानकातून ताब्यात घेतले.

त्याची झडती घेतली असता त्याच्याकडे मोबाईल व दागिने असलेली पिशवी आढळून आली. आरोपीने चोरीची कबुली दिली आहे. कायदेशीर प्रक्रिया करून सायंकाळी चोरीला गेलेले दागिने व मोबाईल नारायणगाव पोलिसांनी वत्सला पवार यांच्या स्वाधीन केले. ऐन दिवाळीत चोरीला गेलेले दागिने पुन्हा मीळाल्यामुळे महिलेला अश्रू अनावर झाले. ज्येष्ठ महिलेने पोलिस व पत्रकार यांचे आभार मानले. जागरूक पत्रकार व पोलिसांनी तत्परतेने केलेला तपास यामुळे चोरीचा एक तासात छडा लावण्यात यश आले.

खेड तालुक्यातील गरिबांची दिवाळी गोड!

■ दानशूर नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद

■ ३० गरजू कुटुंबांना किराणा साहित्य व दिवाळी फराळाचे वाटप



■ राजगुरुनगर (दै. संध्या)

सामाजिक बांधिलकी जपत राजगुरुनगर येथील माऊली सेवा प्रतिष्ठानच्या वतीने खेड तालुक्यातील दुर्गम भागातील गरीब, गरजू आणि आर्थिकदृष्ट्या दुर्बल कुटुंबांची दिवाळी गोड करण्यात आली. अंध, दिव्यांग, मतिमंद, निराधार ज्येष्ठ नागरिक तसेच गरजू कुटुंबांना दोन महिने पुरेल इतके किराणा साहित्य आणि दिवाळी फराळ भेट देऊन प्रतिष्ठानने सामाजिक संवेदनशीलतेचा आदर्श निर्माण केला आहे. या उपक्रमासाठी माऊली सेवा प्रतिष्ठानचे अध्यक्ष कैलास दुधाळे यांनी सोशल मीडियाच्या माध्यमातून शहरातील दानशूर नागरिकांना आर्थिक मदतीचे आवाहन केले होते. त्यांच्या आवाहनाला नागरिकांनी उत्स्फूर्त प्रतिसाद दिला. अवघ्या चार दिवसांत ६० हजार रुपयांपेक्षा अधिक रक्कम प्रतिष्ठानच्या खात्यात जमा झाली. या निधीतून ३० गरजू कुटुंबांसाठी किराणा किट खरेदी करण्यात आले. या किटमध्ये गहू, तांदूळ, साखर, चहापावडर, तेल, शेंगदाणे, तूरडाळ, पोहे, रवा, बेसनपीठ, टूथपेस्ट, साबण आदी जीवनावश्यक वस्तूंचा समावेश होता. तसेच दिवाळीचा आनंद द्विगुणित करण्यासाठी लाडू, चिवडा, चकली, करंजी यांसह विविध फराळाचे पदार्थही देण्यात आले. खेड तालुक्यातील राजगुरुनगर, कान्हेवाडी येथील वरची व खालची ठाकरवाडी, साबुर्डी, कडूस, दोंदे, चांडोली, वहागाव, गुळाणी, वाकी खुर्द आणि बुरसेवाडी ठाकरवाडी परिसरातील गरजू कुटुंबांना या साहित्याचे वाटप करण्यात आले. मदतीचा हात मिळाल्याने लाभार्थी कुटुंबांच्या चेहऱ्यावर समाधान आणि आनंद ओसंडून वाहत होता. समाजातील गरजू घटकांच्या सणासुदीत आनंद निर्माण व्हावा, या उद्देशाने राबविण्यात आलेल्या या उपक्रमासाठी आर्थिक सहकार्य करणाऱ्या सर्व दानशूर नागरिकांचे प्रतिष्ठानचे अध्यक्ष कैलास दुधाळे यांनी आभार मानले. यावेळी माऊली सेवा प्रतिष्ठानच्या सचिव छाया दुधाळे, सामाजिक कार्यकर्ते तथा मुख्याध्यापक संजय घुमटकर, अविनाश पाटील, वासुदेव गोपाळे, विलासराव भास्कर, अनिल शिंदे, शिवव्याख्याते संपतराव गारगोटे, वहागावचे माजी सरपंच सत्यवान नवले, दोंदे गावच्या सरपंच प्रतीक्षा दरवडे, ॲड. संदीप देशमुख, ह.भ.प. दत्तात्रय साखरकर, कडूसचे माजी ग्रामपंचायत सदस्य चांगदेव ढमाले, गोरक्ष मुळूक सर आदी मान्यवर उपस्थित होते.

आळंदी नगरपरिषदेसमोर रिक्षाचालकावर खंजीराने वार

■ आळंदी (दै. संध्या)

■ पूर्वीच्या भांडणाचा राग; तिघांचा हल्ला, आरोपींचा शोध सुरू



पूर्वी झालेल्या भांडणाचा राग मनात धरून तीन जणांनी एका तरुण रिक्षाचालकावर खंजीराने हल्ला केल्याची धक्कादायक घटना शुक्रवारी (दि. १३) सकाळी साडेदहाच्या सुमारास आळंदी पोलीस ठाण्याच्या हद्दीतील आळंदी नगरपरिषदेच्या समोरील पीसीएमटी चौकात घडली. या हल्ल्यात सागर दत्तात्रय बडे (वय २२, रा. अण्णाभाऊ साठे नगर, काटे कॉलनी, देहू फाटा, दिघी) हा तरुण गंभीर जखमी झाला असून, त्याच्यावर पिंपरी येथील वायसीएम रुग्णालयात उपचार सुरू आहेत. आळंदी पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक भीमा नरके यांनी दिलेल्या माहितीनुसार, दोन जण हातात धारदार शस्त्रे घेऊन सागर बडे याचा पाठलाग करीत होते. यावेळी आर्यन नागोराव पंडित (रा.कोळगाव) आणि त्याच्या अन्य दोन साथीदारांनी जुन्या भांडणाचा राग मनात धरून सागर याच्यावर खंजीराने वार केले. या हल्ल्यात तो गंभीर जखमी झाला. भरवस्तीत, भरदिवसा घडलेल्या या घटनेमुळे पीसीएमटी चौक परिसरात एकच खळबळ उडाली असून, नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे. शहरातील सार्वजनिक ठिकाणी धारदार शस्त्रांचा वापर करून हल्ले होण्याच्या घटनांमुळे कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न पुन्हा चर्चेत आला आहे.

जिल्ह्यात अव्वल, आता लक्ष्य राज्य!

५० लाखांचे बक्षीस पटकावणाऱ्या गुरोळीचा पुन्हा शड्डू

■ मुख्यमंत्री समृद्ध पंचायतराज अभियान २०२६-२७

■ उपजिल्हाधिकारी प्रशांत खेडेकर यांचा ग्रामस्थांना यशाचा कानमंत्र

■ नाझरे सुपे पुरंदर (दै. संध्या)



पुणे जिल्ह्यात पहिला क्रमांक आणि तब्बल ५० लाख रुपयांचे बक्षीस... मागील अभियानातील हे दणदणीत यश ताजे असतानाच पुरंदर तालुक्यातील गुरोळी गावाने पुन्हा एकदा कंबर कसली आहे. ग्रामविकास विभागाच्या ‘मुख्यमंत्री समृद्ध पंचायतराज अभियान २०२६-२७’मध्ये दमदार कामगिरी करून गावाचे नाव थेट राज्यपातळीवर झळकविण्याचा निर्धार ग्रामस्थांनी केला आहे. अभियानाच्या पूर्वतयारीसाठी गावात नुकतीच ग्रामस्थांची महत्त्वाची बैठक पार पडली. त्यामध्ये राज्य शासनाच्या शासन निर्णयाचे जाहीर वाचन करण्यात आले, तसेच अभियानाचा उद्देश, नियमावली, गुणांकनाचे निकष आणि स्पर्धेची रचना याचा संपूर्ण आराखडा ग्रामस्थांसमोर उलगडून दाखविण्यात आला. उपजिल्हाधिकारी प्रशांत खेडेकर यांनी शासन निर्णयातील प्रत्येक तरतूद सोप्या भाषेत समजावून सांगत, अभियानात यश मिळवायचे असेल तर गावाने कोणत्या दिशेने आणि कोणत्या पद्धतीने काम करायला हवे, याचा नेमका मार्ग दाखविला. या अभियानात ग्रामपंचायतीच्या कारभाराइतकाच प्रत्येक नागरिकाचा सक्रिय सहभागही निर्णायक ठरणार आहे. लोकसहभागातून विकासकामे, स्वच्छता, पर्यावरण रक्षण, जलसंधारण, हरित गाव, लोकाभिमुख प्रशासन, महिला सक्षमीकरण, शिक्षण, आरोग्य, रोजगारनिर्मिती आणि शासकीय योजनांची प्रभावी अंमलबजावणी या निकषांवर गावांची कसोटी लागणार आहे. गावातील महिला, युवक, शेतकरी, सामाजिक संस्था, बचत गट आणि ग्रामपंचायत पदाधिकारी यांनी हातात हात घालून काम केल्यास यशाची पुनरावृत्ती अवघड नाही, असा विश्वास व्यक्त करत खेडेकर यांनी सर्व घटकांना एकदिलाने अभियानात उतरण्याचे आवाहन केले.

गुरोळीसाठी हे अभियान केवळ बक्षिसाची शर्यत नसून गावाच्या सर्वांगीण प्रगतीची सुवर्णसंधी असल्याची भावना बैठकीत व्यक्त झाली. प्रत्येकाने आपला वाटा उचलला तर गुरोळी विकासाचे नवे शिखर नक्कीच गाठेल, असा सूर उमटला. ‘एक गाव, एक ध्येय’ असा नारा देत मागील यशाची परंपरा अधिक जोमाने पुढे नेण्याचा आणि यंदा गुरोळीचा डंका राज्यभर वाजविण्याचा निर्धार ग्रामस्थांनी एकमुखाने केला.

“हे अभियान केवळ ग्रामपंचायतीचे नाही, तर गावातील प्रत्येक नागरिकाचे आहे. महिला, युवक, शेतकरी, बचत गट आणि सामाजिक संस्था एकत्र आल्यास गुरोळी यंदाही यशाची पुनरावृत्ती करून राज्यात आपली वेगळी ओळख निर्माण करेल.”

- प्रशांत खेडेकर, उपजिल्हाधिकारी